महाराष्ट्राचे

# शिल्पकार यशवंतराव चव्हाण



विठ्ठलराव पाटील

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# महाराष्ट्राचे शिल्पकार

# यशवंतराव चव्हाण

विठ्ठलराव वि. पाटील

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

**प्रथमावृत्ती : नोव्हेंबर २००२**

महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ९

प्रकाशक :

सचिव,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,

१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,

दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :

मायक्रोग्राफ

रामदूत, २ रा मजला,

डॉ. भालेराव मार्ग,

गिरगाव, मुंबई - ४००००४

दूरध्वनी : ३८७६९५९

मुख्यपृष्ठ : **राजा बडसल**

किंमत : **रु. ४०/-**

*या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असलेच असे नाही.*

## निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणताः शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती "महाराष्ट्राचे शिल्पकार" या योजने अंतर्गत पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील "यशवंतराव चव्हाण" हा नववा चरित्रग्रंथ आहे.

"महाराष्ट्राचे शिल्पकार" या चरित्रमाले अंतर्गत यशवंतराव चव्हाण यांचेही चरित्र महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत प्रकाशित करताना आमच्या मनात कृतज्ञतेची भावना आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर यशवंतरावजींनी लगेचच म्हणजे १९ नोव्हेंबर, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची निर्मिती केली. इतकेच नव्हे तर या मंडळाची उद्दिष्टे निश्चित करून महाराष्ट्र राज्याच्या साहित्याच्या आणि संस्कृतीच्या विकासाला कटीबद्ध केले. या चरित्रमाले अंतर्गत हा ग्रंथ प्रसिद्ध करून आम्ही त्यांचे ऋण अंशतः व्यक्त करीत आहोत, असे म्हटले तरी चालेल.

या चरित्रग्रंथाच्या लेखनाची जबाबदारी कुणावर सोपवावी हा विचार सुरू होताच श्री. विठ्ठलराव पाटील यांचे नाव अग्रक्रमाने आमच्या समोर आले. श्री. विठ्ठलराव पाटील यांना यशवंतरावांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेला आहे. शिवाय यशवंतरावांच्या व्यक्तीमत्वाशी व विचारांशी त्यांचे अतूट नातं आहे. यशवंतरावांच निधन होऊन जवळपास दीड तप झालेलं आहे. तरीही त्यांचं हे नातं कायम आहे.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतरावजींचे किती मोलाचे योगदान आहे, त्याचे प्रत्यंतर हा चरित्रग्रंथ वाचल्यानंतर येईल, असा मला विश्वास आहे.

रा. रं. बोराडे

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई,

दिनांक :१५ ऑक्टो., २००२

विजयादशमी

## मनोगत

भारताचे थोर सुपुत्र, लोकनेते यशवंतराव चव्हाण हे त्यांच्या कर्तृत्वामुळे भारतभर आणि भारताबाहेरही प्रसिद्ध झालेले आहेत. यशवंतराव चव्हाण हे स्वातंत्र्यसेनानी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, भारताचे संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री म्हणून राजकीय क्षेत्रात मान्यता पावलेले आहेत. तसेच ते कुटुंबवत्सल, मानवतावादी साहित्यिक, विचारवंत वक्ते आणि लोकाभिमुख नेते म्हणून सर्वमान्य झालेले आहेत. अशा थोर महापुरुषावर ते हयात असताना आणि त्यांच्या निधनानंतर विविध भाषेत विपुल स्फुट आणि चरित्रपर लेखन प्रकाशित झालेले आहे. खुद्द त्यांनी 'कृष्णाकांठ' हे आत्मचरित्र लिहिलेले आहे. असे असतानाही मी हे चरित्रपर लेखन करीत आहे. याला कारणे अनेक आहेत.

माझ्या आणि यशवंतराव चव्हाण यांचा संबंध सन १९५२ पासून ते हयात असे तोपर्यंत होता आणि त्यांच्या निधनानंतर आज अखेर गेली अठरा वर्षे त्यांच्या सर्वांगीण विचाराच्या निमित्ताने राहिलेला आहे. माझ्या संदर्भातील एक माणूस म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्या दोन छोट्याशा आठवणी देत आहे.

मी १९४८ सालापासून ओगले ग्लास वर्क्स लि. ओगलेवाडी येथे नोकरी करीत होतो. त्यावेळी झालेल्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत कऱ्हाड उत्तर विधानसभा मतदारसंघाची निवडणूक अतिशय चुरशीची झाली. खुद्द साहेब या निवडणुकीसाठी एक उमेदवार होते. या निवडणुकीत काँग्रेसचा एक कार्यकर्ता म्हणून मी त्यांच्यासाठी हिरीरीने भाग घेत होता. या प्रचारमोहिमेचे सूत्रधार स्व. आबासाहेब पार्लेकर आणि विरवडे गांवचे स्व. ज्ञानूबुवा धोकटे हे होते. मसूरला झालेल्या एका अटीतटीच्या प्रचारसभेतून निर्माण झालेल्या गोंधळात थोडीशी मारामारीही झाली. या मारामारीत मी व माझ्या सरकाऱ्यांपैकी शंकर पोरे सापडलो. त्यावेळी मला झालेली जखम ही त्या प्रचार मोहिमेचे खूण म्हणून अभिमानाने मी

बाळगलेली आहे. या झालेल्या प्रकारात आम्हा छोट्या कार्यकर्त्यांच्या प्रकृतीसंबंधी ओगलेवाडीच्या डॉ. आगाशे यांचेबरोबर साहेबांनी दोन वेळा, स्व. ज्ञानूबुवा धोकटे यांच्यासमवेत तीन वेळा माझी आस्थेवाईकपणे चौकशी केली. आपल्यासाठी काम केलेल्या प्रत्येक छोट्या कार्यकर्त्यांच्या कामाची नोंद साहेब बारकाईने ठेवत असत व त्याच्या कामाचे कौतुकही करत असत.

मी १९७८ मध्ये फुफ्फुसाच्या विकाराने जास्त आजारी असताना ऑक्टोबर महिन्यात पुणे येथील रूबी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी मला ॲडमिट व्हावे लागले. उपचार केले, निदान झाले, पण शस्त्रक्रियेशिवाय पर्याय नव्हता. कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रियेचा खर्च माझ्या आवाक्याबाहेरचा होता. त्यासंबंधी काय करावे या विवंचनेत मी होतो. साहेबांचा माझा फारसा निकटचा परिचय नसूनही मी साहेबांना माझ्या शस्त्रक्रियेसंबंधी आजाराविषयी एक व्यक्तिगत सविस्तर पत्र लिहिले. त्याचा परिणाम असा झाला की, रूबी हॉस्पिटलच्या व्यवस्थापकांकडून आपल्या शस्त्रक्रियेची व त्या खर्चाची तरतूद झाली असल्याने आपण येथे यावे असे मला कळविण्यात आले. ही गोष्ट साहेबांनी परस्परच केली. या संबंधी मला त्यांनी केव्हाही ओळख दिली नाही.

या आठवणीमधून असे दिसते की, यशवंतरावांनी माझ्यासारख्या महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील असंख्य कार्यकर्त्यांवर प्रेमाचा वर्षाव केलेला आहे. अशा थोर महामानवाबद्दल त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल गेली चाळीस वर्षे माझे ऐकणे, वाचणे आणि लिहिणे चालू आहे. हा चिंतन प्रवाह कुठेतरी शब्दबद्ध व्हावा या एका उर्मीतूनच मी त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रभर फिरून त्यांच्या संदर्भातील ग्रंथ, नियतकालिके, वार्षिके, विशेषांक, मुलाखती, आठवणी, कागदपत्रे आदि साहित्य संग्रहित केले. त्यातूनच 'यशवंतराव विचार आणि वारसा', 'यशवंतराव चव्हाण विविधांगी 'व्यक्तिमत्त्व', 'यशवंतरावांच्या प्रस्तावना' हे ग्रंथ मी प्रसिद्ध केले. नंतर यशवंतरावांच्यावर एक चरित्रग्रंथ सर्वसामान्यांसाठी लिहावा

असे मला सारखे वाटत होते. याची जुळणी चालू असतांनाच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबईचे अध्यक्ष मा. रा. रं. बोराडेसाहेब यांचे यशवंतराव चव्हाण यांच्यावर एक चरित्रपर पुस्तक लिहावे असे पत्र मला आले. त्यामुळे या कामाला गती आली आणि हे पुस्तक वाचकांचे हाती देतांना मला आनंद होत आहे.

लोकनेत यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर मराठी माणसाची, मराठी भाषेची आणि मराठी साहित्याची चांगल्या प्रकारे जडणघडण व्हावी म्हणून 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची' निर्मिती केली. चव्हाण साहेबांनी निर्माण केलेल्या या साहित्य आणि संस्कृती मंडळाने त्यांच्याच चरित्राचे लेखन करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली. प्रकृतीस्वास्थ्य नसतांनाही साहेबांच्या प्रेमापोटी हे काम मला पूर्ण करता आले.

हे काम पूर्ण व्हावे म्हणून वेळोवेळी या मंडळाचे अध्यक्ष, यशवंतरावांच्या विचारावर श्रद्धा असलेले मा. प्राचार्य बोराजे सर यांनी वेळोवेळी संपर्क साधून हे चरित्र पूर्ण झाले पाहिजे अशी प्रेमाची सक्ती केली. त्यांच्या सक्तीमुळे हे चरित्रपर लेखन पूर्ण झाले म्हणून मी त्यांचे मनापासून आभार मानतो. तसेच हे काम करत असता महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या चळवळीतील कार्यकर्ते, लेखक, संशोधक, वक्ते व माझे स्नेही कऱ्हाड येथील वेणुताई चव्हाण कॉलेजमधील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रघुनाथ केंगार यांनी या ग्रंथाचे हस्तलिखित तपासले व काही योग्य त्या सूचना केल्या. हे सर्व त्यांनी माझ्यावरी स्नेहापोटी केले. त्यांचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही म्हणून मी त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत आहे. त्याचप्रमाणे कऱ्हाड नगरीचे शिल्पकार मा. श्री. पी. डी. पाटील साहेब यांच्याशी वेळोवेळी चव्हाणसाहेबांच्या संदर्भात ज्या चर्चा झाल्या त्याचा मला हे चरित्र लेखन करीत असताना फायदा झाला म्हणून मी त्यांचा ऋणी आहे.

यशवंतरावांचा वारसा समाजामध्ये चालविणारे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष व लोकनेते मा. शरदराव पवार यांच्या सहकार्यामुळे व मा. राम प्रधान यांच्या देखरेखीखाली दहा ते बारा वर्षे मला यशवंतरावांच्यासंबंधी साधन सामग्री उपलब्ध करता आली, तपासता आली. त्यांच्या विषयावर फाईल्स करता आल्या त्यातूनच हे लेखन करता आले. त्यामुळे मा. शरदराव पवार, मा. राम प्रधान व प्रतिष्ठानचे सर्व विश्वस्त आणि अधिकारी यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

आयुष्यभर निरोगी विचार केल्यामुळे निवृत्तीनंतरही बऱ्यापैकी प्रकृती स्वास्थ्य लाभले. घरातील अनेक अडचणी असतानाही यशवंतरावांच्यावरील हे चरित्र लेखन करीत असताना त्यांच्या प्रेमापोटीच माझी पत्नी सौ. वैजयन्ती व मुले यांचे अमोल सहकार्य लाभले. त्यामुळे त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे हे माझे कर्तव्य समजतो. वरील सर्वांच्या प्रेमळ सहकार्यामुळे हा ग्रंथ वाचकांच्या हाती ठेवण्यात मला अत्यानंद होत आहे.

**विठ्ठलराव वि. पाटील, ग्रंथपाल**

**कऱ्हाड ‘स्वप्नदीप अपार्टमेंट’**

**दिनांक : १ मे २००२ १३६, बुधवार पेठ, कऱ्हाड - ४१५११०**

**(महाराष्ट्र स्थापना दिन) (जि. सातारा), दूध्वः(०२१६४) २१८८२**

## महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण

यशवंतरावांचा जन्म १२ मार्च, १९१३ रोजी खानापूर तालुक्यातील सागरोबाच्या सान्निध्यातील देवराष्ट्रे या त्यांच्या आजोळी झाला. तेथील कै. दाजी घाडगे हे त्यांचे मामा.

देवराष्ट्रे गांव तिन्ही बाजूंनी सह्याद्री पर्वताच्या कडेकपारांनी वेढलेले आहे. सह्याद्री पर्वताचे सौंदर्य खरोखरच अवर्णनीय आहे. महाराष्ट्राच्या भूमीची व त्याचील माणासंची जडणघडणही सह्याद्रीच्या या वज्रासमान कडेकपारीनीच झालेली असावी, असे महाराष्ट्राचा इतिहास पाहिल्यावर वाटते. निसर्गसौंदर्याने नटलेल्या सह्याद्री पर्वताच्या कुशीतील देवराष्ट्रे गावी यशवंतराव जन्मले व लहानाचे मोठे झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षणही तिथेच झाले.

वास्तविक पाहता यशवंतरवांचे मूळ वडिलोपार्जित गांव ढवळेश्वर हे होय. येथे चव्हाणांची चार धरे सुखाने नांदत होती. माणुसकीला जागणारी, नेकीने जगणारी माणसे होती ती. यशवंतरावांच्या आईचे आजेसासरे गरीबीतच पण इमानदारीने-सचोटीने वागणारे गोरगरिबांचे कणव करणारे होते म्हणून गावातीलच एकाला शेतीसाठी कर्जाला जामीन झाले. पण त्या शेतकऱ्याला पुढे कठीण काळ आल्यामुळे ते सावकारी कर्ज फेडता आले नाही. त्याच्या नरडीचा सावकारी कर्जाचा फास या प्रामाणिक इमानदारीने वागणाऱ्या चव्हाणांच्या नरडीला बसला. चव्हामांनी आपला बोल खरा करण्यासाठी स्वतःची जमीन-घरदार सावकाराच्या घशाच घातले वचनापायी ते स्वतः देशोधडी लागले. हत्तीसारखा बैल दावणीचा सोडला व त्याचे दावे धरून गांव – घरदार सोडले व बायकोपोरानिशी विट्याला आले. दुसऱ्याची जमीन पोटासाठी वाट्याने करून कुटुंब जगवले, उदरनिर्वाहाची सोय केली.

त्यांचे वडील हे बेलीफ म्हणून काम करीत होते. त्यांची नोकरी बदलीची असल्यामुळे यशवंतरावांची बालपणातील काही वर्षे आणि शाळेचा श्रीगणेशा आजोळीच झाला. यशवंतराव म्हणतात, ‘माझ्या आजोबांचे घर काय किंवा वडिलांचे घर काय हे सामान्य शेतकऱ्याचे घर होते आणि सामान्य शेतकऱ्याच्या वाट्याला येणाऱ्या ज्या गोष्टी असतात, त्या सर्व आमच्याही वाट्याला आल्या होत्या.’ त्यांच्या वडिलांची काही दिवसातच दहिवडीस बदली झाली. चार-पांच वर्षे झाल्यानंतर पुन्हा त्यांची कऱ्हाडला बदली झाली. यशवंतरावांना ज्ञआनोबा, गणपतराव हे दोन मोठे भाऊ तर राधाबाई ही त्यांची वहीण होती. सर्व संसार सुरीत चाललेला होता. पण काय दुर्दैव! प्लेगच्या जीवघेण्या साथीच त्यांचे वडली बळवंतरावांचे देवराष्ट्रे येथे १९१७ साली दुःखद निधन झाले. मुले पोरकी झाली! सर्वजण लहान होते. लहान वयातच घरातील कर्तापुरुष जामे हा फार मोठा आघाता होता. हा आघात चव्हाण कुटुंबाला सहन करावा लागला. वयाच्या चौथ्या वर्षी ते पितृछायेला पारखे झाले. आभाळ फाटल्यासारखे झाले पण तिने यंशलंतरावांच्या आईने – आलेल्या परिस्थितीशी 'झुंज' द्यायचे ठरविले.

बळवंतरावांचे सहकारी व जीवाभावांचे मित्र श्री. शिंगटे हे सुद्धा कऱ्हाड कोर्टात बेलीफ होते. बळवंतराव कऱ्हाड कोर्टात बदलून आल्यापासून त्यांच्या घरी श्री. शिंगटे याचं येणं जाणं होतं. त्याच्या सहकार्याने कऱ्हाडच्या जज्ञ साहेबांचे शिफारस पत्र घेऊन यशवंतरावांची आई सातारच्या न्यायाधीशाकडे गेल्या व त्यांनी आपल्या थोरल्या मुलास वडिलांच्या जागेवर नोकरी मिळवून दिली.

यशवंतरावांचे मामा दाजी घाडगे यांनी देवराष्ट्राच्या प्राथमिक शाळेत यशवंतरावांचे नांव घातले. मामाच्या गांवीच त्यांचे मराठी मराठी चौथीपर्यंत प्राथमिक शिक्षण पार पडले. थोरल्या बंधूंची इच्छा मात्र यशवंतानं कऱ्हाडात शिक्षण घ्यावं, इंग्रजी शिकावं अशी होती. यशवंता चौथी इयत्ता पास होताच ज्ञानोबानं त्यास कऱ्हाडला आणलं.

कऱ्हाडमध्येच यशवंतराव मराठी सातवी पास झाले. यशवंतरावांनी इंग्रजी शिकावं असं दोन्हीही बंधूंची इच्छा होती. त्यानुसार १९२७ साली यशवंतरावांना टिळक हायस्कूलमध्ये दाखल केले.

बळवंतरावांचे निधनानंतर यशवंतरावांच्या मोठ्या भावाने त्यांच्या कुटुंबियांची जबाबदारी उचलली आणि आईच्या संस्कारसंपन्न व्यक्तिमत्त्वाने त्यांच्या जडणघडणीला मोठा हातभार लावला. त्यांची आई अशिक्षित होती पण शिक्षणाचे मोल जाणणारी होती. आपल्या मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे या ध्यासाने तिने कऱ्हाडलाचा स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. कराड हीच त्यांची संस्कारभूमी आणि कर्मभूमी झाली.

यशवंतरावांचे माध्यमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत ते दर दिवाळीच्या – उन्हाळ्याच्या सुट्टीत देवराष्ट्रयाला जात असत. याच काळात त्यांच्या असे लक्षात आले की, गांवातील माणसे वेगवेगळ्या जातीची असली तरी गरीबीतही आपली माणुसकी टिकविणारी होती. एकमेकांशी माणुसकीच्या नात्याची बांधिलकी होती. पण त्याचबरोबर गावाबाहेर राहणाऱ्या महार, मांग, चांभार यांच्याशी मात्र इतरांचा व्यवहार माणुसकीचा निश्चितच नव्हता ही सल त्यांना त्या काळात होती. त्यांच्या निरीक्षणातून आणखी एक महत्त्वाची गोष्ट त्यांच्या लक्षात आली ती अशी की, 'शेतीशी संबंध असलेला माणूस नजीकच्या राजकीय सत्तेला फार वरीष्ठ मानतो.' यशवंतराव म्हणतात, 'देवराष्ट्रयाच्या या अनुभवाची शिदोरी माझ्या मनाला एक प्रकारचे शिक्षण देत होती. कार्यकर्ता म्हणून कार्य करण्यास लागणारी जी मानाची तयारी असावी लागते आणि सामाजिक जाणिवांची माहिती असणे आवश्यक असते ती यातून मिळत गेली.'

यशवंतरावांचे वास्तव्य कऱ्हाडच्या ज्या भागात होते तिथे कऱ्हाडमधल्या खानदानी मराठा कुटुंबाची वस्ती होती. त्या वेळेस सत्यशोधक चळवळीच्या प्रभावाचा काळ होता आणि बहुजन समाजातल्या

मुला-मुलींनी शिक्षण घेतले पाहिजे, वाचन केले पाहिजे, सार्वजनिक कामात भाग घेतला पाहिजे अशा तऱ्हेचे मानसिक व वैचारिक वातावरण त्यावेळी तेथे होते.

मराठी सातवीपासूनच यशवंतरावांना वृत्तपत्र वाचनाची गोडी होती. सभा-संमेलनामधील भाषणे त्यातील मत-मतांतरे ऐकून स्वतंत्र विचार करून त्यासंबंधी आपल्या बंधुंशी गणपतरावांशी चर्चा करीत असत. शाळा सांभाळून गणेशोत्सवासाठी काम करणे, शिवजयंती उत्सव सुरू करणे या सारखे छोटे – मोठे उपक्रमही ते पार पाडीत होते.

कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्ये एका वर्षात तीन इयत्ता पास करून यशवंतराव हायस्कूलचे विद्यार्थी झाले. निरनिराळ्या लोकांशी संपर्क आल्यामुळे वाचनाच्या व विचारांच्या कक्षा रुंदावल्या. बहुजनसमाजाला आपल्या प्रगतीसाठी शिक्षणाचीच कास धरणे आवश्यक असले तरी कोठल्या जातीचा द्वेष केला पाहिजे हा विचार पटत नव्हता. त्यासाठी अधिक मोठ्या शहाण्या लोकांशी संभाषण व संवाद करायला हवा याची जाणीव त्यांना या काळात झाली.

टिळक हायस्कूलमध्ये टिळकांचे विचार आणि आयुष्य या संबंधाने विद्यार्थ्यांमध्ये निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा दरवर्षी घेत असत, या निमित्ताने टिळकांच्या विचारांचा चांगला अभ्यास झाला. १९३१ मध्ये पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयातर्फे झालेल्या वक्तृत्व स्पर्दधेत भाग घेऊन 'ग्रामसुधारणा' या विषयावर पहिल्या क्रमांकाचे रुपये १५०/- (रुपये एकशे पन्नास) चे पारितोषिक मिळविले.

आपल्या शालेय जीवनापासूनच यशवंतराव अनेक सामाजिक कार्यात, कार्यक्रमात भाग घेत असत. ते म्हणतात, “मी माझा पुष्कळ वेळ नको त्या कामात खर्च करतो. असे गणपतरावांना वाटे आणि त्यांचे ते बरोबरही होते. मी त्यावेळी परीक्षेत कधी नापास झालो नाही परंतु फार उत्तम मार्क्सही कधी मिळविले नाहीत. हे जसे प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत

घडले तसेच बऱ्याच अंशी पुढील शिक्षणाच्या बाबतीतही असेच म्हणता येईल."

कऱ्हाडमध्ये सत्यशोधक चळवळीचे काम करणारी एक प्रमुख व्यक्ती श्री. भाऊसाहेब कळंबे यांच्या संपर्कात आल्यामुळे यशवंतरावांच्या मनावर सत्यशोधकीय व ब्राह्मणेतर चळवळीचे संस्करा नकळत होतच होते. याच काळात केशवराव जेधे आणि दिनकरराव दवळकर यांच्या खळबळजनक भाषणांनी त्यांच्या मनावर मोठा परिणाम घडवला. ब्राह्मण समाजाविषयी अत्यंत कठोर टीका त्यांच्या भाषणात असे. या भाषणांनी त्यांच्या मनात संघर्ष सुरू झाला. टिळकांसारख्या देशभक्तावर जवळकरांनी केलेली टीका योग्य नाही असे त्यांना वाटले. आपण ज्या वातावरणात राहात आणि वाढत आहोत त्यापेक्षा वेगळे ठिकाण, वेगळी माणसे शोधण्याची गरज आहे असे त्यांना तीव्रतेने वाटले.

सार्वजनिक कामात प्रत्यक्ष भाग घ्यायला सुरवात केल्यानंतर वेगवेगळ्या माणसांशी त्यांचे संबंध आले. याच काळात त्यांनी जाणीवपूर्वक वाचन करायला सुरवात केली. महात्मा फुले यांचे चरित्र वाचून 'शेतकरी समाजाची होणारी पिळवणूक, दलित समाजावर होणारा अन्याय आणि शिक्षणापासून वंचित ठेवलेला बहुजन समाज व स्त्रिया यांचे प्रश्न सोडविल्याखेरीज देशाचे कार्य होणार नाही.' हा विचार त्यांच्या मनात रुजला. परंतु कोणत्या एका जातीचा द्वेत करणे त्यांना पटत नव्हते. शालेय स्पर्धांच्या निमित्ताने झालेल्या टिळकांच्या विचारांचा परिचय आणि आता फुल्यांचे विचार या दोन्हीमधअये काही साम्य दिसत नाही. याची त्यांना खंत वाटली परंतु दोघांनीही सांगितलेले विचार महत्त्वाचे वाटत होते. स्वराज्याचा विचार टिळकांनी सांगितला आणि गरिबांची शिक्षणाने प्रगती झाली पाहिजे व समाजात समानता निर्माण झाली पाहिजे, हा विचार महात्मा फुले यांनी सांगितला. हे दोन्ही विचार महत्त्वाचे, म्हणून दोन्ही माणसे आपल्या दृष्टीने मोठीच आहेत, असा निष्कर्ष ते काढतात.

दिवेकर वैद्यांच्या दवाखान्यात येणारी वृत्तपत्रे वाचण्यात आणि त्यांच्या बैठकीत विविध विषयावर रंगणारी चर्चा ऐकणे हा त्यांचा नित्याचा कार्यक्रम झाला होता. यावेळी सायमन कमिशन हिंदुस्थानमध्ये आले आणि त्याला फार मोठा प्रतिकार लोकांकडून झाला होता. अनेक कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबण्यात आले होते. याच सुमारास यशवंतरावांच्या भावविश्वात क्रांती करणारी एक विशेष घटना घडली. राजकीय कैद्यांना तुरुंगात गुन्हेगारासारखी वागणूक मिळते म्हणून यतींद्रनाथ यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. या सर्वांचा परिणाम यशवंतरावांच्या मनावर होत होता. ते अतिशय अस्वस्थ, बेचैन झाले. या घटनेचा परिणाम त्यांच्या जीवनाला देशसेवेचे ध्येय मिळवून देण्यात झाला. आपण आपले जीवन देशकार्यासाठीच वाहायचे. जातीय विचारांच्या संकुचित कोंडवाड्यात अडकून पडावयाचे नाही असा निर्णय त्यांच्या मनाने घेतला.

एके दिवशी लाहोरच्या तुरुंगात भर दुपारी एकच्या सुमारास प्रखर सूर्याला साक्षी ठेवून यतिंद्रदासांनी प्राणाहुती दिली. मातृभूमीसाठी कणाकणाने झिजून त्यांनी तेजस्वी आत्मार्पण केले. या घटनेने यशवंतरावांच्या बालमनावर खोलवर परिणाम केला.

कराडमध्ये कार्यकर्ता म्हणून काम करीत असताना एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली की, समाजाच्या सर्व थरांमध्ये राष्ट्रीयत्वाचे वातावरण असले तरी बराचसा मुसलमान समाज व अस्पृश्य समाज यात मात्र एक प्रकारची तटस्थता आहे. या गोष्टीबद्दल आपल्या बंधुंशी चर्चा करून या समाजात मुद्दाम जाऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात त्यांचे प्रश्न समजून घेण्यास यशवंतरावांनी सुरुवात केली. या साऱ्यातून त्यांनी असा निष्कर्ष काढला की, 'या चळवळीशी तटस्थ आणि विरोधी असणारे जे शहारातील लोक आहेत आणि खेड्यापाड्यातून पसरलेला जो ग्रामीण समाज आहे त्यांचे मन जागे केल्याशिवाय चळवळ वाढणे अवघड आहे.'

गांधीजींचा दांडी मोर्चा याच सुमारास सुरू झाला आणि बघता बघता सारे वातावरण बदलून गेले. यशवंतराव म्हणतात, 'शांत, एकाकी, अविचल व स्थिर असा एखादा पाण्याचा डोह असावा आणि अचानक कुठून तरी वादळी, सोसाट्याचा वारा यावा म्हणजे त्यावरती जसे लाटांचे तरंग उठू लागतात. तसेच शांत पहुडलेल्या या समाजाचे होऊ लागले.' देशात सर्वत्र संधी सापडेल तेथे मीठ व जंगल सत्याग्रह होऊ लागले. सभा-भाषणातून जनसागर ढवळून निघाला. कराडमध्येही जवळजवळ रोज कृष्णेच्या घाटावर सभा होत असे, यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, काकासाहेब गाडगीळ यांच्या भाषणांचा यशवंतरावांचेवर विशेष प्रभाव पडला.

यशवंतरावही आंदोलनात मागे नव्हते. रोज सकाळी प्रभात फेरी काढून कराड शहरात व संध्याकाळी आसपासच्या खेड्यात जाऊन लोकशिक्षणाचा कार्यक्रम त्यांनी उत्साहाने चालू ठेवला होता. तालुक्यात गावोगावी सभांमध्ये भाषणे केल्यामुळे यशवंतरावांचे कार्यक्षेत्र, सामाजिक संबंध विस्तारत व आकारत होते.

यशवंतराव वयाच्या चौथ्या वर्षीच पितृप्रेमाला वंचित झाले तेव्हापासून आईनेच त्यांना, त्यांच्या भावंडांना दुपटीने प्रेम देऊन वाढविले. परिस्थितीने गांगरून जायचं नाही हा पहिला धडा यशवंतराव लहानपणीच आईकडून शिकले. अत्यंत बिकट परिस्थितीतही मुले परावलंबी होणार नाहीत आणि शिक्षणाकडे दुर्लक्ष करणार नाहीत याची काळजी आईने घेतली.

यशवंतरावांची आई साधी भोळी, श्रद्धाळू, धार्मिक आणि वृत्तीने सरळ होत्या. संपत्तीनं नसल्या तरी संस्कारांनी श्रीमंत होत्या. हीच श्रीमंती त्यांनी यशवंतरावांना दिली. ईश्वर आपल्या पाठीशी आहे, ही मातेची निष्ठा. या निष्ठेने त्यांनी जीवनभर संकटाशी सामना केला. हिंमत सोडू नये, असा मुलांना उपदेश करताना आई एक ओवी म्हणत असे.

‘नका बाळांनो डगमगू! चंद्रसूर्यावरील जाईल ढगू’ आईचा हा संदेश यशवंतरावांच्या मनीमानसी चांगलाच रुजला. संकटे आली तरी ज्या वाटेने येतात त्याच वाटेनं ती निघूनही जातात. हा घडा आईच्या सान्निध्यात लहानपणापासूनच गिरवला गेलेला असल्यानं यशवंतराव पुढे कोणत्याही संकटात डगमगले नाहीत.

आईची देवाधर्मावर श्रद्धा होती. रामकखेविषयी मनात नितांत आदराची भावना होती. आई मधून मधून यशवंतरावांच्याकडून साखरेबुवांची “सार्थ ज्ञानेश्वरी” वाचून घेत असे. एकदा यशवंतरावांनी आईला विचारले, “आई तू हे सगळे ऐकून घेतलेस. त्याचा सारांश तुझ्या मनाशी काय आला?” तिने एका वाक्यात सांगितले, “कृष्णदेव अर्जुनाला सांगतात, की तू आपला मी पणा सोड आणि जे तुझे काम तू केले पाहिजेस, ते तू करीत रहा. असे सगळे ते सांगत आहेत आणि ते बरोबर आहे.”

यशवंतराव म्हणतात, ‘गीतेचा इतका सरळ, साधा आणि सोपा आशय मी दुसऱ्या कुण्या पंडिताकडून ऐकलेला नाही तिची समज चांगली होती. मन धैर्यशील होते आणि उदार होते. आमची खरी शाळा आमची आई होती.’

यशवंतराव राष्ट्रीय चळवळीत सामील झाल्यानंतर त्यांना स्वतःला तर संकटांशी झुंजावं लागलंच, शिवाय कुटुंबातील सर्वांनाच त्याची झळ बसू लागली. त्यामुळे सर्वांची मनं बेचैन होणं स्वाभावितक होते. परंतु त्या परिस्थितीतही आईनं त्यांना मागे खेचलं नाही. आईने दिलेली ही संस्काराची, श्रद्धेची शिदोरी यशवंतरावांना आयुष्याच्या वाटचालीत प्रेरक ठरली.

यशवंतराव कराडात टिळक हायस्कूलमध्ये शिकत होते. त्या वेळच्या समाजाची ही स्थिती ते पहात होते. अनेक विषयांवर त्यांचं वाचन आणि स्वतंत्र विचार चालूच होता.

यतींद्रनाथांनी देशासाठी प्राण दिली या घटनेनं सारा देश बेचैन झाला.

यतींद्रनाथाच्या आत्मार्पणाचा तरुण यशवंतरावांच्या मनावर विशेष परिणाम झाला. या एका घटनेने त्यांच्या चित्तवृत्तीत कायमचा बदल झाला. कराडचे त्यावेळचे नेते श्री. बाबूराव गोखले, गणपतराव अळतेकर व त्यांचा मुलगा टिळक हायस्कूलमधील राष्ट्रीय वृत्तीच्या शिक्षकांच्या शिकवणुकीचा यशवंतरावासमोर आदर्श होताच. ही घटना मनावर झालेले संस्कार आणि सभोवतालचं वातावरण यातून मग राजकीय आंदोलनात स्वतःला झोकून देण्याची कठीण राजकीय तपश्चर्या सुरू झाली. संवेदनक्षम बनलेल्या मनानं झेप घेतली. सविनय कायदेभंगाची मोहीम देशात सुरू टिळक हायस्कूलमध्ये झेंडावंदन करून या आंदोलनात उडी घेतली ती १९३० मध्ये! त्यावेळी ते सहाव्या इयत्तेत होते. परंतु त्यापूर्वीच म्हणजे १९२७-२८ पासूनच त्यांनी सार्वजनिक कामाला वाहून घेतले होते. शिवजयंती उत्सव, गणेशोत्सव यात प्रमुखपणानं भाग घेणे अशी कामं सुरू करून सार्वजनिक कामाचे अनेक व्याप वाढवत होते. चळवळी कराव्यात, सार्वजनिक कामे करावीत ही हौस त्यांनी आपल्याला त्यावेळीच लावून घेतली. १९३० साली चळवळीत प्रत्यक्ष भाग घेण्याचं ठरवून त्याचा प्रारंभ टिळक हायस्कूलमधील झेंडावंदनाच्या कार्यक्रमापासून सुरू केला.

याच काळात बिळाशी येथील जनतेने शांततापूर्ण असहकाराचा मार्ग स्वीकारून त्या परिसरातील कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने एक वेगळेच वातावरण निर्माण केले होते. गांधीजींच्या असहकाराच्या मूलमंत्राचे प्रात्यक्षिक तेथे घडत होते. सरकार अत्याचार करून हे बंड मोडून काढण्याचा प्रयत्न करीत होते. तेथे चाललेल्या दडपशाहीविरुद्ध तेथील नागरिकांना दिलासा देण्यासाठी, आपण त्यांचेबरोबर आहोत हे सांगण्यासाठी कऱ्हाडमधून दोन कार्यकर्ते बिळाशी परिसरात पाठवावेत असे कार्यकर्त्यांच्या बैठकीत ठरले आणि कामगिरीसाठी निवड झाली ती राघूअण्णा लिमये आणि यशवंतराव यांची.

आपली ही मोहीम यशस्वीपणे पार पाडून, पोलिसांना चकविण्यासाठी

ते दोघे मलकापूरहून कोकणात रत्नागिरीला गेले. यशवंतरावांना रत्नागिरीचे आकर्षण दोन कारणांसाठी होते. एक समुद्र आणि दुसरे स्वातंत्र्यवीर सावरकर.

प्रयत्नपूर्वक सावरकरांची भेट घेऊन, त्यांना बिळाशीच्या बंडाची हकीकत सांगून त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोलण्याचे भाग्य यशवंतरावांना या कामगिरीने मिळवून दिले. यशवंतराव म्हणतात, 'सागर आणि सावरकर हे रत्नागिरीत एकाच वेळी पाहण्याचे भाग्य लाभल्यामुळे रत्नागिरीची माझी आठवण त्या भेटीशी कायमची संलग्न झालेली आहे.'

बालवयात यशवंतरावांना कुणी द्रष्टा मार्गदर्शक भेटला आणि त्याने त्यांचा मार्ग अचूकपणे आखून दिला असेही नाही.

यशवंतराव अंगच्या वाढीने वाढले. देशकाल-परिस्थिती घडवील तसे घडले गेले. स्वतःच्या पायांनी चालू लागले. मागे उमटलेल्या पदचिन्हांच्या पाऊलवाटा झाल्या. त्यांच्या चालणाऱ्या पायातूनच जणू त्या वाटांचे उगम झाले त्या अनुसरत चालणारे असंख्य अनुयायी त्यांना लाभले.

यशवंतरावांचे बाल्य, पोरकेपण, त्यांचे आईबद्दलचे प्रेम, भावंडावरील प्रेम या सर्वाबरोबच देशकाल – परिस्थितीचा विशाल फलक आपल्या लेखनातून चित्रित करतात. अनेक छोट्या मोठ्या व्यक्ती, घटना यांचे उल्लेख त्यांची स्वतःची मते, प्रतिक्रिया या सर्वांमधून यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या बारकाव्यांसह दिसून येते.

## राजकारणात पदार्पण

१९३० च्या असहकारितेच्या चळवळीच्या वेळी यशवंतराव मॅट्रीकच्या वर्गात होते. सत्याग्रह, प्रभातफेऱ्या यांनी वातावरण भारावून गेलेले होते. गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळीला उधाण आलं होतं. ब्रिटिशांचे राज्य देशातून नष्ट करणं ही एकमेव भावना देश व्यापून उरली होती.

परंतु त्याचवेळी सामान्य माणासाच्या जीवनात आणि आर्थिक परिस्थितीत क्रांती घडविण्याचा राजकीय स्वातंत्र्याचा खोल आशय या चळवळीत निर्माण करण्याचा विचार काँग्रेसमधील तरुणवर्गात बळावत होता. हा नवा विचार घेऊन कार्य करणाऱ्यांचा गट तसा लहानच होता. यशवंतराव हे या नव्या जाणिवेने काम करणाऱ्या मधले होते. सर्वसामान्य लोकांचं जीवन त्यांच्यासमोर होतं. त्यांनी ते जन्मापासून अनुभवलेलं होतं. या लोकांसाठी, त्यांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी काही तरी केलं पाहिजे. या विचारांचा पगडा त्यांच्या मनावर होता आणि त्यातूनच त्यांची पावलं शाळेकडे जाण्याऐवजी प्रभातफेरीकडे वळली आणि इथूनच त्यांच्या जीवनाचा सांधा बदलला.

१९३० सालच्या चळवळीत ग्रामीण समाजाचा प्रतिनिधी वर्ग मोठ्या प्रमाणात जेलमध्ये गेला. हे साधे जेलमध्ये जाणे नव्हते, तर स्वातंत्र्याच्या चळवळीचे व्रत स्वीकारणे होते. ग्रामीण समाजाला जागवण्याचे श्रेय बऱ्याच प्रमाणात विठ्ठल रामजी शिंदे आणि केशवराव जेधे यांना दिले पाहिजे असे यशवंतरावांना वाटते. या काळातील या दोघांचे कायदेभंगाच्या चळवळीतील कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे आहे असे यशवंतरावांचे मत आहे.

सन १९२२ - २३ या काळात सत्यशोधक विचारांची चळवळ

जनमाणसात महाराष्ट्रात प्रभावी होती. पण १९३० मधील कायदेभंगाच्या चळवळीने जोर धरला तेव्हा सत्यशोधक विचारांचा प्रभाव पुष्कळ कमी झाला आणि हा स्वातंत्र्य-संग्राम अधिकाधिक जनताभिमुख होऊ लागला. तेव्हा सत्ताधारी ब्रिटिश अस्वस्थ झाले. या संग्रामाविरुद्ध लोकांतून काही संघटना उभी राहावी यासाठी यशवंतराव प्रयत्न करू लागले, नवे नवे मार्ग शोधू लागले. तरुणपिढी बदललेले वातावरण समजू शकत होती पण सरंजामी पद्धतीचे प्रतिनिधित्व करणारी जुनी मातब्बर घराणी मात्र नव्या लोकशाहीचे वारे न ओळखता जुन्या सरकार निष्ठेला पकडून कायम राहिली होती.

अशा परिस्थितीत कऱ्हाडच्या नगराध्यक्षांनी मुंबई इलाख्याचे गव्हर्नर फेलेडरिक साईक्स यांना कऱ्हाडला निमंत्रण करून त्यांना मोठ्या सन्मानाने मानपत्र देण्याचे ठरविले. या समारंभाविरुद्ध लोकमत जागृत करण्याचा निर्णय चळवळीतील कार्यकर्त्यांनी घेतला. कऱ्हाड शहर, तालुका आणि जिल्ह्यातील काही भागातही मानपत्राचा निषेध करणारी चळवळ उभी राहिली. प्रत्यक्ष कार्यक्रमाच्यावेळी जवळजवळ पंचवीस हजारांचा जमाव हातात काळे झेंडे घेऊन निदर्शने करीत होता. यशवंतराव आणि त्यांचे मित्र, कार्यकर्ते यात प्रथमपासून शेवटपर्यंत सहभागी होते.

यानंतर एक दोन दिवसातच कऱ्हाडमधील महत्त्वाच्या २०-२५ कार्यकर्त्यांना पकडून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. या निदर्शनाचे विराट स्वरूप बघून जे या आंदोलनाच्या बाबतीत उदासीन होते. त्यांच्याही मनात या चळवळीसंबंधी आपुलकी निर्माण झाली. अशा कार्यक्रमांच्या निमित्ताने यशवंतरावांच्या अनेक नवीन नवीन ओळखी होत होत्या. त्यांचे कार्यक्षेत्र विस्तारित होत होते. स्वराज्याची चळवळ १९३० च्या आंदोलनातच शहराकडून खेड्याकडे गेली आणि त्यामुळे एक महत्त्वाचा सामाजिक बदल झाला. हिंदुस्थानच्या सर्व भागातला शेतकरी समाज आता विचारपूर्वक स्वातंत्र्यसंग्रामाच्या पाठीशी येऊ लागला.

यशवंतराव म्हणतात, ‘हिंदुस्थानच्या जीवनात जसा या वर्षाने फरक केला तसाच माझ्याही जीवनात केला. मी आता अनुभवी, विचाराने समजूतदार असा एक कार्यकर्ता बनलो.’

या सर्व आंदोलनात पुढाकरा घेऊन यशवंतराव अनेक प्रकारची कामे करीत. लोकांशी संपर्क ठेवीत असतानाच यशवंतराव इंग्रजी सहावीची परीक्षा उत्तीर्ण झाले. आता शाळेला सुट्टी सुरू झाल्याने काही दिवस देवराष्ट्रेला जाण्याचे ठरविले. जाताना बरीच पुस्तके, कादंबऱ्या घेऊन गेले. भरपूर वाचन, निवांत झोप, गांवातील तरुणांबरोबर चर्चा, गप्पा असा दिवसभराचा कार्यक्रम असे. याच काळात कालिदासाचे ‘मेघदूत’ मुखोद्‌गत केले. मॅट्रीकच्या अभ्यासाकडे अधिक लक्ष देण्याचे ठरविले. पण अचानक एक नवीन काम निघाले आणि ते कऱ्हाडला परत आले.

साताऱ्यात अधून-मधून जिल्हा राजकीय परिषद भरत असे. कराड तालुक्यातील व मसूरमधल्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी ही परिषद मसूरला भरवावी असे निमंत्रण दिले.

या परिषदेसाठी जिल्ह्यातील प्रमुख नेते तसेच पुण्यामुंबईकडील बरेच महत्त्वाचे नेते, कोल्हापूरचे श्री. माधवराव बागल हेही निमंत्रणानुसार आले होते. या परिषदेस मोठ्या संख्येने शेतकरी समाज उपस्थित होता. शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा आवाज भाई माधवराव बागल यांनी उठवला. पिवळ्या जाणाऱ्या शेतकरी समाजाचे जे प्रश्न होते ते या व्यासपीठावर मांडले गेले. याचवेळी यशवंतरावांनी ठरविले की यापुढे चळवळीत भाग तर घ्यायचा, पण तो डोळसपणे घ्यायचा. ते म्हणतात, “मसूरच्या राजकीय परिषदेने मला खूप शहाणे केले. गरिबाचे कैवारी कोण आणि विरोधी कोण हे लक्षात घेऊन स्वातंत्र्याची चळवळ चालविली पाहिजे, असा विचार माझ्या मनाशी येऊन गेला.”

या निमित्ताने यशवंतरावांच्या अनेक नवीन कार्यकर्त्यांशी ओळखी झाल्या. यातील काही प्रमुख व्यक्ती म्हणजे वाईचे किसन वीर,

वाळव्यातले आत्माराम पाटील व पांडुरंग मास्तर, कातरखटावचे गौरीहर सिंहासने आदि.

गांधी-आयर्विन कराराने काँग्रेसची व गांधीजींची शक्ती जनमानसात वाढली होती. जनतेच्या अंतःकरणातले त्यांचे हे स्थान दडपशाहीच्या मार्गाने कमी करण्याचा व्यूह लॉर्ड विलिंग्डनने रचला होता. पंडित नेहरूंना अटक झाली होती. वर्किंग कमिटीच्या मागण्या फेटाळून चार जानेवारीला महात्माजींना अटक करण्यात आली. सरकारच्या या आक्रमक धोरणाविरुद्ध सर्व देशभर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाली. काँग्रेस विरुद्ध ब्रिटिश सत्तेने अघोषित युद्धच पुकारले.

अशा या बदललेल्या वातावरणात यशवंतराव आणि त्यांचे सहकारी स्वस्थ बसले नाहीत. तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक होऊन २६ जानेवारीचा दिवस सर्वत्र संस्मरणीय रीतीने साजरा होईल हे ठरविण्याची जबाबदारी यशवंतरावांवर सोपविण्यात आली.

कऱ्हाडच्या म्युनिसिपल कचेरीवर राष्ट्रीय झेंडा लावायचा आणि गावात चळवळीची पत्रकं चिकटवायची योजना ठरली आणि ती यशस्वीपणे पारही पडली. हे घडताच गावात खळबळ उडाली. सगळीकडे चळवळीचा जोर वाढलेला असल्यानं ब्रिटिश सरकार खवळलं होतं. सर्वत्र धरपकड करण्यात आली. इतरांना दहशत बसावी म्हणून यशवंतरावांना अठरा महिने सक्तमजुरीची शिक्षा फर्मावली गेली.

शिक्षेच्या दुसऱ्या दिवशी आई आणि घरची सर्व मंडळी त्यांना भेटण्यासाठी आली. त्यांच्याबरोबर यशवंतरावांचे एक शिक्षकही होते. इतक्या लहान वयात यशवंताला एवढी मोठी शिक्षा याचे वाईट वाटून आईच्या डोळ्यात पाणी आले. ते दृश्य बघून शिक्षक यशवंतरावांना म्हणाले, ‘फौजदारसाहेब दयाळू आहेत. माफी मागितली तर सोडून देतील’ त्यांचे बोलणे ऐकून आईच म्हणाली, ‘काय बोलता तुम्ही मास्तर? माफी मागायची माफी मागायचे काहीएक कारण नाही. तब्येतीची काळजी

घे, म्हणजे झालं. देव आपल्या पाठीशी आहे.' आईच्या या बोलण्याने आपल्या कामाला आईचा अंतःकरणपूर्व आशीर्वाद आहे. याची यशवंतरावांना खात्री पटली. ते म्हणतात, 'आईच्या या स्वाभिमानी गुणाचा ठेवा अंतःकरणात जतन करून मी कोठडीत परत आलो. मनाने मी निश्चिंत झालो. आज हा प्रसंग आठवतो, तेव्हा आईचा हा मोठेपणा मला किती उदास वळण देऊन गेला हे जाणवते.'

संपूर्ण एक वर्ष यशवंतराव येरवड्याच्या कॅम्पजेलमध्ये राहिले. त्यांच्या जीवनात भावनाशीलता कमी होऊन विचारांची खोली वाढविण्याची प्रक्रिया या जेलमध्येच सुरू झाली.

थोड्याच दिवसात या जेलमध्ये हजारावर कार्यकर्ते आले या लोकांची वेगवेगळ्या बराकीत वाटणी करून व्यवस्था लावण्याचे काम ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी हाती घेतले. जेलमधील निवडक व नामवंत माणसं आणि शिक्षण अर्धवट सोडून सत्याग्रहात सामील झालेले विद्यार्थी कार्यकर्ते यांना एकाच बराकीत ठेवावे असे ठरले आणि बराक नं. १२ या महत्त्वपूर्ण बराकीत यशवंतराव सामील झाले. जाणते लोक बराकीत येऊन विविध विषयांवर चर्चा होऊ लागल्या त्यामुळे जेलमधील वास्तव्य अधिक समृद्ध व सुसंघटित झाले. आचार्य भागवत, एस्. एम्. जोशी, आयुर्वेदात मामा गोखले, पुण्याचे श्री. अतीतकर, वि. म. भुस्कुटे, ह. रा. महाजनी या सारख्या विद्वान, विचारवंतांच्या सहवासात राहून साहित्य, राजकारण, समाजकारण या सर्व अंगांनी यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होण्यास मोठीच मदत झाली. यशवंतराव म्हणतात, 'या जेलच्या वर्ष, सव्वा वर्षाच्या मुक्कामात विद्यार्थी जीवनात वाचले नसेल, तितके मी वाचून घेतले.'

राजकीय विचारांच्या निरनिराळ्या छटा आणि त्यांचा परस्परांशी संबंध याचाही अभ्यास बराकीत वाचन, चर्चा यांच्या माध्यमातून सुरू होता. गांधीवाद हे जीवनाचे एक स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे असे प्रतिपादन करणारे

आणि आक्रमकपणे ते पटवून देणारे आचार्य भागवत यांच्याशी चर्चा करून यशवंतराव स्वतःलाच विचारू लागतात की, ‘आचार्य भागवत प्रतिपादतात त्या अर्थाने मी गांधीवाद स्वीकारला आहे काय?’ आणि त्याचे उत्तर होकारार्थी ‘नाही’ हे उमजून ते अस्वस्थ होतात.

गांधीवादाबरोबच समाजवाद आणि मार्क्सवाद याही विचारांची बराकीत चर्चा होत असे. काही वेळेस एकाचवेळी सगळ्यांचे विचार बरोबर आहेत असेही वाटे तर सगळ्यांचेच म्हणणे बरोबर कसे असेल असेही वाटे. मनाच्या या चलबिचल अवस्थेत यशवंतरावांनी स्वतःपुरता निर्णय घेतला की, “कोणताही निर्णय, कोणी सांगितले म्हणून आपण स्वीकारायचा नाही. विचाराच्या क्षेत्रातील निर्णय हा आपला आपणच केला पाहिजे आणि त्यासाठी आपण वाचन केले पाहिजे. प्रत्यक्ष जनतेत काम करीत असताना आलेल्या अनुभवाच्या आधारे निर्णय घेतले पाहिजेत.”

याच काळात त्यांची मानवेंद्रनाथ रॉय या नावाशी आणि त्यांच्या विचारांशी ओळख झाली.

श्री. भुस्कुटे यांच्याशी चर्चा करून यशवंतरावांनी मार्क्सवादाची ओळख करून घेतली! ‘गौतमबुद्ध आणि येशू ख्रिस्त यांच्यानंतर एवढ्या मोठ्या मानव समाजाच्या जीवन पद्धतीवर परिणाम करणारा कोणी तत्त्ववेत्ता असेल तर तो मार्क्सच’ असं यशवंतराव म्हणतात.

एक वर्षानंतर त्यांना विसापूर जेलमध्ये पाठविण्यात आले. येरवडा कारावासातील आपल्या वास्तव्याबद्दल यशवंतराव लिहितात, “घर सोडताना जसे दुःख होते, त्याच्यापेक्षा काहीसे जास्त दुःख मला हा जेल सोडताना होत होते. ही एक वर्षाची जेलची आनंददायी संगत जन्मभर राहील, अशी होती. तेथे भेटलेली माणसे, वाचलेली पुस्तके, तेथे झालेल्या चर्चा, त्यातून आलेली नवी जाण, या सर्व जीवनाला शक्ती देणाऱ्या व पोषक गोष्टी होत्या त्यामुळे माझ्या मनामध्ये कृतज्ञतेचा भाव आला आणि माझे डोळे अक्षरशः भरून आले.”

जेलची शिक्षा १५ महिन्यासाठी असली तरी त्यामुळे यशवंतरावांची शाळेची दोन वर्षे फुकट गेली होती. ‘आता आपण शाळेत जाणार’ असे त्यांनी सांगताच त्यांच्या घरच्यांना व मित्रांना ही गोष्ट खरी वाटली नाही पण यशवंतरावांचा ठाम निश्चय होता की, स्वातंत्र्य संग्रामामध्येही शिक्षण, ज्ञान, विचारशक्ती यांची किती आवश्यकता आहे याचा अनुभव त्यांनी नुकताच जेलमध्ये घेतला होता.

राजर्षि शाहू महाराज यांची शिक्षणाविषयीची विशिष्ट दृष्टी होती. त्यामुळे कोल्हापूर हे शहर गोरगरीबांसाठी एक अतिशय महत्त्वाचे शिक्षणकेंद्र बनले होते. यशवंतराव उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरला दाखल झाले. त्यावेळी तिथलं वातावरण शैक्षणिकदृष्ट्या भारलेलं होते, यशवंतरावांचे अनेक स्नेही येथे होते. त्यामुळे इथे आल्यानंतरही सार्वजनिक कामाचा धागा अतूट राहिला.

यशवंतरावांनी राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांनी इतिहास आणि अर्थशास्त्र हे विषय घेतले होते. त्यावेळी कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. बाळकृष्ण, प्रा. ना. सी. फडके, कवी माधव ज्युलियन असे एकापेक्षा एक सरस अध्यापक होते. यशवंतराव हे डॉ. बाळकृष्ण यांचे आवडते विद्यार्थी झाले. आपला विद्यार्थी राष्ट्रीय चळवळीत आघाडीवर आहे याबद्दल त्यांना अभिमान वाटे. अभ्यासाकडे या विद्यार्थ्यानं लक्ष दिलं पाहिजे असा मात्र त्यांचा कटाक्ष असे. यशवंतराव इंटरला असताना आजारी पडले. त्यामुळे कॉलेजचे दिवस पूर्ण भरले गेले नाहीत. तरीपण प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांनी टर्म भरून घेऊन त्यांना परीक्षेला बसण्यास परवानगी दिली आणि तीत ते उत्तीर्णही झाले.

शिक्षणासाठी यशवंतराव शरीराने कोल्हापुरात राहिले, तरी मनाने सातारा जिल्ह्यात वावरत होते. सातारा जिल्हा राजकीयदृष्ट्या अतिशय जागरूक बनला होता. १९३० सालच्या चळवळीपासून स्वातंत्र्य चळवळीचं लोण शेतकऱ्यांच्या झोपड्यापर्यंत पोहोचल्यानंतर बहुजन

समाजातील तरुण काँग्रेसच्या राजकीय प्रवाहात येऊन सामील होऊ लागले. हा प्रवाह वाढून विधायक कामासाठी त्याचा उपयोग व्हावा यासाठी नव्या पिढीतल्या तरुणांनी यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्हा काँग्रेसची आखणी सुरू केली.

यशवंतराव शिक्षण घेत असतानाच आठवड्यातून तीन दिवस सातारा जिल्ह्यातील संघटनेच्या कामासाठी खर्च करीत राहिले. एक विचारवंत कार्यकर्ता म्हणून सातारा जिल्हा त्यांना मानत होता. पक्षाची संघटना मजबूत करण्याचे काम यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली गती घेत होते. लहान मोठ्या गावातून हिंडताना अनेकांचे परिचय झाले. माणसं पारखण्याचे शिक्षण त्यांना या भ्रमंतीतून मिळत गेले. हा फार मोठा फायदा झाला. कॉलेजच्या वर्षातील सात-आठ महिने राजकीय जागृतीचे काम खेड्यापाड्यातून बहुजन समाजात हिंडून फिरून करायचं आणि परीक्षेच्या अगोदरचे दोन महिने अभ्यास करून परीक्षा द्यायची. अशा क्रमानेच १९३८ मध्ये बी.ए. पदवी त्यांनी संपादन केली.

कारावासात असतानाच निरनिराळ्या राजकीय प्रवाहांशी त्यांचा चांगला परिचय झाला होता. आधी पदवी शिक्षण आणि प्रत्यक्ष कार्य करीत असतानाही त्या वैचारिक संघर्षाने त्यांचा पिच्छा सोडला नव्हता. गांधीवाद, समाजवाद आणि रॉयवाद यांच्या विचारांबद्दलचे आकर्षण अशा एका वैचारिक त्रिकोणात ते उभे होते. ते मोकळेपणाने आपल्या मनातील संघर्षाबाबत कार्यकर्त्यांशी, मित्रांशी चर्चा करीत असत. अशा परिस्थितीत स्वतःवर कोणतेही लेबल चिकटवून घेण्याची घाई न करता लोकांमध्ये संघटनेने काम करीत राहणेच त्यांनी हिताचे मानले.

१९३६ साली प्रथमच राज्याच्या विधिमंडळाच्या निवडणुका होणार होत्या. काँग्रेस संघटनेवर त्या काळात उच्चभ्रू मंडळी अधिकार सांगत असत आणि अधिकार गाजवत असत. आगामी निवडणुकीतील उमेदवार हा सुशिक्षित, शक्य तर वकील वर्गातील असावा असे जिल्ह्यातील ज्येष्ठ

नेत्यांचे मत होते. पण जिल्ह्यातील तरुण वर्गांचही एकमत होते. उमेदवार हा १९३० च्या प्रत्यक्ष चळवळीतून आलेला असावा असा त्यांचा आग्रह होता. चळवळीत जे प्रत्यक्ष उडी घेतात, हालअपेष्टा भोगतात, त्यांना कामाची, वेगळ्या प्रकारची आणखी संधी मिळावी आणि मिळणाऱ्या सत्तेचा उपयोग सामान्य माणसाचं जीवन सुधारण्यासाठी व्हावा असं तरुण गटाला वाटत होतं. या तरुण कार्यकर्त्यांनी आपला दृष्टिकोन जिल्ह्यातील मान्यवरांना पटवून देण्याचा परोपरीनं प्रयत्न केला. परंतु तरुणांनी सुचविलेले उमेदवार श्री. आत्माराम पाटील यांना उमेदवार म्हणून स्वीकारण्यास मान्यवर तयार झाले नाहीत. किंबहुना उमेदवार कोण असावा हा प्रश्‍न त्यांनी प्रतिष्ठेचा बनविला आणि त्यातून मग अंतर्गत संघर्ष वाढत राहिला.

जिल्हा पातळीवर या वादाचा निर्णय होत नाही असं जेव्हा निश्चित झालं तेव्हा ज्येष्ठ काँग्रेस नेत्यापर्यंत हे गाऱ्हाणं न्यावं आणि आपला दृष्टिकोन स्पष्ट करून त्याला मान्यता मिळवावी असा विचार तरुण गटामध्ये बळावला. बहुजन समाजाचे प्रतिनिधी असलेले आत्माराम पाटील यांच्या पुढारीपणावर व निवडणुकीच्या निमित्ताने शिक्कामोर्तब करण्याची संधी आलेली असताना परंपरावादी नेतृत्वाला हे मान्य होत नव्हतं. अखेर काँग्रेस श्रेष्ठीकडून न्याय मिळविण्याची कामगिरी यशवंतरावांवर सोपविण्यात आली. ठरल्याप्रमाणे यशवंतराव पुण्यात दाखल झाले आणि महाराष्ट्र काँग्रेसचे नेते शंकरराव देव यांच्याशी त्यांनी चर्चा केली.

आत्माराम बापू पाटील यांनीही प्रांतिक पुढाऱ्यांशी चर्चा केली. परंतु त्यांना काही निर्णयात्मक सांगितले नाही. शेवटी साताऱ्याच्या बैठकीत कार्यकर्त्यांनी निर्णय घेतला की, आपण सरदार पटेल यांच्यापर्यंत आपले म्हणणे मांडले पाहिजे या कामगिरीसाठी यशवंतरावांनी एकट्यानीच त्यांना भेटून यावे असे ठरले.

यशवंतराव यावेळी बी.ए. च्या वर्गातले विद्यार्थी होते. ज्येष्ठ – श्रेष्ठ

नेत्यांना भेटण्याचा आणि बोलण्याचा अनुभव संग्रही नव्हता. पण कार्यकर्त्यांचा आग्रहासाठी आणि आपल्या योग्य बाजूला न्याय मिळविण्याच्या इच्छेने त्यांनी हे धाडस केले. प्रयत्नपूर्वक त्यांनी सरदारांची भेट मिळवली आणि धाडस करून त्यांना सांगितलं, "मी महाराष्ट्रातला एक कार्यकर्ता आहे. आमच्या सातारा जिल्ह्यातल्या निवडणुकीत नव्या कार्यकर्त्यांचा प्रतिनिधी जो शेतकरी उमेदवार आहे, त्याला मान्यता मिळावी या करता आम्ही प्रयत्न करतो आहोत. या सर्व कार्यकर्त्यांनी मला तुमच्याकडे पाठविले आहे. आमच्या जिल्ह्यातील आणि प्रांतातील नेते काय करतील यासंबंधी आमच्या मनात शंका आहे आणि म्हणून तुमच्या कानावर ही गोष्ट घालावी म्हणून आलो."

ही कामगिरी संपवून यशवंतराव कॉलेजसाठी कोल्हापूरला गेले आणि एक दोन दिवसातच त्यांना आत्माराम बापूंचे नाव उमेदवार म्हणून स्वीकारले गेल्याचा निरोप मिळाला. यशवंतरावांच्यावर सरदार भेटीचा चांगलाच उपयोग झाला होता.

या निवडणुकीच्या प्रचारासाठी यशवंतराव आणि त्यांचे कार्यकर्ते यांनी जीवाचे रान केले. या निवडणुकीच्या प्रचारासाठी पंडित नेहरू आणि मानवेंद्रनाथ रॉय यांच्या सभा सातारा कऱ्हाड येथे झाल्या. निवडणुकीचा प्रचार यथासांग पार पडला. आणि कॉँग्रेसच्या उमेदवारापैकी आत्माराम पाटील सर्वात जास्त मते मिळवून निवडून आले.

यशवंतराव म्हणतात, "या निवडणुकीच्या निमित्ताने माझ्या असे लक्षात आले की, मी सुद्धा सातारा जिल्ह्यातील महत्वाचा घटक बनलो आहे. ही भावना मनाला प्रसन्न करणारी होती आणि त्याचबरोबर त्या क्षेत्रात अधिक उमेदीने काम करण्याकरिता प्रोत्साहन देणारी अशी होती."

१९३८ साली बी.ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर एल्.एल्.बी. होण्याचा निर्णय त्यांनी मित्रांशी चर्चा करून घेतला.

यावेळेपर्यंत ही यशवंतरावांच्या मनातील राजकीय विचारांची यळबळ

थांबली नव्हती. १९३४ मध्ये कॉंग्रेस समाजवादी पक्ष स्थापन धाला त्यावेळी ते सुरवातीला तिकडे आकर्षित झाले. या पक्षात अच्युतराव पटवर्धन, एस्.एम्. जोशी, ना.ग. गोरे अशी कर्ती माणसं होती. त्यांच्याबद्दल यशवंतरावांच्या मनात आदर होता परंतु ते इथे फार काळ रमले नाहीत.

समाजबादाच्या चळवळीबद्दल यशवंतरावांनी आपल्या मनात विचारांची काही जुळणी केली होती. स्वातंत्र्याची चळवळ ही इंग्रजाचं राज्य घालविण्यापुरती मर्यादित नाही. समाजातील विषमता दूर केली पाहिजे, नवीन समाज-रचना आणली पाहिजे हा चळवळी संबंधीचा मनात पक्का विचार होता. पंडित नेहरू यांनी फैजपूर कॉंग्रेसमध्ये आणि आत्मचरित्रातही समाजवादाचा विचार स्पष्टपणे मांडला असल्यानं पंडितजींच्या नेतृत्वाचा ठसा यशवंतरावांच्या मनावर टिकून राहिला होता. कॉंग्रेसच्या चळवळीचं आकर्षण त्यांचा मनाला निरंतर राहिलं ते त्यामुळेच.

समाजवादाच्या चळवळीत त्यांच मन रमलं नाही है खरं पण १९३६-३७-३८ च्या सुमारास एम्.एन्. रॉय यांच्या विचारांनी त्यांच्या मनाची पकड घेतली आणि रॉय यांच्या रॅडिकल कॉंग्रेस जनांच्या मेळाव्यात यशवंतराव काही काळ दाखल झाले.

अशा परिस्थितीत निश्चित ध्येय गाठण्यासाठी रॉय यांच्या मार्गाने झेप घ्यायची की गांधी-नेहरूंच्या मार्गाने झेप घ्यायची अशा प्रकारच्या मनाच्या द्विधा अवस्थेच्या टोकावर ते आता उभे होते. कोणच्या मार्गाने सामाजिक हित अधिक साध्य होऊ शकेल याचा विचार मनाशी चालला होता. आपल्या मनातील विचार कार्यकर्त्यांसमोर मांडून सर्वांच्या विचारांनी सर्वांबरोबर निर्णय घ्यायचा ही गोष्ट त्यांनी कधीही मनाआड केली नाही. याच काळात आत्माराम बापू पाटील पूर्णतया रॉयसाहेबांना वाहून घेण्याच्या मनःस्थितीत होते. यशवंतरावांचा त्यांना सल्ला होता की, "तुम्ही

जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी आहात. सामान्य जनतेपासून बाजूला पडाल, असे काही करू नका." परंतु यशवंतरावांच्या या राजकीय मित्राचे आणि त्यांचे मार्ग इथे वगळे झाले.

"जेथे गांधी-नेहरू, तेथे मी" असा यशवंतरावांचा ठाम निर्णय झाला आणि त्यांच्या मनातील राजकीय विचारांची वावटळ संपून स्वच्छ मनाने आणि उत्साहाने ते पुढील कार्यास सिद्ध झाले.

इथे यशवंतरावांच्या चरित्रातील महाविद्यालयीन जीवनाचा हा काळ अनेक घडामोडीनी, वैचारिक संघर्षानी आणि प्रत्यक्ष कार्यांनी गजबजले आहे. संघटना कौशल्य, राजकीय धोरणीपणा आणि समायोचित वक्तृत्व याबाबत यशवंतरावांची या काळात कसोटीच लागून केली. यशवंतरावांच्या सामाजिक आणि राजकीय कर्तृत्वाची भविष्यवाणीच या काळात सातारा जिल्ह्याला ऐकवली.

पदवी परीक्षेनंतर कायद्याचा अभ्यास करण्याचे ठरविले. आर्थिक तजवीज म्हणून विट्याची वडिलोपार्जित शेती विकून त्यांनी पुण्याला प्रस्थान ठेवले. अनेक राजकीय आणि सांस्कृतिक चळवळीचे केंद्र असलेल्या पुण्यात राहता आले तर आपला दृष्टिकोन अधिक व्यापक होण्यास मदत होईल. नवे वातावरण ही अनुभवण्यास मिळेल, अशी त्यांची धारणा होती. योगायोग असा की, आत्माराम पाटील हे त्यावेळी पुण्याला होते. यशवंतरावांनी त्यांच्याबरोबर त्यांच्या घरीच राहून कायद्याचा अभ्यास असा आत्माराम बापूंचा आग्रह होता. यशवंतरावांनी त्यांच्या आग्रहाचा मान ठेवला आणि जवळजवळ एक वर्ष ते त्यांच्या कुटुंबातील एक होऊन राहिले.

लॉ कॉलेजची समृद्ध लायब्ररी, वाङ्मयीन आणि राजकीय अभ्यास मंडळे, सबा संमेलने या सर्व ठिकाणी यशवंतरावांची आवर्जून उपस्थित असायची पुण्यातल्या या राजकीय – सामाजिक, सांस्कृतिक घडामोडीशी आपले धागेदोरे जुळवून घेत असतानाच महिन्या – दोन

महिन्यानी सातारा जिल्ह्यात जाऊन तिथल्या कार्यकर्त्यांशी संबंध ठेवण्याचे काम ही यशवंतराव जाणिवपूर्वक करीतच होते. या सर्वांचा परिणाम १९३९ साली पहिल्या वर्षाच्या कायद्याच्या परीक्षेत नापास होण्यात झाला. ही गोष्ट यशवंतरावांच्या मनाला लागून राहिली. आता त्यांनी आपली राहण्याची स्वतंत्र्य व्यवस्था केली आणि पुढच्या सहा महिन्यानंतर ते ही परीक्षा उत्तीर्ण झाले.

याच काळात सप्टेंबर महिन्यातील एका संध्याकाळी अकल्पित आणि सर्वांच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली. दुसरे महायुद्ध सुरू झाले. या एका घटनेमुळे जसे पुढे जगाचे चित्र बदलले, तसे हिंदुस्थानच्या राजकारणाचे चित्रही बदलायला सुरवात झाली. प्रत्येक राजकीय पक्ष आणि पुढारी आपापल्या परीने या युद्धाची मीमांसा करू लागले. वसाहतवाद विरूद्धच्या लढ्यासाठी काँग्रेस निश्चित स्वरूपाचं असं काही करत नव्हती आणि सर्वत्र केवळ चर्चा सुरू होत्या. या परिस्थितीने यशवंतरावांच्या मनाचा कोंडमारा केला. काहीतरी करण्यासाठी मन धडपडत होते. पण कुणी काही करीत नव्हतं आणि करूही देत नव्हतं. या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी त्यांना मार्ग दिसला तो कम्युनिस्ट बनण्याचा. कम्युनिस्टांच्या भडक घोषणांचे आकर्षण त्यांच्या तरुण मनात निर्माण झाले त्यामुळे त्याचं अभ्यासावरचं लक्ष उडालं तासन् तास कुठेतरी बसून या काळा काय केले पाहिजे या विचारात ते दिवस काढीत होते. त्यांचे मित्र आत्माराम पाटील, ह. रा. महाजनी वगैरेनी काँग्रेस सोडलीच होती. त्या संबंधात ही विचार करणं सुरूच होतं आणि त्यातूनच एक दिवस युद्ध विरोधी कार्यक्रमाच्या आखाड्याच उतरलेल्या कम्युनिस्ट पक्षाबरोबर का जाऊ नये असा त्यांनी विचार केला.

मनाचा कौल झाला खरा, पण कम्युनिस्ट पक्षाची दोरी प्रत्यक्ष गळ्यात अडकविण्यापूर्वी आणि लाल तारा डोक्यावर धरण्यापूर्वी, रात्रंदिवस ज्यांच्या बरोबर काँग्रेसचं काम केल, त्यांच्याशी चर्चा करून, त्यांना

विश्वासात घेऊन मगच कम्युनिस्टांचे सहकार्य घ्यावे, असं दुसरं मन आतून सांगू लागलं. साथीदार, मित्र, कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करण्यासाठी यशवंतराव साताऱ्याला दाखल झाले. सातारा आणि वाई येथे या विषयावर मग तीन दिवस अहोरात्र चर्चा झाली. पण या चर्चेतून अनुकूल असं काही निष्पन्न झालं नाही. अशा स्थितीत काँग्रेसबरोबर राहूनच स्वातंत्र्य लढा लढायचा आणि काँग्रेसमध्ये राहूनच स्वातंत्र्याची चळवळ करत रहायचं असा मनाशी निर्णय घेऊन यशवंतराव पुण्याला परतले. यशवंतराव म्हणतात, "माझ्या आयुष्याला हा एक मोठा संक्रमण काळ होता. कारण काही तरी घडावे अशी मनाची तीव्रतम अपेक्षा आणि प्रत्यक्षात काही घडत नाही, अशी वस्तुस्थिती या अडचणीत मी सापडलो होतो. त्यामुळे नाही म्हटले तरी मनाची कुचंबणा होत होती. ही कुचंबणा नाहीशी व्हायला या चर्चेने मदत केली."

युरोपमध्ये घडत असलेल्या घटनांनी जागतिक लोकशाही संकटात आहे, असा एक विचार काँग्रेसमध्ये बळावू लागला. योग्य संधी व सन्मान ठेवून स्वातंत्र्याची हमी मिळत असेल, तर युद्धामध्ये सहकार्य द्यावे, अशा तऱ्हेचा विचार वर्कींग कमिटीमध्ये मांडला गेला आणि त्यामुळे महात्मा गांधी आणि वर्किंग कमिटी यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले. देशातील निरनिराळ्या राजकीय प्रवाहांचा आणि प्राप्त परिस्थितीत काय करता येईल यासाठी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक पुण्याला बोलविण्यात आली. या बैठकीला कार्यकर्ता म्हणून यशवंतराव हजर होते.

गांधीजींच्या मार्गदर्शनानुसार प्रानिधिक स्वरूपात सत्याग्रह करण्याची मुभा कार्यकर्त्यांना मिळाली, वैयक्तिक सत्याग्रह करणाऱ्यांची यादी निवडीचे काम गांधीजींनी स्वतःकडे घेतले आणि सर्व देशभर वेगवेगळ्या प्रांतातील व जिल्ह्यातील अनेक माणसे सत्याग्रह करून तुरूंगात जावू लागली. काँग्रेसच्या कार्यकर्त्यामधील कृतीशून्यता संपली याचे यशवंतरावांना समाधान वाटले. सातारा जिल्ह्यातून अनेक प्रमुख

कार्यकर्ते श्री. वि. स. पागे, स्वामी रामानंद भारती, श्री. वसंतदादा पाटील, भाऊसाहेब सोमण, गौरीहर सिंहासने, व्यंकटराव पवार वैयक्तिक सत्याग्रहात सामील झाले.

श्री. व्यंकटराव पवार हे सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते जेलमध्ये गेल्यावर सर्व प्रमुख काँग्रेस कार्यकर्त्यांनी जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदाची जबाबदारी यशवंतरावांनी स्वीकारावी असा आदेश दिला.

यावेळी यशवंतरावांचे कायद्याच्या परीक्षेचे दुसरे वर्ष होते. आईचे त्यांना सारखे निरोप येत होते. 'आता तुझी परीक्षा होईपर्यंत कृपा करून तुरुंगात जाऊ नकोस. परीक्षा झाल्यावर तुला काय करावयाचे ते तू जरूर कर.' यावेळी आईचे म्हणणे मानून यशवंतरावांनी अभ्यासावरच आपले सारे लक्ष केंद्रित केले. एप्रिल मध्ये परीक्षा झाल्या. नंतर यशवंतराव पुण्याहून कराडला परत आले. त्यावेळी त्यांच्यावर जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी होती. जिल्हाभर हिंडून यशवंतराव आपल्यावरची जबाबदारी चोखपणे पार पाडीत होते.

१९४१ साली १९ ऑगस्टला यशवंतराव वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले. आईला व बंधूंना अतिशय समाधान वाटले. आता यशवंतरावांनी वकिली करून घराची काही जबाबदारी उचलावी तसेच लग्न करून गृहस्थाश्रम स्वीकारावा अशी आईची स्वाभाविक इच्छा होती. यशवंतरावांनी आईच्या म्हणण्याला संमती दर्शवून आपले काम जोमाने चालू ठेवले.

याचवेळी सातारा जिल्ह्याच्या जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीत लक्ष घालून बाळासाहेब देसाईना यशस्वी करण्यात फार मोठा वाटा यशवंतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उचलला. सातारा जिल्ह्यातील राजकीय क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून यशवंतरावांची प्रतिमा आता तयार झाली.

गांधीजींनी आतापर्यंत प्रतिकात्मक व प्रातिनिधिक सत्याग्रह या प्रकारचे मार्ग शोधून लोक आंदोलन टाळण्याचा प्रयत्न केला होता परंतु पूर्वेकडील

जपानचे युद्ध जसे आक्रमक स्वरूप धारण करू लागले. तसतशी गांधीजींची भूमिका अधिक जहाल होऊ लागली. जुलैमध्ये वर्ध्यात वर्किंग कमिटीची बैठक झाली त्यात असहकाराच्या चळवळीचा मार्ग गांधीजींनी बोलून दाखविला. संपूर्ण देशात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आणि यशवंतराव व त्यांचे सहकारी नजीकच्या काळातील संग्रामाची तयारी करू लागले.

याच घाई-गडबडीच्या काळात यशवंतरावांच्या वैयक्तिक आयुष्यात एक महत्त्वाची घटना घडली. राजकीय जीवनातून यशवंतरावांना थोडीही सवड नव्हती. अखेर आईचा जास्तच आग्रह झाल्यामुळे ते लग्नासाठी तयार झाले. फलटण येथील स्व. रघुनाथ मोरे यांची कन्या वेणू त्यांची धर्मपत्नी झाली. तो दिवस २ जून १९४२. येथून त्यांच्या आयुष्याच्या नवीन पर्वाला सुरुवात झाली.

१९४१ साली यशवंतराव मुंबईला जाऊन वकिलीच्या सनदा घेऊन आले. एक वर्षभर काही फौजदारी खटले चालविले. कुटुंबाची आर्थिक जबाबदारी उचलली. पण वकिली व्यवसायात त्यांचे मन रमले नाही. हिंदुस्थानचे राजकारण वेगाने पुढे जात होते आणि त्या वेगाच्या प्रवाहात सापडून यशवंतरावही तिकडे खेचले जात होते. त्यांच्या मनाने एक निर्णय ठामपणे घेतला की, 'आमच्या जीवनात राजकारणाला प्राधान्य आहे. कारण राजकारण हे स्वातंत्र्याचे राजकारण आहे आणि आम्ही त्याला मनाने वाहून घेतले आहे.'

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथील गवालिया टँकवर सुरू झाली. यशवंतराव त्यांच्या सहकार्यासह या मिटींगसाठी मुंबईला आले होते. लोकांमध्ये अमाप उत्साह होता. पं. नेहरू, मौलाना आझाद इत्यादी ज्येष्ठ नेत्यांची भाषणे झाली. गांधीजीनी त्यांच्या भाषणात जनतेला सांगितले, 'आजपासून तुम्ही सर्वजण स्वतंत्र झाला आहात, असे समजून काम करावयास लागा. हा शेवटचा लढा

आहे आणि या लढ्याचा मंत्र ‘करू किंवा मरू’ असा आहे. त्यांचे हे शब्द लोकांच्या अतःकरणात विजेसारखे चमकून गेले.

यशवंतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या वेळेस एक महत्त्वाचा निर्णय घेतला की, शक्य तितक्या सगळ्या कार्यकर्त्यांना तुरुंगात जाण्यापासून परावृत्त करून भूमिगत जीवन जगण्याची तयारी करायला सांगायचे. ठरल्याप्रमाणे यशवंतराव आणि त्यांचे सहकारी निरनिराळ्या मार्गांनी स्वतंत्रपणे कऱ्हाडकडे परतले. कऱ्हाडच्या सर्व कार्यकर्त्यांनी अत्यंत तडफेने आणि तत्परतेने पार पाडले आणि इथूनच त्यांच्या भूमिगत आयुष्यातील भटकंतीची वाटचाल सुरू झाली.

या वादळात शिरण्यापूर्वी यशवंतरावांनी आपल्या पत्नीला एक सविस्तर पत्र लिहून तिला परिस्थितीची कल्पना दिली आणि पुढच्या संकटमय जीवनासाठी तिची क्षमा मागून आपल्या मनाची बोच थोडीशी कमी करण्याचा प्रयत्न केला.

सर्वप्रथम सबंध जिल्ह्यात सभा – बैठका घेऊन ‘चले जाव’ची हवा निर्माण करण्याचा प्रयत्न यशवंतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला. सदूभाऊ पेंढारकर, लक्ष्मणराव कासेगांवकर, किसन वीर, डॉ. सोवनी, काशीनाथ देशमुख आदि कार्यकर्त्यांनी जिल्ह्यात आंदोलनाचे वातावरण तयार केले. त्याचबरोबर नव्या पिढीतले कार्यकर्ते गोळा झाले आणि जिल्हाभर उमद्या कार्यकर्त्यांचा एक नवा संच तयार झाला. कार्यकर्त्यांची एक नवी पिढीच तयार झाली.

सर्वत्र सभा घेऊन वातावरण तयार करण्यात पहिले पंधरा – वीस दिवस गेले. जाहीरपणे सभा होत होत्या. यशवंतरावांनी वाई तालुक्यात कवठे येथे एक सभा घेतली. श्री. किसन वीर त्यावेळी हजर होते. या सभेत भूमिगत अवस्थेत राहून काय करायचे याचे आराखडे तयार करण्यात आले. पहिल्या दोन आठवड्यात कऱ्हाड, सातारा, वाई, कोरेगांव, तासगांव, खानापूर, खटाव, पाटण, वाळवे, शिराळे अशा सर्व

तालुक्यात मिळून जवळ जवळ दीडशे सभा झाल्या. या सर्व सभांना ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळत होता. चळवळीला हळूहळू उठाव मिळू लागला. निरनिराळ्या ठिकाणी विविध कामांची तयारी आखणी करीत गुप्तपणे हिंडत राहणं हाच यशवंतरावांचा कार्यक्रम नव्हता. पण लोकांमध्ये अमाप उत्साह होता. त्यातूनच मग सत्ता काबीज करण्याचा प्रतिकात्मक कार्यक्रम सुरू करण्याचे ठरले. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मामलेदार कचेरीवर मोर्चा नेऊन, कचेरीवर राष्ट्रीय झेंडा लावून तिचा ताबा घ्यायचा असा हा कार्यक्रम होता. जनतेने सत्ता काबीज केली आहे याची प्रचिती सरकारला आणून देणं हा यामागे उद्देश होता. त्यानुसार कऱ्हाड, पाटण, तासगांव इत्यादी गावातून हजारो लोकांनी संघटित मोर्चे काढले. 'चले जाव' 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणांनी प्रत्येक लहान मोठे गाव दुमदुमून गेले.

चळवळीनं विराट रूप धारण केलं होतं. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना अटक करून ही चळवळ शमत नाही उलट तीव्र बनत आहे असं पाहून पोलिसांनी भूमिगत नेत्यांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.

यशवंतराव हे जिल्ह्याचे चळवळीचे नेते. त्यामुळे त्यांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू करण्यात आले. पोलिसांनी त्यांना पकडण्यासाठी खूपच धावपळ सुरू केली. त्यांना पकडून देणाऱ्यास हजार रुपयाचे बक्षीस जाहीर केले. एवढे करूनही ते हाती लागत नाहीत असं पाहून पोलिसांनी यशवंतरावांच्या नूतन पत्नी सौ. वेणूबाईंना अटक केली. ही वेणूबाईंवर लग्नानंतरची पहिली संक्रांत होती.

दीड महिन्यानंतर वेणूबाईची तुरुंगातून मुक्तता झाली, पण पोलिसांनी यशवंतरावांचे बंधू गणपतराव यांना स्थानबद्धतेत अडकवून विजापूरच्या तुरुंगात पाठविले.

असेच दिवस पुढे सरकत होते आणि चलेजाव चळवळ अधिक उग्र बनत होती. १९४३ अखेरपर्यंत यशवंतराव जिल्ह्याचे सर्व काम पहात होते.

अखिल भारतीय संघटनेच्या आदेशाप्रमाणेच सातारा जिल्ह्यातील चळवळीचे कार्यक्रम सुरू होते. १९४२ अखेर आणि ४३ च्या मध्यापर्यंत चळवळ सातत्यांन वाढतच राहिल्यानं सरकारची दडपशाही वाढली होती. मार्च-एप्रिलनंतर यशवंतरावही जिल्ह्यातून बाहेर पडले. त्यांना पकडण्यासाठी पोलिसांचा ससेमिरा मागे लागला होता. त्याचवेळी चव्हाण कुटुंबावर एक भयानक संकट कोसळलं. सौ. वेणुबाई तुरुंगातून परतल्या होत्या तर गणपतराव विजापूरच्या तुरुंगात अडकले होते. कशाच्या आधारावर जगायचं असा प्रश्न निर्माण झाला होता आणि याच काळात यशवंतरावांचे थोरले बंधू ज्ञानोबा यांचे १९४३ साली निधन झाले. चव्हाण कुटुंबावर आकाशच कोसळलं.

सौ. वेणुबाईनी स्वतःच्या तुरुंगवासाचा आणि दिराच्या स्थानबद्धतेचा धक्का कसा तरी सहन केला होता. पण ज्ञानोबाच्या मृत्युनंतर त्यांना जबरदस्त धक्का बसला. यशवंतराव सातारा जिल्ह्यात होते तोपर्यंत मधून मधून घरी येऊन जात असत. पण त्यांनी जिल्हा सोडल्यानं आता घरी येणं बंद झालं होतं. जीवाला बेचैन करणाऱ्या गोळीबाराच्या बातम्या रोज येत होत्या. त्यामुळे मानसिक ताण वाढत राहिला आणि त्या धक्क्यानं सौ. वेणुबाई आजारी पडल्या. त्यांची प्रकृती अधिकच ढासळत आहे असं दिसताच माहेरच्या लोकांनी त्यांना फलटणला नेऊन औषधपाणी करण्याचं ठरविलं. पण प्रकृती अधिकच ढासळत गेली आणि एक दिवस तर अतिशय गंभीर बनली. यशवंतराव त्यावेळी पुणे भागात होते. पत्नी मरणोन्मुख अवस्थेत फलटणला आहे आणि पतीला अखेरचं पहावं अशी तिची इच्छा आहे असा निरोप त्यांना मिळाला. निरोप मिळताच पुण्याहून निघून रात्रीच्यावेळी ते फलटणला आले.

त्या रात्री सौ. वेणुबाई अधिकच अत्यवस्थ झाल्यानं ती रात्र तिथेच काढावी असा घरातल्या लोकांचा आग्रह झाला. एक रात्र तिथे काढली तर वेणूबाईच्या प्रकृतीला उतार पडेल असंही त्यांना सांगण्याच आलं. यशवंतरावांनी त्या रात्री तिथे थांबण्याचा निर्णय घेतला. रात्र सरली

आणि पहाटेच दारावर थाप पडली. पोलिस अधिकारी त्यांना पकडण्याच्या तयारीनिशी आले होते. सौ. वेणुबाईंना अत्यवस्थ स्थितीत ठेवूनच त्यांना तुरुंगाची वाट चालावी लागली.

१९४२ ते ४७ सालापर्यंत चव्हाण कुटुंबात हा ऊन-पावसाचा खेळ सुरू होता. यशवंतराव तुरुंगात होते. सौ. वेणुबाईंची प्रकृती यथातथाच होती. प्रपंचाची ओढाताण चालूच होती आणि त्यावेळी गणपतरावांना क्षयानं पछाडलं. विजापूरच्या तुरुंगात त्यांचे हाल झाले आणि प्रकृतीवर गंभीर परिणाम झाला. यशवंतराव तुरुंगात गेले तेव्हा सौ. वेणुबाई आजारीच होत्या. त्या चिंतेत ते असतानाच गणपतरावांची प्रकृती ढासळल्याचं, त्यांना क्षयाची बाधा झाल्याचं यशवंतरावांना समजलं तेव्हा मग कुटुंबाच्या काळजीनं ते १९४५ मध्ये पॅरोलवर सुटून बाहेर आले.

यशवंतराव तुरुंगातून बाहेर आले तेव्हा चळवळ संपलेली नव्हती. परंतु बंधु आजारी असल्यानं त्यावेळी त्यांच्या मनाचा ओढा कुटुंबाचं स्वास्थ्य पहाण्याकडे राहिला. कुटुंबातील वाढत्या जबाबदारीमुळे अर्थार्जन करणं आता आवश्यकच होतं. त्यामुळे त्यांनी कराडात वकिली सुरू करण्याचं ठरविलं. आतापर्यंत कुटुंबाच्या स्वास्थ्याकडे आपण लक्ष दिले नाही याची खंत त्यांना वातट होती. आता राजकारणातले प्रश्न जबाबदारीनं आपणाकडे घ्यायचे नाहीत असं त्यांनी मनाशी ठरवलं. असं ठरवलं असलं तरी त्यांना राजकारणापासून दूर ठेवण्यास लोकांची तयारी नव्हती. शरीराने ते कऱ्हाडला, पण मन मात्र मिरजेला बंधूच्या आजाराकडे असा काळ गेला. आठवड्यातून दोन दिवस त्यांना मिरजेला जावं लागत असे. कऱ्हाडात सार्वजनिक काम सुरूच होतं. महाराष्ट्र काँग्रेसच्या बैठकी पुण्या-मुंबईला होत होत्या. त्यावेळेला त्यांना पुण्या-मुंबईला जावं लागे. त्यामुळे कुटुंबाकडे लक्ष देत असतानाही त्यांचा राजकीय कार्याशी संपर्क राहिला.

कुटुंबात संकटामागून संकटं आणि व्याप असा वाढला असतानाच

१९४६ मध्ये असेंब्लीच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले. बंधुंचा आजार आणि कुटुंबाची जबाबदारी यामुळे यशवंतराव या निवडणुकीपासून दूर होते. परंतु उमेदवार निश्चित होण्याची वेळ आली तेव्हा यशवंतरावांना कार्यकर्त्यांचा आग्रह सुरू झाला. उमेदवारी स्वीकारण्यास त्यांनी प्रारंभीच साफ नकारी दिला. परंतु मित्रांचा आणि कार्यकर्त्यांचा आग्रह कायम होता. १९३० सालातल्या चळवळीपासून सुरू झालेलं कार्य, आत्माराम पाटील यांची निवडणूक, बेचाळीसची, "चले जाव" ची चळवळ आणि जिल्ह्यातील काँग्रेस संघटनेची बांधणी या सर्व ठिकाणी आघाडीवर असलेले पुढारी हेच असेंब्लीच्या निवडणुकीत उमेदवार असले पाहिजेत हा कार्यकर्त्यांचा आणि मित्रांचा दृष्टिकोनही योग्यच होता. हा आग्रह मान्य करण्याच्या मनःस्थितीत स्वतः यशवंतराव मात्र नव्हते. त्यामुळे ते एकसारखा नकार देत राहिले.

कार्यकर्त्यांनी अखेर मिरजेला धाव घेतली. गणपतरावांचा सल्ला यशवंतराव मान्य करतील अशी त्यांना खात्री होती. याच हेतूने सर्व मंडळी मिरजेच्या दवाखान्यात दाखल झाली. यशवंतराव तिथेच होते. गणपतरावांच्या खोलीच्या बाहेर सर्वांची चर्चा सुरू होती. यशवंतरावांचा नकार कायम होता, इतकेच नव्हे तर गणपतरावांचा सल्ला विचारू नये, असंही त्यांनी सांगितलं. आजारी अवस्थेत गणपतरावही चर्चा ऐकत होते. अखेर त्यांनीच सर्वांना बोलाविले आणि आपला सल्ला दिला. यशवंतरावांनी निवडणूक लढवलीच पाहिजे, असंच त्यांचं मत होतं. यशवंतरावांना हा सल्ला म्हणजे आज्ञाच होती. उमेदवारी निश्चित करूनच कार्यकर्ते कराडला परत आले.

सातारा जिल्हा दक्षिण मतदार संघातून निवडणूकीला यशवंतराव चव्हाण, व्यंकटराव पवार, बाबूराव गोखले आणि के. डी. पाटील हेच चार उमेदवार काँग्रेसने निश्चित केले होते. हे चारही उमेदवार प्रचंड मतांनी निवडून आले. कराड, पाटण, खानापूर, तासगावं, वाळवे व शिराळा असा यशवंतरावांचा मतदार संघ होता. त्या काळात निवडणूक ही खर्चिक बाब

नव्हती. यशवंतरावांना या पहिल्या निवडणुकीसाठी अवघे दीडशे रुपये खर्च करावे लागले. त्यावेळी ते मिळवत होते. थोडी फार वकिली चालू होती. त्या मिळकतीतूनच स्वतःसाठी त्यांनी हा खर्च केला. सातारा जिल्ह्यातील त्यांचे नेतृत्व आता मुंबईत पोचलं.

निवडणुका संपल्या आणि पुन्हा कॉँग्रेसची मंत्रिमंडळे देशात अधिकारावर आली. बाळासाहेब खेरांनी त्यांना बोलावून 'पार्लमेंटरी सेक्रेटरी' म्हणून त्यांची निवड केल्याचे सांगितले. यशवंतराव म्हणतात, "माझे काम आणि माझी जाण यांच्या तुलनेने हे किरकोळ काम अशी माझी भावना झाली." पण सर्व मित्रांच्या आणि कुटुंबियांच्या आग्रहाने त्यांनी हे पद स्वीकारले. आयुष्यात एका मोहक वळणावर ते आता उभे होते. यशवंतराव म्हणतात, 'गाडीत निवांत बसल्यावर माझ्या मनात विचारांचे काहूर उठले. भूतकाळातील सुखदुःखाची धूसर क्षणचित्रे डोळ्यापुढे येऊ लागली. त्याचप्रमाणे अनोळखी पण रंगतदार भविष्याची बोटे ही आपल्याला पालवत आहेत असे वाटले. माझ्या मनात येऊन गेली की, माझ्या जीवनात मोठा बदल झाला आहे. कृष्णाकाठी वाढलो. हिंडलो, फिरलो, झगडतो. अनेक नवी कामे केली, मैत्री केली, माणसे जोडली, मोठा आनंदाचा आणि अभिमानाचा काळ होता. आता मी कृष्णाकांठ सोडून नव्या क्षितीजाकडे चाललो आहे. आता ती क्षितीजे रंगीबेरंगी दिसत आहेत. परंतु प्रत्यक्षात तेथे पोहोचेपर्यंत ती तशीच राहतील का? कोण जाणे?'

यशवंतरावांनी नव्या पदाची सूत्र स्वीकारली तो दिवसही १४ एप्रिल हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन. सातारा जिल्ह्याच्या क्षेत्रातून निघून मुंबई राज्याच्या व्यापक क्षेत्रात यशवंतराव चव्हाण दाखल झाले ते याच दिवशी. याच दिवसानं यशवंतरावांच्या भविष्याचा मार्ग खुला केला.

१९४६ च्या निवडणुकीत विजय संपादन करून ते राजधानी मुंबईत आमदार बनून दाखल झाले. कॉँग्रेस हा सत्ताधारी पक्ष होता. बाळासाहेब

खेर यांच्याकडे पक्षश्रेष्ठीनी मुख्यमंत्री पदाची जबाबदारी सोपविलेल्या त्या काळात चव्हाणांची पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली. तेव्हापासून यशवंतरावांच्या राजकीय जीवनाला बहर येत चालला. राज्याचे गृहखातं मोरारजी देसाई सांभाळीत होते. पार्लमेंटरी सेक्रेटरी पदाचं काम चव्हाणांनी गृहखात्यात करावं असा आदेश त्यांना मिळाला. वस्तुतः मोरारजी आणि यशवंतराव यांच्या ध्येयधोरणात, समाजासंबंधीच्या दृष्टिकोनात पूर्व-पश्चिम एवढे अंतर! परंतु यशवंतरावांनी तसं कधी भासू दिलं नाही. काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून त्यांच्या अंगी शिस्त मुरलेली होती. त्यामुळे सोपविलेलं काम करणं यावरच त्यांनी लक्ष केंद्रित केलं. इतकेच नव्हे तर मोरारजीसारख्या जबरदस्त नोकरशहाचा विश्वास संपादन केला. समाजपरिवर्तनासंबंधी त्याचं विचारमंखन मात्र सातत्यानं सुरू होतं. जशी संधी मिळेल त्या प्रमाणात एक एक पाऊल पुढं पडत राहील याची काळजी घेतली. मोरारजींच्या कारकीर्दीत यशवंतरावांना नमुनेदार राज्यकारभाराचे धडे मात्र मिळाले. पोलिस यंत्रणा, नागरी-पुरवठा, वन-खातं, होमगार्ड इत्यादी खात्यातील बारकावे त्यांनी सूक्ष्मपणानं अवगत करून घेतले.

महाराष्ट्रात होमगार्ड संघटना बांधण्याचं काम यशवंतरावांनी सर्वप्रथम केलं. १९४८-४९ साली हिंदू-मुसलमानांचे दंगे सुरू झाले होते. त्यावेळी नागरी संरक्षणाच्या कामात नागरिकांना सामील करून घेण्याची आवश्यकता होती. होमगार्ड संघटना अस्तित्वात आणून यशवंतरावांनी नेमकं तेच केलं. संपूर्ण मुंबई राज्याच्या पातळीवर ही संघटना तयार झाली आणि त्यातून राज्याच्या, देशाच्या प्रत्येक संकटाच्या वेळी होमगार्ड संघटनेनं आपला वाटा उचलला. नागरिकांची एक पलटणच तयार झाली. या सर्वांचं श्रेय अर्थातच यशवंतराव चव्हाण याचं आहे.

पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून काम करताना यशवंतरावांनी त्या काळात महाराष्ट्रातील तमाशा या लोककलेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचं आणि ही कला संवर्धित करण्याचं ऐतिहासिक काम केलं. तमाशाला लोक-कला

म्हणून सरकारनं मान्यता देणं कसं योग्य ठरेल यासंबंधी त्यांनी मुख्यमंत्री खेर आणि मोरारजी देसाई यांच्याकडं रदबदली केली. मोरारजींनी त्यावर अखेर निर्णय दिला आणि तमाशा या कलेला सरकारचा आश्रय प्राप्त झाला.

मोरारजींनी यशवंतरावांकडे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मोठ्या जबाबदाऱ्या सोपविल्या नाहीत. परंतु यशवंतरावांनी त्या जागेचा उपयोग करून सार्वजनिक स्वरूपाची अनेक कामे केली. पुढच्या काळात ती महत्त्वाची ठरली. यशवंतराव हे ग्रामीण भागातून राजधानीत पोहोचलेले असल्यानं त्यांना ग्रामीण जनतेच्या व्यथा आणि कथा अवगत होत्या. स्वातंत्र्याच्या चळवळीत काम करताना, स्वातंत्र्य कशासाठी याचा अभ्यास तुरुंगात असताना, मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या संगतीत त्यांना करता आला. याचा परिणाम असा झाला की, स्वातंत्र्योत्तर काळात सत्ता संपादनानंतरही स्वातंत्र्य कशासाठी, या संबंदीचं त्यांचं अवधान कधी सुटलं नाही.

यशवंतराव दीर्घ काळ सत्तेत राहिले परंतु तेथे त्यांनी स्वतःचा असा "इझम" बनू दिला नाही. त्यांनी आपल्या जीवनात पवित्र विचाराचं, राष्ट्रवादाचं, समाजपरिवर्तनाचं जे मूलभूत मूल्य जोपासलं ते सर्वश्रेष्ठ असंच ठरलं. नेतृत्व संपन्न पायाभूत मूल्याचं महत्तव अधिक ठरतं. नेतृत्व असं मूल्यधिष्ठित आणि परिपक्व असेल तर राष्ट्राच्या जीवनात संकटाचे प्रसंग निर्माण होतात त्यावेळी अशा नेत्यांनी केलेले निर्णय हे त्यांना स्वतःला आणि राष्ट्रालाही तारून नेतात. यशवंतरावांच्या जीवनात असे निर्णय करण्याचे प्रसंग, पुढील काळात, सतत निर्माण झाले. त्यांनी निर्णय केले आणि हे निर्णय योग्य असल्याची साक्ष इतिहासानं नोंदविली.

यशवंतरावांनी पार्लमेंटरी सेक्रेटरी पदाची सूत्रे स्वीकारली तो दिवस १४ एप्रिल – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन! योगायोगानं कदाचित हे घडलं असेल पण या दिवसानं यशवंतरावांच्या भवितव्याचा

मार्ग खुला झाला.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून यशवंतरावांच्या भवितव्याचा मार्ग खुला झाला. चळवळीत ग्रामीण भागातील बहुजन समाज सक्रिय असताना, त्यावेळी गावातील मागासलेला समाज चळवळीपासून दूर होता. त्यांच्यापर्यंत चळवळ पोहोचलीच नव्हती. हा समाज बलुत्याची कामे करून दारिद्र्याचं जीवन जगत होता. स्वातंत्र्य म्हणजे काय, कशासाठी मिळवायचं याचा गंधही मागासलेल्या समाजातील तरुणांना नव्हता. ही परिस्थिती बदलून संपूर्ण समाज चळवळीच्या पाठीशी उभा करण्यासाठी यशवंतराव प्रयत्नशील राहिले पण यात ते यशस्वी होऊ शकले नाहीत. अस्पृश्योद्धारासाठी चळवळ सुरू केली तेव्हा त्यांना आशेचा किरण दिसू लागला. आपण अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करीत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरही थोर अन्याय करीत आहोत असे ते सभासंमेलनातून सांगू लागले.

याचं कारण होतं मुंबईच्या विधानसंभत डॉ. बाबासाहेबांनी महार वतन रद्द व्हावे यासाठी बिल आणले असताना ते नामंजूर करण्यात आलं. बाळासाहेब खेर हे त्यावेळी मुख्यमंत्री होते. महार वतन पद्धतीमुळे महार समाजाचा कमालीचा अधःपात झालेला होता. त्यांना गुलामाप्रमाणे राबवलं जात असे. महार समाज बांधवाना प्रत्येक गावात कोणीही काहीही काम सांगावं आणि करून घ्यावं अशी सर्वत्र स्थिती होती. कोणतं काम करावं याला निश्चितपणा नव्हता, कसलं बंधन नव्हतं.

१९२२ साली एकदा आणि नंतर १९३७ साली वतनातून ही गुलामगिरी उदयाला लेली होती. कायदेमंडळात या संदर्भातील विधेयक नामंजूर करण्यात आलं कारण कायदेमंडळावर उच्चभ्रूंचा पगडा होता. महार वतन रद्द व्हावं यासाठी डॉ. बाबासाहेव आंबेडकर सतत प्रयत्नशील राहिले. पंचवीस-तीस वर्षाचा काळ उलटला तरी महार बांधवावरील अन्याय दूर होऊ शकला नाही. अखेरीस यशवंतरावांच्या हातात मुख्यमंत्री म्हणून

अधिकार आल्यावर सर्वप्रथम त्यांनी कुठली गोष्ट केली असेल तर बॉम्बे इन्फिरिअर व्हिलेज बॉन्टस् ॲक्ट १९५८ हा कायदा समंत करून घेतला आणि महार बांधवांना वतनी गुलामगिरीच्या फासातून निरंतरचं मुक्त केलं. महार वतनाचा प्रश्न हा डॉ. बाबासाहेबांच्या हयातीतच संपवायला हवा होता असं यशवंतरावांचं प्रामाणिक मत होतं आणि ते त्यांनी बोलून दाखवलं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बोद्ध धर्माचा स्वीकार केल्यावर अस्पृश्य समाज बोद्ध धर्माकडे आकृष्ट झाला. हा समाज मोठ्या संख्येने बोद्ध धर्माचा अनुयायी बनला. त्यावेळी अस्पृश्यांना देण्यात आलेल्या सवलती नवबौद्धांना शासनाने नाकारल्या. या नवबौद्धांना अस्पृश्यांचे हक्क उपलब्ध करून देण्याचेही नाकारले गेल्याने हा एक मोठा वादाचा विषय बनला. त्यावेळी यशवंतराव हे एकच मुख्यमंत्री निघाले की त्यांनी नवबौद्धांना सर्व सवलती आणि हक्क देण्यास मान्यता दिली. या संदर्भात त्यांचं समर्थन असं की, कालचा अस्पृश्य आज नवबौद्ध झाला म्हणून काही त्याच्या परिस्थितीत बदल घडलेला नाही. त्यांचं दारिद्य होतं तिथेच आहे. अशा परिस्थितीत त्यांना सवलती नाकारणं आणि त्यांचे हक्क काढून घेणं हा या समाजावर मोठा अन्याय ठरेल. या समाजाला महाराष्ट्राच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्याच्या दृष्टीनं यशवंतरावांचा हा निर्णय ऐतिहासिक ठरला. नवबौद्धांना सवलती आणि हक्क मिळवून देणारे, महाराष्ट्र हे त्या काळात एकमेव राज्य होते. समजासुधारणा आणि समाजपरिवर्तन हा त्यांचा ध्यास होता. त्यादृष्टीनं यशवंतरावांनी टाकलेलं पाऊल अत्यंत महत्त्वाचं होतं. डॉ. आंबेडकर यांच्या विचारासंबंधी त्यांना आदर होता. ते स्वतः सत्तेत असल्यानं आंबेडकरांच्या खांद्याला खांदा लावून ते प्रत्यक्षात त्यांच्या चळवळीत सहभागी होऊ शकले नाहीत. परंतु निर्णय करण्याची किंवा भावना व्यक्त करण्याची संधी त्यांना मिळाली. त्या प्रत्येक वेळी त्यांनी दलिताना झुकते माप देण्यात कुचराई केली नाही.

समाजाचं सर्वांगीण परिवर्तन यशवंतरावांना अभिप्रेत होतं. त्यांच्या

समाजपरिवर्तनाच्या कामाला तर्कशुद्ध आणि तात्त्विक आधार होता. महाराष्ट्रात विचारी समाज निर्माण व्हावा, तो सुसंस्कृत असावा, त्यांच्यात विज्ञानाबद्दलची आस्था निर्माण व्हावी आणि समाजानं स्वकष्टानं जीवन समृद्ध बनवावं यासाठी ते अहर्निश व्यग्र राहिले. जातवार पद्धतीवर आधारलेली खेड्यातील समाजरचना नष्ट करून समता, बंधुता, स्वतंत्रता, न्याय असं नवीन मूल्यावर आधारित नवं ग्रामीण जीवन महाराष्ट्रात रुजविण्याचे विचार यशवंतराव आयुष्याच्या प्रारंभापासूनच मनात बाळगून होते. त्यांना मानवता मुक्त करायची होती. पददलितांच्या संबंधात जे काही प्रश्न त्यांच्यासमोर आले त्या सर्व प्रश्नांचे निर्णय त्यांनी तळमळीने केले. रिपब्लिकन पक्ष आणि तो समाज यांच्याशी व्यक्तिगत आणि सरकारी संबंध आपुलकीचे बनवले. या समाजाला सरकारी नोकरीत योग्य ते स्थान मिळावे याचीही तरतूद केली. मंडल आयोग आणि त्याचे निर्णय फार पुढच्या काळात समाजासमोर आले. पण यशवंतरावांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत, मागासलेल्या वर्गासाठी धाडसानं निर्णय करून त्यांना न्याय दिला हे त्यांचं द्रष्टेपण!

मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत यशवंतरावांनी केलेले निर्णय आणि उचललेलं प्रत्येक पाऊल हे समाज परिवर्तनाशी प्रामुख्यानं निगडित आहे. तमाशा कलेला सरकारनं लोककला म्हणून मान्यता द्यावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले याचं कारण तमाशा कला जोपासणारा माणूस हा मागासलेल्या वर्गातीलच होता. पण या कलेला सरकारनं आश्रय देण्यानं ती कला तर विवंत राहीलच पण त्याचबरोबर या कलेच्या आधारानं जगणाऱ्या कलावंतांना आर्थिक लाभ घडून त्यांच्या जीवनात नवा प्रकाश निर्माण करणं यशवंतरावांना अभिप्रेत होतं. सामान्य बहुजन समाजाच्या भावभावना त्यांनी जाणून घेतलेल्या असल्यानं ते असे निर्णय करू शकले.

यशवंतरावांना समाजपरिवर्तन हवे होते पण ते प्रबोधनातून होणारे समाजपरिवर्तन असावे हा त्यांचा आग्रह होता. शिक्षणाची गंगा सामान्यांच्या दारापर्यंत पोहोचावी, नव्या युगाचे संस्कार बहुजन

समाजावर घडावेत, सामान्य, अडाणी, दरिद्री, शेतकरी, मजूर यांना सहजगत्या शिक्षण उपलब्ध व्हावे, शेती, उद्योग क्षेत्रासाठी त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि समृद्धीच्या दिशेनं त्यांच्या जीवनाची वाटचाल सुरू व्हावी, त्यातून जे समाजपरिवर्तन घडले ते प्रबोधनावर आधारित असेल ही त्यांची कल्पना होती.

यशवंतरावांना समाजाची काळजी होती. महाराष्ट्रातील सारा समाज उन्नत झाला पाहिजे, शिकून शहाणा बनला पाहिजे, स्वातंत्र्य रक्षणासाठी सर्वतोपरी सिद्ध असला पाहिजे आणि विज्ञानाचा अवलंब करून समृद्धीच्या शिखरावर पोहोचला पाहिजे ही त्यांची तळमळ होती. हे घडावयाचे तर या समाजाला शिक्षणाची दारे खुली करून देण्याची आवश्यकता होती. यशवंतरावांनी जाणीवपूर्वक बहुजन समाजाला शिक्षण उपलब्ध करून देण्याचा निर्णय केला. १२०० रुपयांपर्यंत ज्यांचे उत्पन्न आहे त्यांच्या मुलांना शिक्षण सर्वस्वी मोफत केले. हे एक त्यावेळचे क्रांतिकारक पाऊल होते. शिक्षण प्रसाराच्या या निर्णयानंतर उच्चभ्रू वर्गातील शिक्षण तज्ज्ञांनी, 'शिक्षणाचा प्रसार होईल पण गुणवत्तेचे काय?' असा सवाल करून टीका टिपणी सुरू केली. या शिक्षणातून उद्या शिक्षित बेकारांची समस्या निर्माण होईल असेही सांगण्यात येऊ लागले. परंतु यशवंतराव या टीकेमुळे विचलित झाले नाहीत. त्यांनी सांगितले की गुणवत्ता कशी वाढेल याचा विचार शिक्षण तज्ज्ञांनी करावयाचा आहे. त्यांनी विचार करून योजना सिद्ध करावी. सुशिक्षित बेकारांच्या संबंधात त्यांनी सांगितले की, अडाण्यांच्या बेकारीऐवजी उद्या सुशिक्षित बेकारांच्या बेकार बंड करून उठणार असतील तर त्यांचे मी स्वागतच करीन. हे सुशिक्षित बेकारच महाराष्ट्राचे औद्योगिक विश्व भावी काळात फुलवतीत हा माझा विश्वास आहे. नवा, अपेक्षित महाराष्ट्र निर्माण करावयाचा तर तत्कालीन पिढी नंतर येणारी प्रत्येक पिढी यांच्यात नवेपणाचे बीजारोपण केल्यानेच ते साध्या होणार होते. नवी पिढी शिकून शहाणी व्हावी, आधुनिक विज्ञानाची महती या पिढीला उमगाची आणि त्यातून उदयास

येणाऱ्या नव्या शक्तीचा उपयोग महाराष्ट्राच्या बांधणीसाठी व्हावा असं काही प्रत्यक्ष घडणं आवश्यकच होतं. यशवंतरावांनी ते प्रत्यक्षात घडवलं. विपन्नावस्थेचे, आर्थिक अडचणींचे कठोर अनुभव त्यांनी प्रारंभीच्या काळात, शिक्षण सुरू असतानाच घेतले होते. मानहानी सहन केली होती. ते टिळक हायस्कूलमध्ये शिक्षम घेत असताना फी म्हणून दोन-चार आणे शाळेला देणे अशक्य ठरल्याने नादारी मिळावी यासाठी कराडमधील प्रतिष्ठितांकडून गरिबीचे त्यांना दिले नाही. उलट शिक्षण घेत असल्याबदद्ल हेटाळणी केली. त्याचवेळी अतःपर शिक्षणासाठी कोणाकडे भीक मागायची नाही असा त्यांनी निर्धार केला. त्या जिद्दीने शिक्षण मात्र पूर्ण केले. हा अनुभव त्यांच्या संग्रही असल्यानं त्यांच्या व्यवहारी अनुभवातूनच राज्याचं शिक्षणाचं नवं धोरण त्यांनी बनवलं. यावेळी त्यांच्यासमोर महाराष्ट्रात सर्वदूर पसरलेला गरीब, अडाणी बहुजन समाज होता. यशवंतरावांच्या या व्यवहारी निर्णयामुळे भावी काळात महाराष्ट्रातील शैक्षणिक चित्र किती बदललं, कसं रम्य बनलं आणि महाराष्ट्रातील नवी पिढी आपल्या आयुष्याचं भावी काळाचं समृद्धीचं चित्र रंगवण्यात मनानं कशी तयार झाली याचा इतिहास निर्माण झालेला आहे.

या मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या मार्गदर्शन तत्त्वामध्ये राज्याचं आर्थिक उद्दिष्ट आणि प्रगतीचं मुख्य साधन – शिक्षण – यासंबंधी निश्चित असं सूत्र राज्याचं धोरण म्हणून ठरविलं. त्याचबरोबर राज्यातील प्रादेशिक व इतर प्रकारचा असमतोल त्यांना दूर करावयाचा असल्यानं अर्थव्यवस्थेची निर्मिती करण्याच्या महान कार्यावरही त्यांनी लक्ष केंद्रित केलं. मुलभूत उद्योगधंद्याच्या विकासामुळं देशाच्या अर्थव्यवस्थेतच नव्हे तर भारताच्या सामर्थ्यातही महाराष्ट्रानं मोलाची भर घालावी असा त्यांचा दृष्टिकोन होता.

शिक्षण प्रसाराचा निर्णय करीत असतानाच त्यांनी औद्योगिक आणि जमीन सुधारणा यात सुसूत्रता निर्माण केली. जमीन हा उत्पादनाचा

प्रमुख घटक. बहुसंख्य लोक जमिनीवरच आपली उपजीविका करतात. त्यादृष्टीनं औद्योगिक क्षेत्रप्रमाणं, जमिनीच्या क्षेत्रातही अशीच प्रगती साध्य करण्याची योजना यशवंतरावांनी निश्चित केली. उद्योगधंदे हे शहरातच मोठ्या प्रमाणात केंद्रित होतात. त्यातून शहन व खेडे यात विस्तृत अंतर निर्माण होतं. यामुळं अनेक समस्यांना जन्म दिला जातो. ग्रामीण जीवनाचं नागरीकरण करण्याच्या भूमिकेवरून आर्थिक विकासाचं धोरण आधारलं आणि ग्रामीण विभागात राहणाऱ्या लोकांना जीवनातील विविध सुखसोयी, विकासाची संधी प्राप्त करून दिल्यास, प्रमुख सामाजिक संघर्ष मिटण्यास मदत होईल हा त्यांच्या विचाराचा धागा होता. समाजाचं भावनात्मक ऐक्य प्रस्थापित व्हावं आणि समाज परिवर्तनाच्या दृष्टीनं आणखी एक पाऊल पुढं टाकण्याच्या संदर्भात त्यांनी पुरोगामी धोरणाचा पुरस्कार केला.

या नव्या धोरणानुसार त्यांनी महाराष्ट्रात सर्वत्र महाराष्ट्रात सर्वत्र औद्योगिक वसाहती निर्माण केल्या आणि सुशिक्षितांना उद्योग प्रवण बनविले. औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीत नव्या पिढीनं सामील होणं आवश्यक असल्यानं त्यांच्यासाठी त्यांना तांत्रिक ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी तांत्रिक शिक्षणाच्या आणि प्रशिक्षणाच्या सुविधा निर्माण करून दिल्या. यातून तांत्रिक शिक्षण आणि प्रशिक्षण, वैज्ञानिक शिक्षण यामध्ये महाराष्ट्रातील नवी पिढी किती आणि आणि कशी पारंगत बनत राहिली आहे हे विचार आणि शिक्षणाचा प्रकाशझोत नेऊन महाराष्ट्राची शक्ती जबरदस्त वाढविणे हा त्यांचा दृष्टिकोन होता. याच्या जोडीला समाजप्रबोधनासाठी साहित्यनिर्मितीकडे आणि साहित्यिकांचा आदर करण्याकडेही लक्ष पुरविले. साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करून त्यांनी आपल्या विचाराला मूर्त स्वरूप प्राप्त करून दिलं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे गाढे आणि व्यासंगी विद्वान. यशवंतरावांनी त्यांना साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद देऊन या मंडळाला सन्माननीय दर्जा प्राप्त करून दिला. इतकेच नव्हे तर मंडळाला ध्येय धोरण

ठरविण्याबद्दल नोकरशाहीच्या चौकटीतून मुक्त ठेवले. पूर्ण अधिकार अध्यक्षांच्या स्वाधीन केले. जगात निरनिराळ्या भाषांमधून जे वाङ्मय निर्माण होते व किंवा झालेले असेल ते मराठी भाषेत आणावयाचे असा यशवंतरावांचा हे मंडळ स्थापना करण्यातील हेतू होता. १ डिसेंबर १९६० ला या मंडळाची स्थापना झाली आणि नागपूर येथील अधिवेशनप्रसंगी २१ डिसेंबर १९६० ला यशवंतरावांनी मंडळाचे उद्‌घाटन केले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सांस्कृतिक क्षेत्रात घडलेली ही एक महत्त्वपूर्ण घटना होय. महाराष्ट्राचं जीवन व्यापक, विस्तृत नि क्रियाशील बनावं, ठिकठिकाणी जी विद्वान मंडळी आहेत, त्यांच्या शक्तीचा, ज्ञानाचा आणि साहित्याचा, विचारांचा उपयोग करून महाराष्ट्र वैचारिकदृष्ट्या समृद्ध बनावा या उद्देशाने त्यांनी हे मंडळ स्थापन केलं. साहित्य-संस्कृती मंडळानं गेल्या चाळीस वर्षात साडे चारशे मौलिक ग्रंथ मराठी भाषेत प्रकाशित करून, जगातील आजवर अज्ञात राहिलेलं मौलिक साहित्य मराठी भाषिकांना उपलब्ध करून देण्याचं फार मोठं सांस्कृतिक कार्य केलं आहे.

यशवंतरावांनी विश्वकोश निर्मितीचं कामही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडे सुपूर्त केलं. या स्वरूपाच्या त्यांच्या निर्णयातून सांस्कृतिक पुनरुज्जीवनाला मोठी गती प्राप्त झाली. पाठबळ मिळालं. याचं संपूर्ण श्रेय यशवंतरावांना आहे. महाराष्ट्रातील कोणताही मुख्यमंत्री अशा प्रकारचं मुलभूत कार्य करू शकलेला नाही. अन्य एखाद्याला राज्यात असं सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचं कार्य कोणी सुरू केलं ध्येयवाद, तात्त्विक चिंतन आणि साहित्याबद्दलची आस्था, विशेषतः समाजाला विचारानं समृद्ध बनविण्याची तळमळ या गोष्टी यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वात रुजलेल्या असल्यानं समाजसुधारणेला, समाज परिवर्तनाला पूरक असे निर्णय करण्यात आणि अंमलबजावणी करण्यात ते संपूर्ण देशात आघाडीवर राहिले. महाराष्ट्रालाही त्यांन सांस्कृतिक क्षेत्रात अग्रस्थान प्राप्त करून दिलं.

लोकसाहित्य हे मराठी जीवनाचं विशेष अंग आहे. हे साहित्य अक्षरबद्ध होऊन मराठी जनतेपुढे यावं यासाठी लोकसाहित्य प्रसिद्धीचं एक वेगळं दालन सुरू केलं. या कार्याचा शुभारंभ करून डॉ. सरोजिनी बाबर यांच्याकडे सूत्रे सोपवली.

साहित्याप्रमाणं महाराष्ट्राच्या कलाक्षेत्राकडं आणि कलावंताकडेही त्यांच लक्ष होतं. या संदर्भात या मुख्यमंत्र्यांनी भराभर निर्णय केले. नाट्यकलेला उत्तेजन देण्याची मोठ्या खर्चाची योजना तयार केली. नाटकांच्या पुस्तकांना बक्षिसं देऊ केली. हौशी कलावंतांचा नाट्योत्सव, शिक्षण-संस्थांतील नाट्योत्सव, खुल्या नाट्यगृहांची निर्मिती, दारिद्र्यात जीवन जगणारे नाटककार, नाट्यकलावंत यांना शासनाच्या वतीनं आर्थिक सहाय्य, संगीत, नृत्य, नाट्यशाळा यांना अनुदान, साहित्यिकांना त्यांच्या साहित्य निर्मितीबद्दल पुरस्कार या गोष्टी महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांनीच सर्वप्रथम सुरू केल्या. महाराष्ट्राचं सांस्कृतिक दालन, कलेचं दालन समृद्ध बनावं, टिकून राहावं यासाठी नाटकांवरील कर आकारणीही त्यांनी रद्द केली. यामुळं मराठी नाट्यक्षेत्र वृद्धिंगत होण्यास मोठी मदत झाली. महाराष्ट्राला यशवंतरावांच्या रूपानं रसिक मुख्यमंत्री लाभल्यामुळेच हे घडू शकलं.

महाराष्ट्राचा नागरी भाग सांस्कृतिकदृष्ट्या स्थिर आणि समृद्ध बनविण्याच्या योजना साकार होत असतानाच यशवंतरावांनी ग्रामीण विभाग आणि तेथील सामान्य जनता यांच्या जीवनात कायापालट घडविण्याचे चित्रही मनासमोर ठेवले. सामान्य जनतेच्या जीवनाला कोणती दिशा दाखविली असता त्यांची समृद्ध जीवनाकडे वाटचाल सुरू होईल या विषयीचे ते चित्र होते. त्यामध्ये त्यांनी सहकारी चळवळ, सहकारी संघटना, सहकारी कारखानदारी, प्रक्रियात्मक उद्योग आणि शेती सुधारणा, कृषि उत्पादन वाढ, कृषि औद्योगिक समाजरचना यास प्राधान्य दिले. त्यांच्या या धोरणामुळे सहकारी संस्था, सहकारी तत्त्वावरील सारख कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी बँका,

महाराष्ट्रातच प्रामुख्याने स्थापन झाल्या आणि त्यातून महाराष्ट्राचा कायापालट घडून आला. सरकारी उद्योगधंदे उभारण्याला त्यांनी सक्रिय प्रोत्साहन दिले. त्यासाठी आर्थिक पाठिंबा उपलब्ध करून दिला आणि ग्रामीण जनतेला समृद्धीच्या प्रांगणात आणून उभे केले. त्यातून सारे समाज जीवन ठवळून निघाले. सहकारी चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रात जी सहकारी कारखानदारी उभी राहिली त्यांच्या मुळे कारखान्याच्या आसमंतातील शेकडो गांवे, तेथील शेती आणि सारा परिसरच उजळून निघाला.

ही प्रक्रिया नित्य सुरू राहणारी आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या परिसरात औद्योगिक वसाहती निर्माण होऊन लहान मोठे उद्योग भरभराटीस येत आहेत. आलेले आहेत सहकारी कारखानदारीतून आणि औद्योगिक वसाहतीतून निर्माण होणाऱ्या उत्पादनासाठी ग्रामीण भागात प्रचंड गोदामे उभी राहिली आहेत. मार्केटिंग यार्डस्, मार्केटिंग फेडरेशन्स, कृषि उत्पन्न बाजार समित्यांची कार्यालये, शिक्षण संस्था, सामाजिक संस्था, सांस्कृतिक संस्था, ग्रंथालये, वसतिगृहे निर्माण झाली आहेत. समाज परिवर्तनाच्या दृष्टीनं ग्रामीण भागातील या परिवर्तनाचं मोल मोजता येणार नाही एवढं हे परिवर्तन सरस आहे. या परिवर्तनाचं मोल ते काय करणार? महाराष्ट्रातला ग्रामीण समाज पोट भरण्यासाठी, नोकरीसाठी शहरांकडे धावत होता. सहकारी उद्योगांमुळे या समाजाला नोकरी किंवा मजुरी ग्रामीण भागातच उपलब्ध झाल्यामुळे त्यांचा शहराकडे धावणारा लोंढा मोठ्या प्रमाणात थांबला आहे हे मान्य करावेच लागेल. महाराष्ट्रातील या बदललेल्या जीवनाचे आद्य आणि खरे शिल्पकार यशवंतराव चव्हाण हे आहेत. त्यांनी चैतन्यमय प्रेरणा आणि शासकीय अर्थबळ दिल्यामुळे हे घडले. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे यश संपूर्ण देशानं मान्य केलेलं आहे. जीवन समृद्धीचा हा एक आदर्श म्हणून मानला गेलेला आहे. सहकारी चळवळीला उत्तेजन देऊन आणि या चळवळीत ग्रामीण जनतेला सहभागी करून घेऊन

यशवंतरावांनी समाज परिवर्तनाच्या कार्याचा मुलभूत पाया घातला असल्यानं राज्याचं स्थैर्य अभंग राहण्यास त्याची मोलाची मदत झालेली आहे.

या चळवळीचा लाभ राजकीय दृष्ट्या कॉंग्रेस पक्षाला निश्चितच झाला. सहकारी क्षेत्रातून अनेक जिद्दीचे कार्यकर्ते उदयाला आले. नेतृत्वही करू लागले. निवडणुका जिंकून राजधानीत पोहोचले. आमदार, खासदार आणि काहीजण मंत्रिपदापर्यंत पोहोचले. शवंतरावांनी दाखवून दिलेल्या मार्गानं त्यांनी वाटचाल केल्यामुळेच ते मुक्कामापर्यंत पोहोचले. सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्यांना नंतरच्या काळात काही विकृती निर्माण झाल्या असतील पण त्यासंबंधी यशवंतरावांना दोष देता येणार नाही.

राजकीय नेते या भूमिकेतून कार्य करीत असताना यशवंतरावांनी आपली भूमिका आणि दृष्टिकोन सातत्यानं व्यापक ठेवला. एम. एन. रॉय, महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू यांच्या विचाराचा, विशेषतः ग्रामीण समाजाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याच्या विचाराचा आणि मार्गाचा पगडा त्यांच्या मनावर चिरकाल राहिला. यशवंतरावांच्या कामगिरीचं मूल्यमापन करताना प्रामुख्यानं एक गोष्ट नजरेत भरते ती ही की, त्यांच्या प्रत्येक कामामागील, कल्पनेमागील, निर्णयामागील मूलभूत भूमिका समाजपरिवर्तनाची होती. महाराष्ट्रात त्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण घडलून आणले हे सुद्धा त्यांच्या कल्पनेचे विकसित स्वरूप होय.

राजकीय सत्तेचे केंद्रीकरण मोठ्या प्रमाणावर झालेले असते. राजधानी दिल्लीपासून, राज्यांच्या राजधानीपर्यंत सर्व कारभार वरून येणाऱ्या आदेशानुसार चालत असतो. सत्तेच्या केंद्रीकरणाचं हे चित्र साऱ्या जगातच आढळतं. यशवंतरावांना हे खटकत असलं पाहिजे. महाराष्ट्राच्या विकास कार्यात, समृद्धी, सत्तेच्या व्यवहारात सारा महाराष्ट्र सामील असला पाहिजे तरच अपेक्षित साध्य गाठता येणं शक्य होईल. सामाजिक परिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य करता येईल. या विचारानं त्यांना

बंदिस्त केलेलं असावं. त्यांचं राजकीय शिक्षण म. गांधी, पं. नेहरू यांच्या मार्गदर्शनाखाली झालं. स्वातंत्र्यपूर्व काळातील रॉय यांचे विचारही त्यांनी आत्मसात केले होते. गांधीजींची ग्राम स्वराज्याची कल्पना त्यांना मान्य होती. राज्य कारभाराची सूत्रे तळागाळातील लोकांकडून विकसित झाली पाहिजेत हे ग्रामस्वराज्यातील प्रमुख सूत्र, नेहरूंचे समाजवादाचे विचार आणि सर्वांगीण नियोजनाची भूमिका या सूत्राला पूरक ठरणारी अशी होती. सामाजिक परिवर्तनाला वाहून घेतलेले यशवंतरावांचे मन या मार्गाने वाटचाल करीत असेल ते युक्तच होते.

त्यातूनच १ मे १९६२ ला त्यांनी महाराष्ट्रातील पंचायती राज्याचा कारभार सुरू केला. बळवंतराय मेहता समितीनं पंचायत राज्यासंबंधी काही शिफारशी केलेल्या होत्या. परंतु महाराष्ट्राची एकूण परिस्थिती लक्षात घेऊन, राज्याला हितकारक ठरेल अशा पद्धतीनं लोकशाहीचं विकेंद्रीकरण महाराष्ट्रात घडून यावं असा यशवंतरावांचा प्रयत्न होता. विकासाला गती मिळविण्यासाठी सत्तेचं विकेंद्रीकरण आवश्यक असून लोकशाहीची मुळं खोलवर रुजण्यास आणि यातून प्रशिक्षित, कार्यानुभवी अशी ग्रामीण नेतृत्वाची एक फळी निर्माण होण्यास या धोरणाचा निश्चित उपयोग होईल अशी त्यांची धारणा होती. ग्रामीण जनेतला विकास कार्यात प्रत्यक्षात सहभागी होण्यास त्याचा फार मोठा लाभ होईल हे त्यांना अपेक्षित होतं. त्याचबरोबर प्रशासकीय कारभाराची वर्षानुवर्षाची परंपरागत चाकोरी बदलून टाकावी याद्दष्टीनं हे एक क्रांतिकारक पाऊल ठरणार होतं.

महाराष्ट्रात लोकशाही विकेंद्रीकरण सुरू करीत असताना या धोरणाला अनेक अडचणीतून जावं लागलं. मंत्रिमंडळातले सहकारी आपल्या खात्याची सत्ता बाहेर जाऊ देण्याबद्दल खळबळ करीत होते. यशवंतराव विकेंद्रीकरणाच्या भूमिकेवर ठाम होते. त्यांनी सहकाऱ्यांना समजविण्याचा प्रयत्न केला. परंतु सहकारी आपला हेका सोडण्यास तयार नाहीत असे आढळताच, ‘लोकशाही विकेंद्रीकरण पूर्णपणे मान्य करण्याची ज्यांची

तयारी नाही त्यांना आपला मार्ग मोकळा आहे. मंत्रिमंडळातून त्यांनी खुशाल बाहेर जावे' अशी यशवतरावांना त्यांना समज द्यावी लागली.

विकासाच्या शासनाचं काम जनतेच्या सहकार्याशिवाय होणार नाही ही यशवंतरावांची पक्की धारणा होती. लोकांच्या हातात सत्ता देताना त्या सत्तेतून काही चुकीच्या गोष्टी घडतात, हे त्यांना मान्य होतं. परंतु त्यासाठी स्थानिक संस्था आणि लोकशाही मोडली पाहिजे किंवा अधुरी ठेवली पाहिजे हे त्यांना मान्य नव्हतं. लोकशाही संस्था चालविण्याची जबाबदारी ज्या माणसांवर पडेल ती माणसं सेवाभावी आणि त्यागी असली पाहिजेत याबद्दल कोणाचे दुमत असणार नाही. अशा माणसांची महाराष्ट्रात उणीव आहे किंवा पुढच्या काळात उणीव भासेल असं यशवंतरावांना कधीच वाटलं नाही. लोकांच्या चांगुलपणावर त्यांचा विश्वास होता आणि व्यक्तींना काम करण्याची संधी मिळाली पाहिजे असा आग्रह होता. त्यामुळेच संधी देण्याच्या मार्गात आडकाठी येईल ती दूर करण्याचा त्यांनी कसून प्रयत्न केला.

यशवंतरावांनी व्यवहार्य पद्धतीनं आणि मोठ्या चाणाक्षपणानं विकेंद्रीकरणाची योजना अमलात आणि. देशातील अन्य राज्यांनी या योजनेच्या यशस्वीपणाबद्दल शंका उपस्थित केल्या होत्या. परंतु महाराष्ट्रातील हा प्रयोग देशात सर्वश्रेष्ठ ठरेल आणि तसा तो ठरावा याबद्दल यशवंतरावांचं मन ग्वाही देत होतं.

यशवंतरावांनी जिल्हा परिषदांची मूलभूत रचना केली. त्यांच्या ती सत्तेबरोबर आर्थिक सामर्थ्यही दिले. जिल्हा परिषद सर्व दृष्टीनं समृद्ध बनाव्यात, प्रभावी असाव्यात यावर त्यांचा कटाक्ष राहिला. जिल्हा परिषदांना विशिष्ट अधिकार बहाल केले. जिल्हा परिषदांनी आपल्या जिलह्याचे जीवन उजळून निघावे यासाठी विकासाच्या कामात अग्रभागी राहून निर्णय करावे आणि प्रत्यक्षात कार्यवाही करता यावी असे कायदे केले.

आता मागे वळून पाहिले म्हणजे सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे प्रत्येक जिल्ह्यातील कारभाराची पारंपारिक घडी कशी बदलून गेलेली आहे याचे दर्शन घडते. लोकांच्या चांगुलपणावर यशवंतरावांनी जो विश्वास दर्शविला होता तो काही अपवाद वगळता सार्थ ठरल्याचे आढळते. प्रत्येक लहान - मोठ्या अडचणीतून सुटका करून घेण्यासाठी, आता ऊठसूठ मंत्रालयाची दारे ठोठवावी लागत नाहीत. जिल्हा परिषदेत निवडून येणारा प्रत्येक सभासद तालुक्याता सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी कार्यमग्न बनलेला आढळतो. परिषदेच्या कर्मचाऱ्यांची आणि अधिकाऱ्यांचीही त्यांना साथ मिळत असते. जिल्हा परिषदांच्या कार्यपद्धतीत आजही काही त्रुटी आढळतील. परंतु बदलता काळ, आणि विकाससंबंधीच्या लोकांच्या वाढत्या अपेक्षा याचाही तो परिणाम असू शकेल. योग्य वेळी कायद्यात बदल न केल्याचाही तो परिणाम असू शकेल.

एक गोष्ट मान्य करावी लागेल. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या द्वारा महाराष्ट्रात जो नवा पुढारी वर्ग जन्मास आला, त्यामुळे महाराष्ट्राचा राजकीय चेहरा मोहरा बदलून गेला आहे. महाराष्ट्रत हे राजकीयदृष्ट्या आणि अन्य दृष्टीनेही एक स्थिर राज्य असल्याची प्रचिती साऱ्या देशाला येत आहे. महाराष्ट्रात जिल्हा परिषदेचा कारभार सुरू करून ज्या एका विधायक कार्याची दिशा यशवंतरावांनी महाराष्ट्राला दाखवून दिली, त्यातून निर्माण झालेले आणि होणारे फायदे मात्र निर्विवाद आहेत. जिल्हा परिषदांची स्थापना हे यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत केलेलं सर्वात मोठं कार्य आहे. त्याचं हे कार्य समाजपरिवर्तनाच्या संदर्भात अभूतपूर्व असं आहे.

सार्वजनिक कार्याची आवड यशवंतरावांना विद्यार्थी असल्यापासूनच होती. शाळेत शिकत असतांनाही त्यांचा ओढा शिक्षणाइतकाच किंबहुना शालेय शिक्षणापेक्षाही समाजकार्याकडेच अधिक होता असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. वयाच्या चौदाव्या वर्षी ते कऱ्हाडच्या टिळक

हायस्कूलमध्ये सन १९२७ मध्ये दाखल झाले. १९२९ मध्ये शहीद भगतसिंगांनी असेंब्लीत बॉम्ब फेकला, त्या घटनेने राजकीय जीवनाकडे ते आकृष्ट झाले व देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले आयुष्य वाहून टाकण्याचा त्यांनी निर्धार केला. १९३० ते ३३ पर्यंत त्यांनी कायदेभंगाच्या चळवळीतही भाग घेतला. शिक्षाही भोगली. १९४० साली सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले. १९४२ च्या चळवळीतही भूमिगत राहून प्रत्यक्ष भाग घेतला. त्यांना अटक झाली नंतर सुटका झाली. १९४६ च्या निवडणुकीत मुंबई इलाखा कायदे मंडळावर निवडून आले. पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. १९४८ साली महाराष्ट्र काँग्रेसचे सेक्रेटरी झाले. या सगळ्या राजकीय चळवळीच्या वावटळीमध्ये मराठी भाषिकांचे एक राज्य व्हावे व हा विचार, त्यावेळच्या वातावरणात सर्वच जाणत्यांना आकर्षून घेत होता. त्याचा प्रथम उच्चार सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचा बेळगांव साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून उमटला व त्याने झपाट्याने पेट घेतला. त्यामधून सर्वपक्षीय संपन्न महाराष्ट्र परिषद दे. भ. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली. श्रेष्ठ व जेष्ठ विद्वानमूर्ती डॉ. धनंजयराव गाडगीळ या परिषदेचे कार्यवाह होते. त्यांनी ही महाराष्ट्राची एकमुखी मागणी सरकारीदरबारी सविस्तर निवेदनरूपाने मांडली. कारण त्यावेळी मराठी भाषा बोलणाऱ्यांची विभागणी मुंबई इलाखा संस्थानातील मराठवाडा व मध्य प्रदेशातील विदर्भ यामध्ये त्रिस्थळी झालेली होती. केंद्र सरकारने सर्वच राज्याच्या पुनर्रचना कमिशन नेमले. त्याचा अहवाल १९५५ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानुसार विदर्भाचे वेगळे राज्य व उर्वरित मराठी प्रदेश व गुजरात यांचे संयुक्त राज्य सुचविले. म्हणजे मराठी भाषिकांची एकच राज्यामध्ये एकत्र येण्याची आकांक्षा फेटाळली गेली. या अहवालाच्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्र संतापाने पेटून उठला. संप, हरताळ, मोर्चे याद्वारे सर्व पक्षीयांनी एकत्र येऊन निषेध नोंदविला. विदर्भाला वेगळे राज्य सुचविण्यात आले असूनही विदर्भातील नेत्यांनी मराठी भाषिकांचे एक राज्य व्हावे यासाठी

अनुकूलता दर्शविली म्हणून मराठी नेते त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत होते. त्यासाठी सन १९५३ मध्ये "नागपूर करार" मराठी नेत्यांनी विदर्भीय नेत्यांशी केला. त्यावर दे. भ. भाऊसाहेव हिरे, नानासाहेब कुंटे व यशवंतराव चव्हाण यांनी पश्चिम महाराष्ट्रीय नेत्यांच्या वतीने सह्या केल्या व मराठी भाषिक सर्व नेते संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीमागे एक असल्याचे दर्शविले. पण संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या मार्फत सर्व पक्षीय नेते एकत्र येऊन भारत सरकारच्या विरूद्ध संप, हरताळ, मोर्चे या सारख्या मार्गांनी आपला विरोध जाहीर करत होते. हे यशवंतरावांना अयोग्य व भारतीय काँग्रेस नेत्यांचे विरोधात दाखविणारे वाटत होते म्हणून त्यांनी या प्रकाराविरुद्ध बंड पुकारले. सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीची सभा सन १९५५ मध्ये फलटणच्या मनमोहन राजवाड्यात त्यांनी घेतली व संयुक्त महाराष्ट्र परिषजेचे मार्ग, धोरण, कार्य आम्हाला मान्य नसल्याचे जाहीर केले. संयुक्त महाराष्ट्र आम्हाला हवा आहे पण नेत्यांचे मार्ग मान्य नाहीत असे श्री. चव्हाण यांनी जाहीर केले.

ही बातमी बाहेर फुटताच फलटण शहरातील काँग्रेस विरोधक, डावे पक्षीय कार्यकर्त्यांनी फलटटण राजवाड्यावर निषेध मोर्चा आणला. श्री. यशवंतराव चव्हाण व जिल्हा काँग्रेसचे काही रुष्ठ निंदादर्शकांनी घोषणा देण्यास सुरुवात केली. साऱ्या महाराष्ट्रात हे निषेधदर्शक आंदोलन चव्हाण विरोधकांनी, काँग्रेस विरोधकांनी पसरविले. त्या सर्वांना शांतपणाने गंभीर विचाराने यशवंतराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी धैर्याने तोंड दिले. या सर्व गदारोळातून तडजोडीने, विचारविनियमाने व समजूतदारपणे मार्ग काढण्यात आला. त्यात विदर्भासह द्विभाषिक मुंबई राज्याचा कर्नाटक वगळून समावेश करण्यात आला. १ नोव्हेंबर १९५६ रोजी या विशाल द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यावेळी त्यांचे वय ४३ वर्षे होते. त्यानंतर लगेचच १९५७ च्या एप्रिल महिन्यात सार्वत्रिक निवडणुकी झाल्या. अटीतटीच्या सामन्यात यशवंतराव पुन्हा निवडून आले व पुन्हा मुख्यमंत्री झाले.

याच वर्षी ३० नोव्हेंबरला भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंच्या शुभ हस्ते प्रतापगडावर शिवस्मारकाचे उद्‌घाटन झाले त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने द्विभाषिक राज्याच्या विरूद्ध लोकांनी प्रचंड निदर्शने केली. ही निदर्शने मोठ्या प्रमाणावर व मोठ्या संख्येने असली तरी अगदीच शांततेने व शिस्तबद्ध होती. त्याचा पंडित नेहरूंच्या मनावर अतिशय चांगला परिणाम झाला. किंबहुना संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्यादृष्टीनं विचार केला तर हा त्या चळवळीचा दुसरा टप्पा म्हणावा लागेल. शंकरराव देवांच्या नेतृत्वाखालील संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा पहिला टप्पा, फलटणच्या जिल्हा काँग्रेसच्या बंडामुळे संपला. तेव्हापासून "संयुक्त महाराष्ट्र समिती" अस्तित्वात आली. तीमध्ये प्रामुख्याने सर्व काँग्रेसविरोधी पक्ष, आचार्य अत्रेसारखे काही स्वतंत्र नेते सामील झाले होते. प्रतापगडावरील शिवस्मारकाच्या उद्‌घाटन द्विभाषिक मोर्चा वेळच्या विराट निदर्शनानी दुसरा टप्पा संपतो. या दुसऱ्या टप्प्याच्या काळात यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाचा उदय दिसून येतो. त्याचप्रमाणे द्विभाषिक मुंबई राज्याचा काही नेत्यांचा अनुभवही मिळाला होता असे दिसून येते. त्यामुळे त्या पुढील वर्षीच १९५८ साली यशवंतराव चव्हाणांची काँग्रेस वर्किंग कमेटीवर सदस्य म्हणून सप्टेंबरमध्ये निवड झाली. त्याचवर्षी विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्‌घाटनही त्यांचेच हस्ते झाले. कर्नाटकाचे जिल्हे या द्विभाषिकाच्या मुंबई राज्यातून वगळण्यात आल्यामुळे बेळगावाचा समावेश त्यात नसल्यामुळे बेळगांव - कारवार सीमा प्रदेश त्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने दिल्ली मध्ये व इतरत्रही सत्याग्रह — आंदोलन सुरू करण्यात आले.

त्याच्या पुढील वर्षी १९५९ ऑगस्टमध्ये द्विभाषिक राज्याचा कारभार चालला असला तरी राज्यातील जनता त्याबाबत समाधानी नाही. त्यामुळे जनतेमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होत नाही म्हणून मुख्यमंत्री या नात्याने हा 'जुलमाचा गाडा' चालविणे मला इष्ट वाटत नाही असे यशवंतरावांनी आपले परखड मत काँग्रेस नेत्यांच्या कानी घालून टाकले.

त्यामुळे द्विभाषिकाचा पुनर्विचार करण्यासाठी कॉंग्रेस वर्किंग कमेटीने नऊ सदस्यांची समिती नेमली. याच सुमारास अलिगड मुस्लिम विद्यापीठाने यशवंतराव चव्हाण यांना 'ऑनररी डिग्री ऑफ एल.एल.डी.' पदवी प्रदान करून सन्मान केला.

१९६० च्या जानेवारीमध्ये द्विभाषिक पुनर्विचार समितीने आपला निर्णय केला व द्विभाषिक मुंबई राज्याची पुनर्रचना करून मुंबईसह मराठी प्रदेशाचे व गुजरात प्रदेशाचे अशी दोन राज्ये निर्माण करण्याचा निर्णय नऊ सदस्यीय समितीने घेतला. त्यानंतर एप्रिलमध्ये लोकसभेने त्यावर शिक्कामोर्तब केला आणि १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्राची उत्साही वातावरणात स्थापना झाली व या नव्या राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांचा शपथविधी झाला. त्यावेळी त्यांचे वय ४६ वर्षे होते.

एक उत्तम प्रशासक आणि कर्तृत्ववान मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावजींचा पं. नेहरूंनी अनेक वेळा गौरव केलेला आहे. भारताच्या नेतृत्वपदाच्या संदर्भात नेहरूंनंतर कोण असा प्रश्न उपस्थित केला गेला होता. त्यावेळी जयप्रकाश नारायण यांनी यशवंतराव चव्हाणांचा उल्लेख केला होता. अशा तऱ्हेची अखिल भारतीय पातळीवरील पुढाऱ्यांची प्रशस्तीपत्रके यशवंतरावांना मिळाली होती. परंतु महाराष्ट्र राज्याची निर्मिती, विशेषतः ती ज्या पद्धतीने झाली ती, यशवंतरावांच्या नेतृत्वाचे खरे प्रशस्तीपत्र समजावयाला हवे. कारण, प्रशासक आणि राजकीय नेता या दोन्ही नात्यांनी आवश्यक असलेले गुण ज्या ठिकाणी एकवटून व्यक्त झालेले पहावयास सापडतात अशी यशवंतरावांची कामगिरी म्हणजे विशाल द्विभाषिकाचा कारभार कार्यक्षमतेने चालवून, नवमहाराष्ट्राची निर्मिती त्यांनी सुकर आणि निश्चित केली होती, ही होय.

महाराष्ट्र राज्य निर्माण होणार हे निश्चित झाल्यापासून त्याचे श्रेय कोणाचे व किती याबद्दल एक प्रकारची अंहमहमिका सुरू झाली. सर्व श्रेय कॉंग्रेसला किंवा यशवंतरावांच्या नेतृत्वाला देणे वस्तुस्थितीला धरून

होणार नाही. संयुक्त महाराष्ट्र समितीला आणि तिने केलेल्या चळवळीला श्रेयाचा मोठा भाग दिला पाहिजे आणि खुद्द यशवंतरावांनी समितीच्या कार्याचे महत्त्व मोकळेपणाने मान्य केले आहे. मराठी जनतेने इतर मतभेद बाजूस सारून या प्रश्नावर जी एकजूट दाखविली तिला मुख्य श्रेय दिले पाहिजे. परंतु संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ज्या वातावरणात आणि ज्या पद्धतीने झाली त्याचे पुष्कळसे श्रेय यशवंतरावांना दिले पाहिजे आणि भारतीय लोकशाहीच्या उपासकांचे दृष्टीने तरी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीएवढेच महत्त्व ही निर्मिती ज्या पद्धतीने झाली त्या पद्धतीला आहे.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती ज्या पद्धतीने झाली तिचा वितार करीत असताना जी एक गोष्ट प्रामुख्याने दिसून येते. ती अशी की, लोकशाही पद्धतीला अनुसरून आणि भारतीय संदर्भाशी सुसंगत अशा रीतीने आणि वाटाघाटीने हे महाराष्ट्र राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे अनुकूल वातावरण या राज्याला जन्मापासून लाभले आहे. याला यशवंतरावांचं नेतृत्व बव्हंशी कारणीभूत आहे यात शंका नाही. विशाल द्विभाषिकाचे मुख्यमंत्री या नात्याने यशवंतरावांनी जे काम केले त्यायोगे दोन मुख्य गोष्टी साधल्या. भारतीय नेतृत्वाचा विश्वास संपादन करून मुंबई शहर एकभाषी मराठी राज्याचा भाग बनविण्यास ज्या शंका, संदेह, अविश्वास यामुळे विरोध होत होता त्याचे निराकरण केले. त्यामुळे यशवंतरावांच्या शब्दाला दिल्लीमध्ये महत्त्व प्राप्त झाले. मुंबईसह महाराष्ट्राच्या निर्मितीला विरोध करणाऱ्या नेत्यांचा प्रभाव त्या मानाने कमी झाला. आत्मविश्वासाचे सामर्थ्य यशवंतरावांच्या भूमिकेमागे उभे राहिले. परंतु आपल्या प्रशासकीय कर्तृत्वाने केवळ भारतीय नेतृत्वाचाच विश्वास यशवंतरावांनी संपादन केला नाही, तर खुद्द मुंबई राज्यामध्ये सहकाऱ्यांचा विश्वास संपादन करून या राज्याच्या भिन्न भिन्न प्रादेशिक घटकांचाही पाठिंबा मिळविला. गुजराथ आणि महाराष्ट्र यांच्या निर्मितीपूर्वीच्या वाटाघाटी ज्या बंधुभावाच्या वातावरणात आणि गुण्यागोविंदाने झाल्या त्याला यशवंतरावांनी गुजराथी सहकारी व गुजराथी समाज यांचा संपादन

केलेला विश्वास बव्हंशी कारणीभूत होता हे स्पष्ट आहे. त्याचप्रमाणे मराठवाड्याचे निःसंकोचपणे महाराष्ट्र राज्याला दिलेला पाठिंबा आणि विदर्भातील सहकाऱ्यांनी वाटाघाटीनंतर आणि काही थोड्या खळखळीनंतर महाराष्ट्र राज्यात सामील होण्यास संमती दर्शविलेली तयारी यालाही यशवंतरावांनी या दोन्ही प्रदेशात संपादन केलेला विश्वास कारणीभूत होता यात शंका नाही. एवढेच नव्हे, तर संयुक्त महाराष्ट्र समितीची भूमिका कट्टर त्यातून कटुतेची भावना निर्माण होऊ नये, या दृष्टीने यशवंतरावांनी विरोधकांबरोबर वागण्याचे जे धोरण स्वीकारले होते त्यामुळे महाराष्ट्रामध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर तीव्र लोकमत प्रभावीरीत्या संघटित झाले असूनही वातावरणात फार कटुता निर्माण झाली नाही, आणि महाराष्ट्र निर्मितीचा प्रश्न वाटाघाटीनी सुटू शकला. अर्थात यशवंतरावांप्रमाणेच संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेतृत्व करणाऱ्या एस.एम.जोशी प्रभृतीनाही या संबंधात मोठे श्रेय दिले पाहिजे.

भारतीय नेत्यांचे मन वळविण्याएवढा विश्वास यशवंतराव संपादन करू शकले नसते तर ज्या मार्गाने महाराष्ट्र निर्मितीची बोलणी सुरू झाली तो मार्ग खुंटला असता. राज्य पुनर्रचनेच्या वेळी मुंबई महाराष्ट्राला मिळू न देण्याला ज्या भारतीय नेत्यांचे प्रयत्न कारणीभूत झाले त्यांना निष्प्रभ करण्याएवढी पुण्याई यशवंतरावांनी मिळविली होती. परंतु भारतीय नेत्यांचे मन वळूनही मुंबई राज्यातील सहकाऱ्यांचा विश्वास व सहकार्य यशवंतराव मिळवू शकले नसते तरीही महाराष्ट्र निर्मितीचा प्रश्न सुकर झाला नसता. सद्‌भावनेच्या वातावरणात वाटाघाटींनी हा प्रश्न सुटला हे या घटनेचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

उत्तम प्रशासकाचे ठिकाणी आवश्यक असलेले गुण यशवंतरावांचे ठायी आहेत याची जाणीव त्यांचा मुंबई राज्याचे मंत्रिमंडाळात संसदीय सचिव म्हणून समावेश झाल्यापासूनच प्रशासनशी संबंध येणाऱ्या लोकांना झाली. विशेषतः ते नागरी पुरवठा खात्याचे व स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री असताना राज्यकारभाराचा उरक सांभाळून, कार्यक्षमतेला बाधा येऊ न

देता लोकाभिमुख कसा करता येईल, या दृष्टीने त्यांचा प्रयत्न असे. मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्या प्रशासकीय गुणांच्या अभिव्यक्तीला व्यापक न्याय मिळाला. कठीण जबाबदारी पत्करल्यामुळे त्यांच्या गुणांचा प्रकर्षत्वाने विकासही झाला. लोकांची गाऱ्हाणी मोकळेपणाने ऐकून घेऊन त्यांनी लोकांमध्ये विश्वास निर्माण केला. तसेच लोकांचे समाधान हीच लोकशाहीतील प्रशासनातील अधिकारी वर्गाला नव्या मनूची जाणीव दिली. मुद्याला धरून आणि थोडक्यात भाषणे करण्याची त्यांची प्रथा आपल्या देशामध्ये राजकारणी पुढाऱ्यांची रूढ केलेल्या परंपरेला अपवाद वाटते. प्रशासनातील उणिवांची जाणीव असल्याचे ते जाहीररीत्या कबूल करतात आणि मुख्य म्हणजे कोणताही लहानसहान प्रश्न प्रतिष्ठेचा करण्याबद्दल त्यांचा आग्रह नसतो, त्यामुळे सामाजिक व्यवहाराला आवश्यक असेलली तडतोड होण्यास मदत होते. मुंबईमध्ये हुतात्म्यांचे स्मारक उभारण्यास संयुक्त महाराष्ट्र समितीच्या मागणीला यशवंतरावांनी जे उत्तर दिले आणि ज्या रीतीने दिले ते या वृत्तीचे निदर्शक आहे.

परंतु प्रशासकीय गुणांपेक्षाही राजकीय नेतृत्वाचे गुण यशवंतरावांच्या महाराष्ट्र निर्मितीच्या कार्यामध्ये विशेष गुण दिसून आले. त्यांचे नेतृत्व प्रभावी होण्याला तीन गुण प्रामुख्याने कारणीभूत झाले आहेत. राजकीय घटनांबूत त्यांचा दृष्टिकोन वास्तववादी असतो आणि धोरणाबद्दल त्यांची भूमिका व्यावहारिक असते. ठोकळेबाज तत्त्वज्ञान किंवा भोंगळ आदर्शवाद यांचा पगडा यशवंतरावांवर कधीही बसला नाही. पण त्यांची भूमिका व्यावहारिक असली तरी संधीसाधूपणाची नसते. याचे कापण राजकीय प्रश्नाबाबत अभ्यासू दृष्टी स्वीकारून विचाराच्या बैठकीवर त्यांची वैचारिक भूमिका विशद करणारे जे भाषण यशवंतरावांनी केले होते त्यामध्ये ही घट्ट वैचारिक भूमिका स्पष्टपणे व्यक्त झाली आहे. परंतु व्यावहारिक दृष्टिकोनातून ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पर्याय स्वीकारावा लागेल असे दिसू लागले, त्यावेळी यशवंतरावांनी त्यातल्या त्यात जवळचा असा विशाल द्विभाषिकाचा पर्याय स्वीकारण्यास अनमान केला

नाही. केवळ तत्त्वाचा अट्टाहास म्हणून व्यवहार्यतेकडे त्यांनी डोळेझाक केली नाही. मुंबई राज्याचा कारभार प्रशासनाचे दृष्टीने चांगला चालला होता तरीही लोकशाही पद्धतीमध्ये अभिप्रेत असलेले भावनात्मक ऐक्य द्विभाषिकात साधेलसे दिसत नाही, अशी खात्री झाल्याबरोबर यशवंतरावांनी द्विभाषिकाचा फेरविचार सुरू करण्यास चालना दिली. नेहरूंच्या प्रतापगडभेटीचे वेळता सं. म. समितीचा मोर्चा हा यशवंतरावांच्या विचारास चालना देणारा ठरला असावा. वास्तववादी दृष्टीकोनामुळे त्यांनी महाराष्ट्रीय मनावर संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाची पकड कीती पक्की बसली आहे ते जाणले. व्यावहारिक भूमिकेमुळे राज्यपुनर्रचनेचा प्रश्न त्यांनी प्रतिष्ठेचा केला नाही. उलट लोकशाही मार्गवरील निष्ठेमुळे लोकांचे समाधान करण्याचा लोकशाहीवादी मार्ग पत्करण्याची तत्परता त्यांनी दाखविली.

अशा रीतीने महाराष्ट्र राज्याची निर्मिती अनुकूल वातावरणामध्ये होण्यास यशवंतरावांचे नेतृत्व बऱ्याच अंशी कारणीभूत झाले आहे.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर भारतीय जीवनाला निश्चित गती देण्याचे कार्यात प्रभावीपणे भाग घेण्यासाठी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व प्रभावी पाहिजे, त्यामागे महाराष्ट्रीय समाजाचा जागृत पाठिंबा हवा या गोष्टी साधणे हे सर्वस्वी महाराष्ट्रीय समाजामध्ये एकोपा आणि उत्साह निर्माण करण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक समस्या सोजविल्या पाहिजेत. सामाजिक क्षेत्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद आणि अस्पृशांचा प्रश्न यामुळे प्रमुख समस्या निर्माण झाली आहे. आर्थिक क्षेत्रामध्ये उद्योगधंद्याची वाढ, सहकारी पद्धतीचा प्रसार, भूमिहीनांना शेती आणि सुशिक्षितातील बेकारी हे मुख्य प्रश्न आहेत. राजकीय क्षेत्रामध्ये महाराष्ट्राच्या तिन्ही विभागाचे – विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांचे एकात्म्य साधणे ही मुख्य समस्या आहे. या सर्व समस्यांच्या मुळाशी लोकशाहीबद्दल निष्ठा वाढवून लोकशाही व्यवहाराला चालना द्यावयाची ही मूलभूत भूमिका आहे.

महाराष्ट्रात कृषी औद्योगिक समाजरचना निर्माण व्हावी असे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी कार्य केले. यशवंतरावजी म्हणजे एक सुजाण, सुसंस्कृत, प्रज्ञावंत व्यक्तिमत्त्व, त्यांनी जीवनभर स्वच्छपणाने राजकारण केले आणि जीवनाकडे सदैव रसिकवृत्तीने पाहिले. ज्वलंत राष्ट्रभक्ती आणि काँग्रेस तत्त्व प्रणालीवर असीम श्रद्धा यातूनच त्यांनी राजकारणाकडे पाहिले आणि त्या तत्त्वानुसारच ते सदैव अगदी अखेरपर्यंत वागत राहिले.

आपला महाराष्ट्र सर्वाथाने मोठा व्हावा यासाठी यशवंतराव तळमळीने धडपड करीत. सहकाराच्या, शिक्षणाच्या, उद्योग व्यवसायाच्या अगर जीवन उदात्त बनविणाऱ्या अन्य कोणत्याही कार्य क्षेत्रात नवे विचार पेरीत जाण्याचा जमू त्यांना ध्यासच लागला होता. १९३० ते १९४५ या काळात यशवंतरावांना स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागाबद्दल अनेकदा कारवासाच्या शिक्षा भोगाव्या लागल्या. या काळात कारागृह हे सुद्धा एक विद्यालय आहे असे समजून त्यांनी सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञानाचे व समाजवादी विचारांचे मौलिक अध्ययन केले, चिंतन केले, परिशिलन केले आणि स्वतःच्या विचारांची बैठक भरभक्कम केली.

कृषी-औद्योगिक समाज कल्पना ही मूळची यशवंतरावांचीच. शेती सुधारावी, शेती मालावर औद्योगिक प्रक्रिया करावी, विज्ञानाचे वरदान समाजाला लाभावे, शिक्षण जीवनोपयोगी व्हावे यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. विज्ञानाइतका त्यांना अध्यात्माबद्दलही आदर होता. पण ते देवभोळे नव्हते किंवा वृथा कर्मकांडे, ज्योतिष इत्यादीवर त्यांचा विश्वास नव्हता. आई विठामातावर कमालीची भक्ती होती आणि पत्नी वेणुबाईवर अजोड प्रेम होते.

यशवंतराव राजकारणी होते, राजकारणाच्या डावपेचात ते तरबेज होते. तसेच कार्यक्षम प्रशासक आणि मजबूत संघटक म्हणूनही त्यांची ख्याती होती. त्यांचा मूळपिंड मधमाशीचा होता. जेथे जेथे घेण्यासारखे,

शिकण्यासारखे असेल ते ते गोळा करावे, स्वतःच्या जीवनात आणावे आणि समाजाला त्याचा लाभ द्यावा ही त्यांच्या विचारधारेची एक प्रभावी बाजू होती.

यशवंतराव नुसते मुरब्बी राज्यकर्तेच नव्हते.ते साहित्यप्रेमी, कलाप्रेमी रसिक होते. साहित्य संमेलन असो, नाट्यसंमेल असो की उत्कृष्ट नृत्याचा कार्यक्रम असो तिथे यशवंतराव आवर्जून उपस्थित रहायचे. मराठी नाटकावर त्यांचे अतोनात प्रेम होते. त्यातूनच नाटकावरचा करमणूक कर रद्द झाला आणि नाट्य व्यवसायाला उर्जितावस्था आली.

यशवंतराव चव्हाण उत्कृष्ट रसिकराज होते, तसे स्वतः रसाळ वक्तेही होते. त्यांचे वाचन अफाट, चौफेर होते. त्यांचा वक्तृत्वाच्या आकर्षक मांडणीसाठी खूप उपयोग होत असे. आपल्या भाषणात सुभाषितवजा सुंदर वाक्याची पखरण करण्यात त्यांचा हातखंडा होता. ते राजकारणात गेले नसते तर फार मोठे साहित्यिक आणि प्रथम दर्जाचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रभावी वक्ते म्हणून गाजले असते.

ग्रामीण भागाच्या विकासासाठी, कृषी औद्योगिक समाजरचना करण्यासाठी खंबीरपणे आणि द्रष्टेपणाने पहिले पाऊन टाकणारे यशवंतराव एकमेव राजकीय नेते होते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे त्यांनी स्वीकारली आणि त्या दृष्टीने जिद्दीने कार्य करण्यास त्यांनी चालना दिली. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला सक्रिय सहाय्य केले. या चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले. सहकारातून समाजवाद निर्माण होईल अशी त्यांची धारणा होती. आज महाराष्ट्राप्रमाणेच देशभर सहकारी चळवळ फोफावली आहे, याचे द्रष्टेपण यशवंतरावांनाच द्यावे लागेल.

सहकारी क्षेत्र विस्तृत करण्यासाठी आणि त्याचा ग्रामीण जीवनाच्या आर्थिक परिस्थितीवर अनुकूल परिणाम घडून यावा या हेतूने यशवंतरावांनी सहकारी चळवळीला चालना दिली. शेतीसाठी

कर्जपुरवठा करणे, उत्पादित शेत मालाची विक्री करणे, शेती विकास, शेती मालावर प्रक्रिया, घरबांधणी, दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन इ. सहकारी संस्थांना चालना मिळाली. या सहकारी संस्थांना कर्ज पुरवठ्याची सोय, सहकारी बँका यांच्यामार्फत करण्यात येऊ लागली.

त्यांच्या सरकारनेच महाराष्ट्रात १८ सहकारी सारख कारखान्यांची प्रथम नोंद करून सहकारात नवा विक्रम केला. आज महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात १४५ हून अधिक साखर कारखाने उभे आहेत. हे यशवंतरावांच्याच द्रष्टेपणाचे द्योतक आहे. महाराष्ट्रात कृषी औद्योगिक, समाजरचनेच्या दृष्टीने त्यांनी टाकलेले हे भक्कम पाऊल होते. गेल्या ३०-३५ वर्षात या राज्याने केलेली आर्थिक, सामाजिक, कृषी औद्योगिक प्रगती हे त्यांनी उराशी बाळगलेले एक स्वप्नच होते. गरीब, कष्टकरी, अशिक्षित मराठी माणूस महाराष्ट्रात ताठपणाने, समर्थपणे उभा राहून कृष्टी, औद्योगिक शिक्षण आदी क्षेत्रात चमकावा या हेतूने त्यांनी केलेले समर्थ मार्गदर्शन आज ग्रामीण मराठी मनाचा — महाराष्ट्राचा स्थायीभाव झाला आहे.

द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाल्याबरोबर मुंबई येथे ग्रँड हॉटेलमध्ये त्यांचा काही चाहत्यांनी सत्कार केला होता. त्याप्रसंगी भाषण करताना यशवंतरावजी म्हणाले होते, 'मी एक सामान्य मनुष्य आहे. आज जरी मुख्यमंत्री झालो असलो तरी मी हा माझा वैयक्तिक मोठेपणा मानीत नसून महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे या थोर पुरुषांनी सुरू केलेल्या चळवळीमधून निर्माण झालेले हे नेतृत्व आहे, असे मी मानतो. जर शाहू महाराज नसते तर मी माझ्या खेड्यात शेतात नांगराच्या मागे कदाचित दिसलो असतो.' याचा अर्थ यशवंतरावांच्या थोरवीचे रहस्य त्यांनी त्यांच्या शब्दात सांगून महात्मा फुले आणि शाहू महाराज यांच्या चळवळीचे ऋण मान्य केले आहे. महाराष्ट्रात आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या समाजाला शिक्षित करणे, त्यांना शैक्षणिक सवलती व मुलींना मोफक शिक्षण देणे हा त्या विचारसरणीचाच एक भाग होता. तथाकथित

विद्वानांची टीक सहन करूनही साहेबांनी महाराष्ट्रात त्या काळी हे क्रांतिकारी पाऊल टाकले.

महाराष्ट्रात जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांची निर्मिती ही त्यांनी महाराष्ट्राला दिलेली देणगीच होय. सत्तेचे विकेंद्रीकरण करून सर्वसामान्य जनतेला विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा हा हेतू आज सफल झाला आहे. ग्रामीण भागातून नेतृत्व तयार करण्याचा त्यांचा दृष्टिकोन सर्वाथाने योग्य व समर्पक होता असे म्हणावे लागेल. यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय जीवन म्हणजे एक उघडा ग्रंथ आहे. वृत्तपत्रातील अनुकूल टीका पचवूनही महाराष्ट्राचे एकमेव नेत म्हणून जनमानसात यशवंतरावजींनी आपले स्थान टिकवून ठेवले होते. मतभेद राखूनही प्रेम कसे करावे, स्नेह वृद्धिंगत कसा करावा हे त्यांना जितके सहजगत्या साध्य झाले होते तितके इतर कोणत्याही राजकारणी पुरुषाला साध्य झाले नाही असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

'राजकारण म्हणजे केवळ सत्तेच्या क्षेत्रात काही कारभार करणे वा निवडणूक लढविणे नसून समाज परिवर्तनाचे ते एक साधन आहे. सामाजिक क्रांती हेच आता आपल्या सर्व सार्वजनिक जीवनाचे एकमेव उद्दिष्ट बनले पाहिजे. देशाचा विकास व समृद्धी घडविण्याचे ते साधन मानले पाहिजे' असे ते म्हणत.

आजच्या धर्मांध व अर्थांध सत्तापिपासू आणि अनीतिमान, गढूळ, राजकारणाला दिशा देण्याला त्यांच्या प्रखर राष्ट्रभक्तीच्या नि निखळ राजकारणाची खरी गरज होती. किमान त्यांचे आदर्श तरी आज अनुसरण्याची आवश्यकता वाटावी इतके उतुंग सह्याद्रिवत व्यक्तिमत्व त्यांना लाभले होते. सत्ता अभिलाषेने स्वार्थाने आणि धर्मवेडेपणाने बरबटलेल्या आजच्या राजकीय जीवनात यशवंतरावांनी दिलेले विचार मोलाचे वाटतात.

ते म्हणतात, 'पराकोटीच्या त्यागी वृत्तीची आज देशाला फार गरज

आहे. हिमतीने ताठ उभे राहून हा क्षात्रधर्म आज अभा करायचा असेल तर माणसा-माणसामध्ये आपण जिद्दीची भावना निर्माण केली पाहिजे. देशाभिमानाचे आणि स्वातंत्र्याचे वेड देशाला लाभते तेव्हाच तो देश आपले स्वातंत्र्य राखू शकतो. आत्मविश्वास हे संरक्षणाच्या शस्त्रागारातले अत्यंत महत्त्वाचे शस्त्र आहे. आपल्या महाराष्ट्रीय परंपरेत जे जे पवित्र व उच्च असेल ते ते भारताच्या उत्थापनासाठी आपण दिले पाहिजे.'

संरक्षणमंत्रीपदाची सूत्रे घेण्यासाठी दिल्लीस जाताना मुंबई शहरातर्फे यशवंतरावांचा एक सत्कार शिवाजी पार्कवर करण्यात आला होता. त्याप्रसंगी अनेक वक्त्यांनी त्यांच्यावर विविध प्रकारच्या स्तुती सुमनांचा वर्षाव केला. काहीनी त्यांची लो. टिळकांशी तर काहीनी छत्रपत्री शिवाजीशी तुलना केली. उत्तरादाखल भाषण करताना यशवंतराव म्हणाले, 'माझ्यावरील प्रेमामुळे आताच काही व्यक्तींनी माझी युगपुरुषाबरोबर तुलना केली. त्यांच्या भावना मी समजू शकतो परंतु मी त्या नेत्यांएवढा मोठा नाही आणि तेवढा मोठा नाही हे न समजण्याइतका लहानही नाही.' आविर्भावयुक्त भाषणातील या नम्र भावनायुक्त वाक्याला श्रोत्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला.

यशवंतराव लौकिक अर्थाने मोठे झाले, सुखी झाले परंतु आयुष्यातील अखेरचे दीड वर्ष त्यांच्या जीवनावर निराशेचे सावट सोडून गेले. हा प्रकार कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सर्वच थोर व्यक्तींच्या वाट्यास असतो की काय न कळे!

यशवंतरावांना महाराष्ट्राचे आधुनिक शिल्पकार म्हणतात याचे कारण महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया त्यांनी घातला. कृषी, औद्योगिक रचनेबरोबर समाजाच्या सांस्कृतिक परिवर्तनासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. बहुजन समाज सर्वाथाने प्रगत व्हावा अशी त्यांची धारणा होती. शेती करणारा माणूस नुसता श्रीमंत होता कामा नये तर त्या श्रीमंतीबरोबर त्याच्या घरात चार पुस्तके हवीत याची त्यांना ओढ होती. समाज

आर्थिकदृष्ट्या प्रगत होण्यात त्यांना स्वारस्य होते. पण आर्थिक आणि मानसिक स्वास्थ्य टिकविण्यासाठी मन सुसंस्कृत ठेवले पाहिजे हेही त्यांनी बहुजन समाजाला सातत्याने सांगितले. त्यासाठी अनेक सुधारणा घडवून आणल्या. सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्यासाठी जातीने लक्ष घातले. सामान्य माणासाल त्यामुळेच त्यांच्याविषयी मनापासून प्रेम वाटत राहिले. यशवंतरावांचे सुसंस्कृत संपन्न, समतोल राजकारणी, रसिक आणि चौफेर व्यक्तिमत्त्व व आईने दिलेले संस्काराची, श्रद्धेची शिदोरी यशवंतरावांना आयुष्याच्या वाटचालीत प्रेरक ठरली.

काही काही व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व, कार्यकर्तृत्व त्या त्या काळावर ठसा उमटवून गेले असल्याचे दिसून येते. लो. टिळक, म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, इंदिराजी गांधी यांच्या कार्याचे एकेक युग होते. इतिहास होता. महाराष्ट्राच्या जडण घडणीच्या इतिहासात स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या नावाची काही पाने लिहिली गेली आहेत. आधुनिक, नव्या महाराष्ट्राचे शिल्पकार या नात्याने चिरंजीवी ठरले आहेत.

महाराष्ट्र-देश-समाज मोठा समर्थ व्हावा अशी जिद्द बाळगलेला देशभक्तीने भारलेला हा नेता.

म. जोतिराव फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील सर्जनशील समाजक्रांतीचे खरेखुरे "निर्मिक" होते. त्यांनी बहुजन समाजाला, उपेक्षित व पीडित जन सामान्यांना मानवी अस्मिता प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. या देशातील शोषित व दलित समाजाला विद्या मिळविण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. फुल्यांनी पददलितांच्या व बहुजन समाजाच्या व्याधीचे मूळ कारण अविद्या शोधले. त्याचे योग्य व अचूक निदान केले. अविद्या घालवायची असेल तर लोकांना विद्या द्यावी लागेल. त्यांचे अज्ञान घालवायचे असेल तर त्यांना ज्ञान उपलब्ध करून द्यावे लागेल. हा विचार त्यांनी मांडला. एवढेच नव्हे तर विचाराला त्यांनी कृतीची जोड दिली.

शिक्षण कार्याचा आरंभ त्यांनी केला.

म. फुले हे कृतीशील तत्त्वचिंतर होते. त्यांच्या जीवित कार्यामागील सर्व प्रेरणा ह्या मानवी स्वातंत्र्याच्या, समतेच्या व बंधुत्वाच्या प्रेरणा होत्या. मानवी स्वातंत्र्यासाठी, समतेसाठी न्याय आणि बंधुत्वासाठी त्यांनी समर्पित भावनेने प्रतिकूल परिस्थितीशी आणि प्रस्तापित वर्गाशी अव्याहतपणे लढा दिला.

बहुजन समाजाच्या गळ्यात हजारो वर्षे धार्मिक गुलामगिरीच्या, अंधश्रद्धेच्या, विषमतेच्या चिकविलेल्या जळवा म. फुल्यांनी तोडून टाकल्या आणि राजकीय, सामाजिक, धार्मिक – शैक्षणिक आणि आर्थिक समतेचा दीपस्तंभ महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या मार्गदर्शनासाठी उभा केला.

सर्वांगीण क्रांतीचे शिंग भारतात म. फुल्यांनीच प्रथम फुंकले आणि समतेचे वारे खेड्याखेड्यातून, घराघरातून, दऱ्या खोऱ्यातून वाहू लागले. संतानी अध्यात्मिक समतेचा पोटतिकडीने प्रतार केला, तर म. फुल्यांनी सर्वांगीण समतेचा पाया घातला. आधुनिक प्रगत विचारांची बीजे फुल्यांच्या कार्यात, लिखाणात आणि बोलीत आढळून येतात, ते महान द्रष्टे होते. सामान्य माणसाच्या नवयुगाची ग्वाही देणारा आधुनिक भारतातला पहिला समाज क्रांतिकारक म्हणजे म. फुले हेच होत.

म. जोतिराव फुले महाराष्ट्राच्या क्रांती विचाराचं भारतीय विद्यापीठ आहे. बुद्ध, चार्वाक, तुकाराम यांच्या निर्भय मानवतावादी विचारांच्या वटवृक्षाला आलेलं मधुर फळ म्हणजे म. जोतिराव फुले आणि त्यांची सत्यशोधक चळवळ होय. म. फुले आणि त्यांची सत्यशोधक चळवळ होय. म. फुले यांनी जाती संस्थेविरुद्ध बंड पुकारले. कोणताही धर्म ईश्वरप्रणित नाही आणि कोणताही धर्मग्रंथ देवनिर्मित नही असे ठणकावून सांगून जोतिराव फुले यांनी ईश्वरशाहीला हादरा दिला. भौतिकवाद्यांना आणि समाजवाद्यांना भिडावेत आणि जुळावेत असे त्यांचे तत्त्वज्ञान होते.

म. जोतिराव फुले हे शेतकरी, कामगार, दलित आणि स्त्रिया यांचे कृतीशील कैवारी होते. रयतेचे ते क्रांतिकारी तत्त्वज्ञ होते. शूद्रादी शूद्रांना आणि स्त्रियांना ज्ञानाचे दरवाजे खुले करणारी चळवळ त्यांनी सुरू केली. भारतातील शूद्र आणि अतिशूद्र व स्त्रियांच्या शिक्षणाचे ज्ञानपीठ म्हणजे म. जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले हे होत.

म. जोतिराव फुले यांच्या नंतर राजर्षि शाहू महाराजांनी सबंध महाराष्ट्रामध्ये सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे नेतृत्व केले. 'अजून देशातल्या सगळ्या रयतेला कोंड्याची भाकरी मिळेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही' असं सांगणारा रयतेचा वाली आज कुठे नाही. 'राजवैभव थोर असो, पण मी रयतेशी वचनबद्ध आहे. ती वचनबद्धता त्या वैभवाहूनही थोर आहे.' हे शाहू महाराजांच्या विचारातलं मुख्य सूत्र होय. अस्पृश्यता निवारण, मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विद्यार्थी वसतिगृहांची व्यवस्था, गंगाराम कांबळे या अस्पृश्यास काढून दिलेले हॉटेल, धरणे बांधून हरितक्रांतीचा केलेला आरंभ, राज्यकारभारात कामगारांना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून रशियन राज्यक्रांतीच्या पार्श्वभूमीवर कामगार संघटना काढण्यासाठी कामगारांना त्यांनी प्रेरणा, दत्तोबा पोवार या पहिल्या अस्पृश्य व्यक्तीस कोल्हापूर नगरपालिकेचे अध्यक्षपद ज्ञानोबा घोलप या अस्पृश्य समाजातील व्यक्तीस मुंबई असेंब्लीत प्रतिनिधीत्व, मल्लविद्येला दिलेले उत्तेजन, चित्र- संगीत- ललितकलाना आणि कलावंताना दिलेला आश्रय, रंगभूमीच्या विकासासाठी केलेले प्रयत्न ही सर्व कार्ये पाहता राजर्षि शाहू महाराज समग्र क्रांतीचे पुरस्कर्ते होते. शाहू राजा नुसता मराठा नव्हका, ब्राह्मणेतरही नव्हता, तो नवयुगातला सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष होता. तो महाराष्ट्राच्या विकासाचा एक मोठा स्वाभाविक तरंग होता.

राजर्षि शाहूंनी अस्पृश्यांना पोटाशी धरले. त्यांना माणसात आणण्यासाठी जे जे काही करता येणे शक्य होते ते ते त्यांनी सारे व्रत म्हणून केले. शाहू जसे अस्पृश्यांच्या घरी-दरी निर्मळ मनाने जात होते

तसेच अस्पृश्यही शाहूंच्या राजगृही मोकळ्या मनाने वावरत होते. दलितांना – अस्पृश्यांना राजवाड्यात थारा देणारा महामानव शाहू छत्रपतीच होत.

उद्रेकाशिवाय स्थित्यंतर घडून येत नाही आणि पोटतिकशिवाय उद्रेक होत नाही. हा कार्यसिद्धीचा व्यवहारी सिद्धांत शाहूंनी स्वीकारला होता. आणि तो वसतिगृहांच्या स्थापनेबाबत विविध प्रकारे फलदायी ठरला होता. अस्पृश्यांच्या प्रश्नांचे गांभीर्य व त्यांच्या दुःस्थितीची दखल घेता अस्पृश्यांचे नेतृत्त्व अस्पृश्यानेच करणे ही अतीव गरजेची गोष्ट होती. शाहूंचा हा विचार वास्तवाशी व मानवी स्वभावाशी इमान राखणारा होता.

मानवी हक्क प्राप्त करून घेण्यासाठी उद्रेकी उपायांची कास धरल्याशिवाय अस्पृश्यांचे नेतृत्व अस्पृश्यांनेच करणे आवश्यक होते. अस्पृश्यता निर्मूलन हे जीवित कार्य मानणाऱ्या राजर्षि शाहूंची गरूड नजर अस्पृश्यातील नेतेपणास पात्र व्यक्ती शोधण्यासाठी चौफेर भिरभिरत होती. भीमराव आंबेडकरांमध्ये अस्पृश्यांचा त्राता दिसत होता म्हणून त्यांनी आंबेडकरांना अस्पृश्यांच्या नेतेपदाचा म्हणजेच स्वोद्धारक चळवळीच्या अग्रणीपदाचा अभिषेक करण्याचा वेत आखला. हजारो वर्षे मुका असलेला अस्पृश्य समाजास बोलका करण्याच्या इराद्याने शाहू छत्रपतींच्या आश्रयाखाली सार्थ व समर्पक नाव धारण केलेले 'मूकनायक' हे साप्ताहिक आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० रोजी सुरू केले आणि एक परी आंबेडकर 'मूकनायक' झाले. हा चमत्कार शाहूंनी हेतूतः घडवून आणला. नंतर आंबेडकरांना अस्पृश्यांच्या अग्रणीपदाचा अभिषेक माणगांव मुक्कामी स्वहस्ते करण्याचे त्यांनी निश्चित केले.

वीस मार्च एकोणीसशे वीस रोजी कागल जहागिरीतील माणगावं येथे अस्पृश्यांची पहिली व जंगी परिषद भरली. या परिषदेचे शिल्पकार शाहू छत्रपती होत. तसेच या परिषदेची खास वैशिष्ट्याची गोष्टी म्हणजे माणगांवच्या या अस्पृश्य परिषदेचे अध्यक्ष होते एक अस्पृश्यच... भीमाराव

आंबेडकर या ऐतिहासिक परिषदेत मार्गदर्शनपर भाषणात राजर्षि शाहू छत्रपती म्हणाले, 'माझे प्रिय मित्र आंबेडकर यांच्या भाषणाचा लाभ मिळावा म्हणून मी शिकारीतून मुद्दाम येथे आसो आहे. आंबेडकर हे मूकनायक पत्र काढतात व सर्व मागासलेल्या जातींचा परामर्श घेतात, याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.' अशा रीतीने पवित्र करवीर क्षेत्राच्या परिसरातील माणगांवी योजनापूर्वक आयोजित केलेल्या भव्य परिषदेत मराठी - कानडी मुलखातील हजारो अस्पृश्यांच्या साक्षीने शाहू छत्रपतींनी आंबेडकर यांच्या नेतृत्वाची मुहूर्तमेढ शाही इतमानाने रोवली. परिषदेचे अध्यक्ष आंबेडकर यांनी समयोचित भाषण केल्यानंतर हा 'अग्रणीपद मुहूर्तमेढ सोहळा' यथासांग पुरा झाला. नवोदित अस्पृश्याग्रणी आंबेडकरांच्या सत्कारार्थ शाहूंनी सहभोजन केले.

राजर्षि शाहू महाराजानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीच्या चळवळीला अधिक मूलगामी सर्वव्यापी अन् खोलवर रुजविण्याचा प्रयत्न केला. दलितांच्या मुक्तीचा खरा मार्ग त्यांनी दाखवला. डॉ. आंबेडकरांनी दलित समाजात आत्मतेज, आत्मविश्वास आणि स्वाभिमान व माणुसकीचे नवचैतन्य निर्माण केले. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही केवळ महान व्यक्ती नव्हती तर ती एक सर्वंकष क्रांतीचे तत्त्वज्ञान मांडणारी व त्यासाठी लढणारी एक शक्ती होती. नवसमाज निर्मितीचे स्वप्न पाहणारी प्रवृत्ती होती. 'मनुष्यत्वाची प्रतिष्ठा' हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानणाऱ्या म. जोतिराव फुले, राजर्षि शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, आगरकर आदी महापुरुषांच्या परंपरेतील बाबासाहेबांनी व्यक्तिपूजेपेक्षा विचारांची पूजा श्रेष्ठ मानवी. महाडच्या चवदार तळ्याच सत्याग्रहापासून त्यांनी जो दलितांचा मुक्ती संग्राम सुरू केला तो एक अर्थाने मानव मुक्तीचा लढा होता. शिका, संघटित व्हा आणि लढा असा आदेश देत त्यांनी समाज क्रांतीची गती वाढविली. सांस्कृतिक पुनरुत्थापनासाठी त्यांनी धर्मांतराचा निर्णय घेऊन दलितांची 'अस्मिता' जागी केली. प्रतिगामी प्रवृत्तींशी संघर्ष करूनच क्रांती यशस्वी होईल. पण

त्यांनी ‘हिंसेचा’ मार्ग अवलंबिला नाही. कारण त्यांची श्रद्धा होती की विचाराचा पराभव विचारच करू शकतो.

डॉ. बाबासेबांनी समग्र हिंदू समाजाच्या पुनर्घटनेची मागणी आपल्या चळवळीतून सुरू केली. म. फुले आणि आंबेडकर यांनी आपल्या चळवळीतून हिंदू समाजाच्या समग्र पुनर्रचनेचा आग्रह धरला. मनुस्मृती ही हिंदूच्या धार्मिक सामाजिक निर्बाधिक नियमांचा संग्रह होता, मात्र त्यात अस्पृश्यावर सामाजिक, आर्थिक व धार्मिक अमानुष गुलामगिरीते निर्बंध घातलेले होते म्हणून मनुस्मृती कोणालाच मान्य नव्हती. तीवर एकाहून एक असे प्रखर हल्ले सुधारकांनी चढवून तिचे वाभाडे काढले. धर्मग्रंथातील दोष दाखविले, पण मनुस्मृती पायाखाली तुडवून जाळून टाकण्यापर्यंत आणि असा हा हिंदुधर्मच नको म्हणण्यापर्यंत कोणाही सुधारकाची मजल गेली नव्हती. शक्य तो पोटतिडकीने देव नको आणि हा हिंदू धर्मही नको अशी निर्भय आणि क्रांतिकारक घोषणा करणारी पहिली व्यक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही होय! डॉ. आंबेडकर म्हणतात, ‘मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्रात ज्ञान ही अमोघ शक्ती आहे. या ज्ञान शक्तीचा कण् आणि कण आत्मसात केल्याशिवाय दलितवर्ग आपले स्वातंत्र्य आणि समतेचे ध्येय कधीच गाठू शकणार नाही.’

बौद्ध धर्मामध्ये समता, स्वातंत्र्य आणि बंधूता या तीन गोष्टी प्रामुख्याने आढळतात. (अपरिमित स्वातंत्र्याला समतेमुळे बाध येतो आणि सदासर्वकाळ समता पहात गेलो तर स्वातंत्र्याला बाध येतो, म्हणून दोन्हीवर अंकुश ठेवण्यासाठी बंधुभावाची आत्यंतिक जुरूरी आहे.) हा बंधुभाव म्हणजे मानवता अशी डॉ. बाबासाहेबांची श्रद्धा होती. ज्या धर्मामध्ये मानवतेला स्थान आहे, व्यक्ती स्वातंत्र्य आहे, संघटना स्वातंत्र्य आहे परंतु अंधःश्रद्धा नाही अशा प्रकारचा ‘बौद्ध धर्म’ हा एकमेव धर्म असून हिंदू संस्कृतीशी मिळता जुळता आहे म्हणून त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

डॉ. बाबासाहेबांनी आपल्या बुद्धीच्या बळावर दलित समाजाला माणूसपणाचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रचंड मोठी लोकचळवळ उभी केली. त्यांच्या धर्मांतराचा निर्णय दलितांना मानवी प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठीच होता. मानवाला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून यशवंतराव चव्हाण यांनीही आयुष्यभर कार्य केले.

समाज परिवर्तनाच्या बाबतीत यशवंतराव जागरूक होते. विचार मंथनाच्या काळात डॉ. बाबासाहेबांच्या विचारसरणीचा आणि तात्त्विक भूमिकेचा ते बारकाईने अभ्यास करीत होते. एका बौद्धिकाच्या वेळी अस्पृश्यतेबद्दलची तीव्र जाणीव व्यक्त करताना यशवंतराव म्हणाले "आपण अस्पृश्यांवर फार मोठे अत्याचार करीत आहोत, त्याचप्रमाणे बाबासाहेबांच्यावरही घोर अन्याय सतत करीत आहोत. डॉ. आंबेडकरांनी मुंबईच्या विधानसभेत महार वतन रद्द करण्याच्या बाबतीत एक बील आणले होते. हे वतन महार लोकांच्यावर गुलामगिरी लादणारे वतन होते. असा अन्याय कोणत्याही सुसंस्कृत समाजाने चालू ठेवला नसता, पण ते बील नामंजूर करण्यात आले ही आपल्या समाजाच्या दृष्टीने नामुष्कीची गोष्ट होय.' यशवंतराव चव्हाण हे बोलघेवडे समाजसुधारक नव्हते, ते कृतीशील नेते होते. त्याचा प्रत्यय पुढे १९६० साली महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री ते झाले त्यावेळी आला. मुख्यमंत्री म्हणून पहिली गोष्ट जर त्यांनी केली असेल तर 'महारवतन' रद्द करण्याचे बील त्यांनी मंजूर करून घेतले हे होय. ते आवर्जून म्हणत असत की, 'डॉ. बाबासाहेबांनी जो लढा लढविला तो अस्पृश्यांच्या जीवन मरणाचा लढा होता आणि या लढ्यात त्यांना साथ देणे हे त्यांच्या नव्हे, आपल्या समाजाच्या हिताचे आहे.'

अस्पृश्योद्धारासाठी म. गांधीनी जी चळवळ केली ती यशवंतरावांना मान्य होती. पण आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या मागण्या घटनात्मक मार्गांनी मिळविण्याचा जो प्रयत्न केला तो यशवंतरावांना मूलगामी स्वरूपाचा वाटला. शतकानुशतके दडपल्या गेलेल्या अस्पृश्यांना आपल्या

उद्धारासाठी जास्तीतज जास्त हक्क व सवलती मिळाल्या पाहिजेत आणि तो त्यांचा हक्कच आहे. ही आंबेडकरांची भूमिका यशवंतरावांना मान्य होती. आणि त्या बाबतीत ते बाबासाहेबांना हिरीरीने पाठिंबा देत असत. यशवंतरावांनी अस्पृश्यांच्या बाबतीत समाजाला जी शिकवण दिली तो त्यांचा वारसाच आहे असे समजावयास हरकत नाही.

डॉ. बाबासाहेबांनी आपल्या समाजाच्या चिरंतन हितासाठी जेव्हा बौद्ध धर्म स्वीकारला तेव्हा नवबौद्ध अस्पृश्यांना दिल्या जाणाऱ्या सवलती व हक्क दिले जावे किंवा नाही हा वादाचा विषय झाला. यशवंतरावांनी या वादाच्या बाबतीत निश्चित भूमिका घेतली ती ही की, नवबौद्धांना हे हक्क व सवलती देणे हाच न्यायाचा मार्ग आहे. सबंध देशात यशवंतराव चव्हाण हे एकच मुख्यमंत्री निघाले की, ज्यांनी नवबौद्धांना हे हक्क दिले जातील ही घोषणा केली आणि अंमलातही आणली. समाज सुधारणेच्या त्याचप्रमाणे समाज परिवर्तनाच्या दृष्टीने टाकण्यात आलेले हे त्यांचे अत्यंत महत्त्वाचे पाऊल होते.

यशवंतराव चव्हाण हे सर्वांगीण परिवर्तनाचे भोक्ते होते. ते म्हणतात, 'महाराष्ट्राचे थोर समाज सेवक गोपळरावजी गोखले यांनी राजकारणाला आत्मिक अधिष्ठान देण्याचा संदेश प्रथमच भारताला दिला. गांधी युगात तर राजकारण व समाजकारण या मधील लक्ष्मणरेषाच पुसली गेली. सर्व धर्मसमभाव, सामादिक समता, हरिजन सेवा इत्यादी महत्त्वपूर्ण सामाजिक सुधारणा आमच्या राजकीय परंपरेचा अविभाज्य भाग बनला. आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा हा प्रसिद्ध बौद्धिक वाद टिळक आणि आगरकर यांसारख्या महापुरुषांमध्ये झाला. न्या. रानडे यांच्या नेमस्त पण पुरोगाणी सुधारणावादाने महाराष्ट्राचे लक्ष समाजसुधारणाकडे प्रामुख्याने वळले. महात्मा फुले यांच्या प्रणालीची सामाजिक क्रांतिवादाची जी ज्योत बहुजन समाजाच्या झोपड्यांना उजाळा देऊ लागली. महर्षि कर्वे यांनी समाजाच्या उपेक्षित अशा भगिनीवर्गात या क्रांतिवादाच्या आधारे नवी अशा निर्माण केली.'

यशवंतराव चव्हाण यांना विविध विषयामध्ये रस असे. नव नाट्य, नवकाव्य आणि विशेषतः दलित साहित्य याबद्दल त्यांना कुतुहल असे. साहित्य आणि सांस्कृतिक पुनरुर्जीवनाच्या आंदोलनाला त्यांनी अग्रक्रमाने स्थान दिले ही वस्तुस्थिती आहे. त्यांना समाजाची काळजी होती, आस्था होती आणि हा समाज उन्नत झाला पाहिजे, विशेषतः ग्रामीण दलित समाज उन्नत झाला पाहिजे हाच त्यांचा ध्यास होता.

यशवंतरावांसारखा एक समर्थ माणूस महाराष्ट्रामध्ये जन्माला आला ही सर्वांना अभिमान वाटण्यासारखी गोष्ट आहे. त्यांनी आयुष्यामध्ये जे जे काही कार्य केले त्या कार्याला एक दिशा होती, त्याला एक अधिष्ठान होतं, पण त्या अधिष्ठानाच्या मागे जी भूमिका होती ती समाजाचं हित साधावं ही होती. कोणत्याही अडचणी आल्या तरी यशवंतराव कधी विचलित झाले नाहीत. यशवंतरावांच्या विषयी एक निर्वाळा मात्र दिला जाईल की महाराष्ट्रात समाज परिवर्तनाची जी दिंडी अव्याहत चालू राहिली आहे तिच्यामधील अग्रस्थानीचे मानकरी म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे नांव अभिमानाने घेतले जाईल.

यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्रात झालेल्या या सर्व सामाजिक क्रांतीच्या चळवळीचं चांगलंच भाग होतं. या सर्व सामाजिक चळवळीचा भाग म्हणून यशवंतरावांनी १९५९ साली आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या फी मध्ये सवलत देण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला. या निर्णयाने शेतकरी, दलित, आदिवासी सगळ्या सामान्य कुटुंबातील लाखो मुले महाविद्यालयाच्या दालनात आली.राजकारणाच्या धकाधकीत राहूनही म. जोतिराव फुले, राजर्षि शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षि शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचं मोल ते जाणत होते. राजकारणाशी तडजोड करीत असतानाच गरीव समाजाची मोडतोड होणार नाही याची काळजी ते घेत होते. यशवंतरावांनी आपल्या सबंध हयातीत गरीब माणूस आपल्या धोरणातून सोडलेला नाही. अगदी गरीब कुटुंबातून प्रेमाच्या श्रीमंतीवर मोठा झालेला हा नेता होता.

माणसांविषयीचं अतूट नातं त्यांच्या आईने त्यांच्यावर केलेल्या संस्कारातून निर्माण झालेलं होतं. ते म्हणतात त्याप्रमाणे त्यांची आईच त्यांची शाळा होती. प्रेमाचा संस्कार हाच त्यांचा विचार होता आंधळे असू नये, आंधळा दुनियेत हिंडू शकेल पण आंधळ्याच्या मागे दुनिया जाऊ शकणार नाही, हे त्यांचं सांगणं होतं.

योगायोग पहा कसा आहे की, नेमकी या विचारांना आचरणांत आणण्याची संधी यशवंतरावांना मिळाली तीही चौदा एप्रिलला पार्लमेंटरी सेक्रेटरीपदाची सूत्रे स्वीकारून! म्हणजे यशवंतरावांच्या कार्याची सुरुवात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन एका दिवशी एकाच तारखेला येणे हा कपिलाषष्ठीचा योगच मानला जातो.

नागपूर येथे दीक्षाभूमी स्मारक म्हणून देण्यास त्यावेळच्या सरकारी अधिकाऱ्यांचा विरोध होता, परंतु यशवंतरावांनी दीक्षाभूमी स्मारक म्हणून घोषित करून नवबौद्ध समाजाला न्याय मिळवून दिला. या भूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एक साजेसे स्मारक उभारण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. या स्मारकाच्या कोनशिला समारंभाप्रसंगी ३० ऑगस्ट १९६१ रोजी भाषण करताना यशवंतराव म्हणतात, ‘हे दीक्षा मैदान सरकारने दिले ते मेहेरबानी म्हणून दिले असे मी कधी मानले नाही. महाराष्ट्र राज्याचे ते कर्तव्यच होते.’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आमच्या राज्याचे नागरिक होते, याचा महाराष्ट्र राज्याला अभिमान आहे, त्यांचे हे जे स्मारक होत आहे त्या स्मारकात महाराष्ट्र राज्य सहभागी होऊ शकते. सरकारी नोकरीत राखीव जागेची तरतूद यांच्याच कारकीर्दीत केली गेली. मंडल आयोग आणि त्याचे निर्णय हे त्यांच्या नंतरच्या काळात समाजासमोर आले, पण यशवंतरावांनी आपल्यामुख्यमंत्रीपदाच्या काळात, पददलित वर्गासाठी धाडसानं निर्णय घेऊन त्यांना न्याय दिला यातच त्यांचे द्रष्टेपण दिसून येते.

आपल्या देशात गेल्या अनेक वर्षापासून विद्वेषाचे राजकारण पेरले जात

आहे, लोकशाही ऐवजी ठोकशाहीची भाषा बोलली जात आहे. हे सर्व म. फुले, राजर्षि शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातील देशाच्या बांधणीशी आणि जडणघडणीशी विसंगत आहे असे मला वाटते! म्हणून आज वरील महापुरुषांचे स्मरण करताना जातीचा, धर्माचा आणि पक्षीय पातळीचा विचार न करता त्यांनी येथे जागविलेल्या सद्मूल्यांचा, सद्भिरुचीचा आणि लोकशाही जीवननिष्ठेचा आवर्जून विचार करणे आणि कोणत्याही भावनिक, संकुचित, सांप्रदायिक विकार - विचाराच्या मागे न जाता सदाचारी मूल्यांचाच मार्ग सर्वांनी स्वीकारावा.

यशवंतराव हे काँग्रेसमध्ये अखिल भारतीय नेतृत्वात चमकू लागले आणि त्याचवेळी चीनचे भारतावर आक्रमण झाले. या युद्धाच्या संदर्भात संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांच्याविरूद्ध प्रक्षुब्ध वातावरण निर्माण झाले आणि त्यावेळी संरक्षणमंत्री होण्याच्या पात्रतेचा एकच नेता पंडितजींच्या डोळ्यासमोर आला. तो नेता म्हणजे यशवंतराव हे होत. वस्तुतः यशवंतरावांना महाराष्ट्र सोडावयाचा नव्हता. कारण मुख्यमंत्रीपदी आरूढ झाल्यानंतर त्यांनी बऱ्याच महत्त्वाकांक्षी योजना आखल्या होत्या. त्या त्यांना आपल्या डोळ्यासमोर पुऱ्या करावयाच्या होत्या. साहजिकच त्यांनी नाइलाजाने पंडितजींचे आवाहन स्वीकारले. काय आश्चर्य पहा, ते दिल्लीला पोचतात न पोचतात तोच चीनने नेफामधून एकतर्फी माघार घेतली. यशवंतरावांचे हे पाऊल भारताच्या दृष्टीने संकट निवारण्याचे ठरले, पण त्याचबरोबर यशवंतराव अखिल भारतीय आघाडीवर आले. एवढेच नव्हे तर जागतिक आघाडीवर आले. एवढेच नव्हे तर जागतिक आघाडीवरही त्यांचे पदार्पण झाले. १९६३ मध्ये नाशिक जिल्ह्यातून लोकसभेवर बिनविरोध निवड झाली.

संरक्षण खात्याची सूत्रे घेतल्यानंतर १९६२ ते १९६६ या चार वर्षात अल्पावधीतच सेनादलाच्या संघटनेत दूरगामी स्वरूपाचे बदल केले. सेनादलाचे अधिकारी आणि सैनिक यांचे मनोधैर्य आणि आत्मविश्वास उंचावला. सेनादलाच्या आधुनिकीकरण करण्याचा पाया घातला. त्या

पायावर उभे राहून १९६५ आणि १९७१ च्या युद्धामध्ये पाकिस्तानचा पराभव करू शकलो.

ब्रिटन, अमेरिका, रशिया, जर्मनी या राष्ट्राबरोबर शस्त्रास्त्रांच्या आयातीविषयी किंवा संभाव्य लष्करी हालचालीविषयी वाटाघाटी कराव्या लागल्या. यशवंतरावांचा आत्मविश्वास असा की त्यांनी ही बोलणी अगदी समानेत्या नात्याने केली. मात्र त्यांनी एक पथ्य पाळले आणि ते म्हणजे पंडितजींशी जमवून घेऊन आपले ध्येयधोरण ठरविण्याचे. संरक्षणमंत्रीपद स्वीकारल्यानंतर चीनच्या आक्रमणाबद्दल त्यांनी जी चिकित्सा केली ती अशी की, हे कम्युनिझमचे या देशावरील आक्रमण होय. म्हणून या आक्रमणाला विरोध करण्याच्या बाबतीत त्याच पंथाच्या सोव्हिएट युनियनची मदत होणारी नाही. यशवंतरावांच्या या भूमिकेला सोव्हिएट युनियनने दुजोरा दिल्यासारखा होता कारण क्रुश्चेव्ह याने चीनचा बंधुराष्ट्र आणि भारताला मित्रराष्ट्र म्हणून संबोधले होते. पण पंडितजींचे मत निराळे पडले. त्यांना जी गुप्त माहिती कळली होती तिच्यावरीन त्यांनी असे मत बनविले होते की, चीनचे हे आक्रमण हा चीनचा राष्ट्रवादी आक्रमणाचा पवित्रा होता. पुढे थोड्याच दिवसात चीन व सोव्हिएट युनियन यांच्यामध्ये संघर्ष पेटला. त्यातून पंडितजींच्या निष्कर्षालाच पाठिंबा मिळाला. यशवंतराव यांनी पंडितजींच्या बाबतीत ही खूणगांठ बांधली की, त्यांना आंतरराष्ट्रीय संबंधाच्या बाबतीत अधिक गुप्त माहिती उपलब्ध होऊ शकते. तेव्हा त्यांच्या मताला अधिक महत्त्व देणे आवश्यक आहे. आपले निदान चुकले तर त्यात सुधारणा करण्याचा जो मनाचा मोठेपणा यशवंतराव दाखवीत आले त्यामुळेच दिल्लीच्या कारस्थानाने गजबजलेल्या केंद्रस्थानी यशवंतराव खंबीरपणे पाय रोवून बसू शकले. यशवंतरवान संरक्षणमंत्री झाल्यानंतर त्यासंबंधीच्या एकूण तीन आठवणी येथे नमूद करतो.

पहिली आठवण — ले. ज. शंकरराव थोरात यांची ते लिहितात- “सेन्याचे मनोधैर्य सावरले” —नोव्हेंबर १९६२ मध्ये यशवंतराव दिल्लीस

गेले आणि नैतिक धैर्य नष्ट झालेल्या लष्कराची आणि संरक्षण मंत्रालयाची जबाबदारी स्वीकारली. लष्करात मनोधैर्य पुन्हा निर्माण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे आणि लष्कर आणि संरक्षण मंत्रालय यातील संघर्षाची कारणे निपटून काढणे हे आपले मुख्य कर्तव्य आहे, हे यशवंतरावांच्या तात्काळ लक्षात आले. आपल्या आधीच्या मंत्र्यांचा उद्दाम स्वभाव आणि अहंमन्य वृत्ती ही असंतोषाचे मूळ आहे हे त्यांनी ओळखले. या बाबतीत यशवंतरावांचा स्वभाव अगदी विरूद्ध होता. आपल्या सौजन्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाने आणि सुसंस्कृत वृत्तीने दिल्लीच्या राजकीय जीवनावर त्यांनी आपला ठसा उमटवला. संरक्षण मंत्रालयात अभ्यासुवृत्ती आणि विद्वत्ता या गुणांमुळे यशवंतरावाबद्दल आदर होता. लष्करात सर्व स्तरावर त्यांना मान होता, कारण साध्या जवनांपेक्षा आपणास लढाईची अधिक माहिती आहे असा दावा त्यांनी कधीच केला नाही. आपल्या कौशल्याने आणि संयमाने त्यांनी लष्कर आणि संरक्षण मंत्रालय यांना जवळ आणले.”

दुसऱ्या दोन आठवणीत मा. राम प्रधान लिहितात – पैकी **“असामान्य प्रशासक”** – या आठवणीत सांगताना ते म्हणतात, ‘यशवंतरावजी आम्हाला सांगत की, जी साधने दिली आहेत त्यांचा कशाप्रकारे उपयोग केल्यास ही साधने जास्तीत जास्त उपयुक्त व परिणामकारक ठरतील हे ज्यांच्या हातात साधने आहेत, त्यांनीच ठरवावयाचे असते. ते दुसरे असेही म्हणत की, ही माणसे, जे अधिकारी माझ्याबरोबर काम करतात त्यांच्याकडून मी जेवढी निष्ठेची अपेक्षा करतो, तेवढीच निष्ठा मी त्यांना परत दिली पाहिजे. निष्ठा म्हणजे दुहेरी मार्ग आहे. तो कधी एकतर्फी होऊ शकत नाही.’ यशवंतरावजींची ही आठवण सांगताना श्री. प्रधान म्हणाले, ‘त्यांच्या या विचारसारणीचा मला कित्येक वेळा अनुभव आला आहे.’ यशवंतरावजी आपल्या खात्यातील पेचप्रसंग मुत्सद्दीपणाने कसे सोडवीत याचे अनेक दाखले प्रधान यांनी दिले.

दुसऱ्या ‘**कौशल्याची कसोटी**’ – या आठवणीत ते म्हणतात, ‘यशवंतरावजींच्या शासकीय कौशल्याची कसोटी संरक्षण खात्याचे सचिव

व लष्कर प्रमुख जनरल चौधरी यांच्यातील बेबनावाच्या वेळी दिसून आली. या विषयीची आठवण सांगताना श्री. प्रधान म्हणाले, पी. व्ही. आर. राव हे अत्यंत विद्वान, शिस्तप्रिय आणि कडक, त्यामुळे त्यांच्यासमोर सैन्यातील वरिष्ठ अधिकारीही थरथर कापत. पी. व्ही. आर. राव यांचा पिंड सखोल अभ्यास करण्याचा होता. समोरच्या अधिकाऱ्यावर प्रश्नांची सरबत्ती करून ते माहिती घेत. एखाद्या अधिकाऱ्याने प्रश्नांचा सखोल अभ्यास केला नाही किंवा माहिती घेतली नाही असे श्री. राव यांना आढळून आले, तर ते त्या अधिकाऱ्याची हजेरी घेत. मग तो अधिकारी कितीही उच्चपदस्थ असो. याचमुळे जनरल चौधरी हे पी. व्ही. आर. राव यांच्यावर नाराज झाले होते. कारण पी. व्ही. आर. राव यांनी दुसऱ्या अधिकाऱ्याच्या देखत जनरल चौधरी यांचीच हजेरी घेतली असावी. त्यामुळेच जनरल चौधरी आल्या आल्याच मला म्हणाले की, मला आत्ताच संरक्षणमंत्र्यांना भेटावयाचे आहे. मी म्हटले आपण आत जाऊ शकता. अत्यंत गंभीर व निर्धारपूर्वक चेहऱ्याने जनरल चौधरी संरक्षणमंत्र्यांच्या खोलीत गेले. त्यांच्या चेहऱ्यावरून मला वाटले की, आपले म्हणणे संरक्षणमंत्र्यांनी ऐकलेच पाहिजे व आपल्या मनाप्रमाणे होईल या निर्धाराने जनरल चौधरी आत गेले आहेत. चौधरी पाच मिनिटांतच हसत हसत बाहेर आले, तेव्हा मला वाटले की त्यांचा पी. व्ही. आर. राव यांच्या बाबतीत खरोखरच विजय झाला असावा मी जनरल चौधरींना विचारले, काय आपल्या मनाप्रमाणे झाले ना? त्यावर त्यांनी उत्तर दिले की, “संरक्षणमंत्र्यांना भेटताच मी ज्या गोष्टीचा राग मनात ठेवून गेलो होतो तो राग कोठल्या कोठे गेला.’

राजधानीने आणि त्यातील नेत्यांनीही त्यांचा चांगला मान राखला. दिल्लीच्या मुक्कामात यशवंतरावांनी संरक्षणांनंतर, गृह, अर्थ, परराष्ट्र संबंध अशी मुख्य खाती सांभाळली. त्यांचा गौरव असा की गृहखात्याची धुरा यशवंतरावांनी स्वीकारली त्यावेळी जातीयवादाला उधाण आले होते, नक्षलवादाचा उदय, आमदारांच्या मोठ्या प्रमाणावरील पक्षांतरामुळे

निर्माण झालेली राजकीय अस्थिरता काही राज्यात विधानसभा बरखास्त करून राष्ट्रपती राजवट जारी करण्याची आवश्यकता, जातीय दंगली अशा अनेक प्रकारच्या आघाड्यांवरील नाजूक परिस्थितीला यशवंतरावांना तोंड द्यावे लागले. अनेक कटु निर्णय घ्यावे लागले.

इंदिराजींच्या कारकीर्दीत जेव्हा पार्लमेंट स्ट्रीटवर साधूंनी दंगल उडवली तेव्हा गुलजारीलाल नंदा यांना गृहमंत्रीपद सोडावे लागले. कारण आणीबाणीची ती परिस्थिती होती. पण यशवंतरावांच्याकडे ते मंत्रीपद आले आणि त्यांनी गोंधळाची परिस्थिती चांगल्या रीतीने हाताळली. यशवंतरावांचा हा दिल्लीतील वैभवाचा काळ होता. काँग्रेसमधील श्रेष्ठी म्हणून त्यांची राष्ट्रीय नेत्यात आधीपासूनच गणना झालेली होती. मुख्यमंत्र्यामध्ये त्यांना कामराज आणि बिपीनचंद्र रॉय यांच्याबरोबरीने स्थान संपादन केले होते. त्यानंतरच्या काळाता केंद्रातील एक मानधन मंत्री म्हणून त्यांची राष्ट्रीय व्यासपीठावर ते अधिकरच प्रकर्षाने चमकू लागले. इतके की, पंडितजींच्या तसेच शास्त्रीजींच्या निधनानंतर प्रधानमंत्री म्हणून कोणाची निवड केली गेली नाही. यशवंतरावांचे वैशिष्ट्ये असे की त्यांनी कधीही आपले स्वतःचे प्यादे पुढे सरकविण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांच्या अपरोक्ष मात्र त्यांचे नाव या ना त्या रीतीने प्रधानमंत्रीपदाच्या रस्सीखेचीत पुढे आले जातच होते.

एक गोष्ट मात्र निश्चित की, गृहमंत्री म्हणून अनेक संकटांना सामोरे जाताना, अनेक प्रश्नांची गुंतागुंत सोडविताना त्यांनी मृदु, मुत्सद्दीपणा, कमालीचा संयम आणि वस्तुस्थितीची यथार्थ जाण दाखविली. परिणामतः संकटाचे निवारण तर झालेच पाहिजे, शिवाय कोठेही कटुता निर्माण झाली नाही.

त्यानंतर यशवंतरावांच्याकडे अर्थमंत्रीपद सोपविण्यात आले. १९६९ च्या बंगलोर बैठकीत बँकांच्या राष्ट्रीयीकरणावर शिक्कामोर्तब झाले होते. त्यावेळी अर्थखाते मोरारजीभाई देसाई यांचेकडे होते. परंतु त्यानंतर

राजकीयदृष्ट्या कठीण काळ सुरू झाला. मोरारजीभाई देसाई यांचेकडील अर्थखाते काढून घेण्यात आले. त्यामुळे त्यांना राजीनामा देण्याशिवाय इतर पर्याय उरला नाही. असे मोरारजीभाईंचे मत बनले. यशवंतरावांच्याजवळ त्यांनी त्याचा उच्चार केला. सिंडीकेटच्या पुष्कळांच्या मनात बँकांच्या राष्ट्रीयीकरणास विरोध होता. शेतीचा विकास, औद्योगिक उत्पादन, काळा पैसा, कामगारांचे औद्योगिक प्रश्न, जमिनीविषयक सुधारणा, कर योजना, उत्पादन वाढ, आर्थिक नियोजन, चलन फुगवटा, महागाई आदींची अंमलबजावणी करावी लागणार आहे असं पंतप्रधानांनी सूचित करताच यशवंतरावांना त्यांच्या बोलण्याचा हेतू लक्षात आला. बॅकांच्या राष्ट्रीयीकरणाचा पाठपुरावा यशवंतराव महाराष्ट्रात आल्यापासून करीत आले होते. बंगलोरच्या अधिवेशनात त्यांनी त्यासाठी निश्चित अशी भूमिका घेतलेली होती. त्या ठरावाची अंमलबजावणी केली पाहिजे याचा यशवंतरावांनी अर्थखाते घ्यावे आणि अंमलबजावणी करावी असा सरळ अर्थ होता. गृहखातं पंतप्रधानांना स्वतःकडे घ्यायचे होते. यशवंतरावांनी जी कामगिरी केलेली आहे त्यामुळे त्यांची प्रतिमा देशात उंचावली होती. दिल्लीला ते खटकले. अर्थमंत्रीपद यशवंतरावांनी स्वीकारावे म्हणून दीड-दोन महिने प्रयत्न केल्यानंतर अखेरीस यशवंतरावांनी अर्थखाते स्वीकारण्याचे मान्य केले. जगात चलन फुगवट्याची गंभीर परिस्थिती निर्माण झालेली होती. अशा वेळी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. त्यांना महाराष्ट्रात असतानाही अर्थखात्याबद्दल अनुभव नव्हता. परंतु पूर्वानुभव नसूनही त्यांनी ते खाते उत्तमपणे सांभाळले.

त्यानंतर ऑक्टोबर १९७४ साली यशवंतरावांची पराष्ट्रमंत्रीपदी नियुक्ती झाली या खात्याचा कारभार करताना तर आपल्या मुत्सद्दीपणाचा, व्यवहार कुशलतेचा आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील ज्ञानाचा ठसा त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटवून ठेवला. युनोमध्ये त्यांनी जी भाषणे केली. त्यातून जागतिक परिस्थितीचं त्यांनी जे विश्लेषण

आणि भारताची भूमिका विषद केली त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व आंतरराष्ट्रीय पातळीवर उजळून निघालं "इंडियाज फॉरिन पॉलिसी" या ग्रंथात आणि "विदेश दर्शन" यातील त्यांनी आपली पत्नी सौ. वेणुताईस पाठविलेल्या पत्रातून परराष्ट्र व्यवहाराविषयी जे नमूद करून ठेवलं आहे ते पुढील पिढ्यांनी अभ्यासावं, त्याचं चिंतन कराव असं आहे.

यशवंतराव परराष्ट्र व्यवहारमंत्री असलेल्या काळातच देशात आणीबाणी लादली गेली त्यावेळी यशवंतरावांची खरोखरच कसोटीची वेळ होती. सत्तेत राहिले पाहिजे आणि जनतेतही राहिले पाहिजे अशी यशवंतरावांची द्विधा मनःस्थिती झालेली होती. तरी पण राष्ट्रीय कार्य करीत असताना स्वतःला विसरलं पाहिजे, भविष्याकडे लक्ष ठेवलं पाहिजे. रागानं मोडता येतं, जोडता येत नाही, तडजोडीनं वागलं पहिजे असा विचार करून त्यांनी आपले काम सुरू ठेवल्याचं दिसून येतं.

१८ जानेवारी १९७७ रोजी इंदिरा गांधींनी नाट्यपूर्ण रीतीने निवडणुकांची घोषणा केली. आणीबाणीमुळे कोंदटलेले राजकारण एकदम खुलं झाले. त्यानुसार १९७७ मध्ये निवडणुका झाल्या. निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. यशवंतराव या निवडणुकीत विजयी झाले. या निवडणुकीत वातावरण खुले झाल्यावरही यशवंतराव काँग्रेसमध्येच राहिले.

जनता पक्षाच्या मोरारजी देसाई यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत विरोधी पक्षनेतेपद संभाळण्याची जबाबदारी काँग्रेस पक्षानं त्यांच्यावर सोपविली. यशवंतराव मुरब्बी संसदपटू असल्यानं त्यांनी विरोधी पक्ष नेतेपद दर्जेदारपणानं सांभाळलं.

त्यानंतरच्या घडलेल्या घटनांनी देशातलं संपूर्ण राजकीय चित्रच पालटून गेलं. भा. ज. प. आणि काँग्रेसनं. चौधरी चरणसिंग यांना पाठिंबा देऊन त्यांना पंतप्रधान पदी बसवलं. काँग्रेसनं निर्णय घेऊन चरणसिंग यांच्या मंत्रिमंडळात यशवंतरावांना उपपंतप्रधानपद स्वीकारण्यास भाग

पाडलं अपेक्षेप्रमाणे चौधरी चरणसिंग यांचे सरकार अल्पकाळच टिकले.

वेलेफ् हँगेन 'AFTER NEHRU WHO' याने आपल्या पुस्तकात आढ व्यक्तींची, पंतप्रधानाची क्षमता असलेल्यांची यादी दिलेली होती त्यात लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, मोरारजी देसाई, व्ही. के. कृष्ण मेनन, यशवंतराव चव्हाण, जयप्रकाश नारायण, स.का. पाटील आणि बी.एम. कौल यांची नावे असून त्यांनी म्हटले आहे "नेहरू व्यतिरिक्त राजकीय गुणधर्मांचे अधिक संतुलित मिश्रण असणारा यशवंतरावांच्या इतका दुसरा उत्तम भारतीय नेता नाही असे माझे मत आहे" ते पुढे म्हणतात. "इतर परिस्थिती समान असल्यास, अर्थात तशी ती क्वचितच असते, पंतप्रधानपदासाठी असलेल्या शर्यतीत चव्हाण हे दीर्घकाळ राहू शकणारे उत्कृष्ट पंतप्रधान होण्याची जास्त शक्यता आहे."

१९८० जानेवारीमध्ये पुन्हा निवडणुका होऊन इंदिरा काँग्रेस प्रचंड बहुमताने सत्तेवर आली. यशवंतरावांची राजकीय पुण्याई आणि लोकसंग्रह, लोकप्रेम जबरदस्त ठरलं. इंदिरा काँग्रेस व्यक्तिरिक्त ते महाराष्ट्रात एकमेव निवडून आले. काही दिवसातच यशवंतरावांनी इंदिरा काँग्रेसमध्ये परतण्याचा विचार बोलून दाखवायला सुरुवात केली. या "स्वगृही" येण्याचा निर्णयसुद्धा यशवंतरावांच्या जीवनात वादग्रस्त ठरला. यशवंतरावांच्या प्रतिष्ठित, साहित्यिक, उच्चभ्रू मित्रपरिवाराला त्यांचे "स्वगृही" जाणे मान्य नव्हते. परंतु यशवंतरावांनी आपला निर्णय बदलला नाही. निवडणुकीत विजय संपादन करून इंदिराजी सत्तेवर आल्या तेव्हा यशवंतरावांना मंत्रिमंडळात न घेता त्यांना आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष नेमले.

त्याही परिस्थितीत यशवंतराव मनानं स्थिर राहिले, जनतेच्या मनाची गाडी त्यांना चांगली अवगत होती. त्यामुळे खोट्या भावनेवर स्वार होऊन निर्णयात बदल करण्याची गरज त्यांना वाटली नाही. तडजोडीनं समजुतीनं घेण्याचा त्यांचा स्वभावच होता. सत्तेत पुन्हा स्थान मिळावं

यासाठी लांगून-चालन करायचं नाही, लाचार बनायचं नाही, कोणाचे पाय धरायचे नाहीत किंवा कोणामार्फत रदबदली करायची नाही याची त्यांनी मनानं तयारी केलेली होती. आपण काँग्रेसच्या मूळ प्रवाहापासून दूर राहण्यानं विरोधी पक्षाचं फावणार आहे. काँग्रेस खिळखिळी होण्यात त्याचा परिणाम घडणार आहे हे त्यांनी ओळखळे होते. दिल्लीनं खेळ सुरू केल्यापासून महाराष्ट्रात मुख्यमंत्री बदलले जात आहेत आणि त्यामुळे महाराष्ट्राच्या स्थैर्याला बाधा येत आहे विकास थंडावला आहे हे ते अनुभवत होते. मुख्य म्हणजे त्यांना नव्यानं आता काही मिळवायचं नव्हतं. स्वतंत्र नेतृत्त्व आणि त्यासाठी लोकांचा पाठिंबा या गोष्टी क्षणिक असतात हा अनुभव संग्रही होताच.

१९६२ मध्ये पं. जवाहरलाल नेहरूंनी यशवंतरावांना दिल्लीत बोलावून संरक्षणमंत्री केले हा त्यांचा व्यक्तिगत जीवनातील परमोच्च बिंदू होता. भारत-चीन युद्धातील पराभवाच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्राच्या सह्याद्रिवर ही हिमालय रक्षणाची जबाबदारी येऊन पडली होती. ती त्यांनी सरंक्षण खात्यात उल्लेखनीय कामगिरी करून पार पाडली.

१९६२ साली यशवंतराव दिल्लीला गेले ते अखेरपर्यंत १९६२ ते १९८४ या २२ वर्षाच्या काळात ते संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान, आठव्या अर्थ आयोगाचे अध्यक्ष अशा अनेक पदावर होते. प्रत्येक खात्यावर त्यांच्या स्वतंत्र व्यवस्थापकीय शैलीचा ठसा उमटला आहे. त्यांची सौम्यवृत्ती, विवेकीधोरण, मोकळे मन, अभ्यासूपणा, दिवसरात्र काम करण्याची क्षमता, मृदु संभाषण यामुळे अनेक अधिकारी अक्षरशः मंत्रमुग्ध होत असत.

ही गोष्ट केवळ दैवयोगाने झाली नाही. बंगालमध्ये डॉ. बिपीनचंद्र रॉय निधन पावले. त्यांच्या जागी पी.सी. सेन मुख्यमंत्री झाले. केरळचे मुख्यमंत्री पट्टण थाणू पिल्ले यांना पंजाबचे राज्यपालपद लाभल्यामुळे आर. शंकर केरळचे मुख्यमंत्री झाले. असा कोणताही दैवयोग यशवंतरावांच्या

बाबतीत घडून आला नाही. म्हैसूरच्या एस. आर. कंठी यांनी आपली खुर्ची स्वार्थत्यागपूर्वक सोडून एस. निजलिंगप्पा यांना मुख्यमंत्री होऊ दिले. आंध्रचे मुख्यमंत्रीपद संजीव रेड्डी यांना बहाल केले. यशवंतरावांवर तरी कोणी मेहेरबानी करून त्यांना मोठेपणा मिळवून दिला नाही. यशवंतरावांचा शोध घेत त्यांचा मोठेपणा त्यांची पावले चुंबीत त्यांच्या मागून धावत आला आहे.

यशवंतरावांचा मोठेपणा हा वस्तुतः त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सावली आहे. सावली ही जशी माणूस फिरेल तशी त्याच्या पावलाशी घोटाळत असते. तसा यशवंतरावांचा मोठेपणा पाठलाग करत यशवंतराव धावत असलेले जनतेने कधी पाहिले नाहीत. यशवंतराव राष्ट्राचे निष्ठावंत सैनिक होते. जनतेने श्रद्धापूर्वक पाईक होते. अंगावर सोपविलेली कामगिरी जिद्दीने, जिव्हाळ्याने करायची, त्यात अंगचोरपणा दिसायचा नाही, तसाच मनाचा कमकुवतपणा आढळायचा नाही. स्वीकारलेल्या कामगिरीबाबत शंकाकुशंका निर्माण करून अवसानघात करायचा नाही. त्याबरोबरच वरीष्ठांसमोर पत्करलेल्या कामाचे फलित सादर करताना आलेल्या अडचणींचा, येणाऱ्या संकटांचा स्पष्ट पाढा वाचण्यास चुकायचे नाहीत. यशवंतरावांच्या याच वृत्तीमुळे ते जनतेच्या विश्वासाला आणि वरिष्ठांच्या लोभाला सारखेच पात्र झालेले होते.

यशवंतरावांच्या बाबतीत एक गोष्ट अगदी खरी आहे. ती हीच की, अडचणीच्या वेळीच त्यांचे व्यक्तिमत्त्व कसाला लागते. आपत्तीच्या काळातच त्यांच्या कर्तृत्त्वाला धार येते. मनाचा मानी मराठा मनगटाच्या मिजाशीत आला की तेजाने तळपू लागतो. समराने त्यांच्या स्वभावातील सौजन्य मावळत नसले तरी त्यांच्या शौर्याला शिखर जवळ दिसू लागते! प्रतिपक्षाशी यशवंतराव वैरभावनेने वागल्याचे उदाहरण सापडणार नाही. प्रतिपक्षाला त्यांनी आपल्यावर कधी डाव करू दिल्याचेही उदाहरण मिळणार नाही असा ही चतुरस्त्र कर्तबगारीचा राजकारणी नेता विरळाच होता.

यशवंतरावांच्या ठिकाणची तारतम्यशक्ती तल्लख होती. हे त्यांच्या सर्वांगीण यशाच रहस्य आहे. सत्य व असत्य यांचा उलगजा ते चटकन करू शकत होते. भल्याबुऱ्यांचा त्यांचा विवेक अचूक होता. चांगला कोण, वाईट कोण याचा अलगडा जसा ते स्वतःच्या मनाशी सत्त्वर करू शकत होते, तसेच कोणत्या बाबतीत काय करायला पाहिजे, काय करता काम नये याचाही सारासार विवेक त्यांना होता. राजकारणामध्ये शेकडो नव्हे हजारो लोकांना सांभाळून घ्यावे लागते. अनंतांचे अनंत अपराध पोटात घालावे लागतात. पुन्हा त्यांच्या अंगच्या चांगल्या गुणांचा समाजाला, जनतेला, देशाला चांगला उपयोग होईल असा मार्ग त्यातून शोधावा लागते. हे काम अतिशय कठीण असते. सोनाराची नाजूक हातोडी, लोहाराचा भक्कम हातोडा या दोहोंचा समन्वय सारख्याच कसबीपणाने वापर जो करू शकेल, त्यालाच अशा कामात यश येऊ शकते.

यशवंतरावांच्या ठिकाणी सुवर्णकाराचे नाजूक हस्तकौशल्य होते तसेच लोहाराचे जबर सामर्थ्यही होते. जी गोष्ट केलीच पाहिजे असे त्यांच्या मनावा पटेल ती करण्यात ते कधीही टाळटाळ करत नव्हते. कोणाच्या स्तुती, निंदेचा मनाला विचारही शिवू देत नव्हते. समाजजीवन हे सागराला मिळणाऱ्या गंगौघाप्रमाणे शतमुखी असते याची त्यांना चांगली कल्पना होती. समाजाची ही सर्व तोंडे समर्थ झाली तरच तो समाज उन्नत होऊ शकतो. म्हणून समाजाच्या शेकडो गरजा भागवल्या गेल्या पाहिजेत असे त्यांचे धोरण होते. त्यांचा आणखी एक मोठा गुण म्हणजे त्यांच्या इतका आपल्या जिभेवर नियंत्रण ठेवणारा राजकारणी पुरुष खरोखरच लाखात एखादाच सापडायचा. वाणी हे पुढाऱ्याजवळचे अत्यंत प्रभावी अस्त्र आहे. त्या अस्त्राने नको असलेल्या रोगट अवयवावर शस्त्रक्रिया करता येते. हव्या असलेल्या सदृढ अवयवांवर सुरीहल्ला करून जखमाही करता येतात. भारतात वाणीच्या दुरुपयोगाने जखमा करणारे पुढारी फार आहेत. भारतीय राजकीय वातावरणातील शेकडा ८० टक्के तरी वाद, वितुष्ट, वैर विव्हळणी ही वाणीच्या दुरुपयोगातून जन्म पावलेली आहेत

असेच विचारांती दिसून येईल.

यशवंतरावांचा आपल्या वाणीवरील ताबा विलक्षण होता. खरे सांगायचे असेल तर तो लोकोत्तर आहे. मोजके, मृदु, मुद्देसुद बोलण्यात ते अग्रेसर होते. आपले मत ठामपणे मांडताना ते प्रतिपक्षावर वाणीचे जखमी प्रहार करीत नव्हते. मुद्याने मुद्दा खोडून, ते वस्तुस्थितीने विरोध हाणून पाडत. प्रांजळपणाने प्रतिपक्षाचा ग्राह्यांश पटकन मान्य करत. वादे वादे शीर्षभंगापर्यंत ताणण्यापेक्षा तत्त्वाचा भाग पदरात पाडून बाकी फोलपट भर्रदिशी फेकून देत. यशवंतराव सर्व विषयांवर बोलत. सर्व प्रसंगी बोलत. सर्व ठिकाणी बोलत. कोणता वि स्टनी हा शब्द बऱ्याचदा येत असे. नियतीचे संकेत लक्षात घेण्याचा सतत प्रयत्न ते करत असत. यशवंतरावही नियतीची भाषा समजून घेण्याचा प्रयत्न करत होते. पण ते दैववादी नव्हते. माणसाच्या जीवनाला बरेवाईट वळण देण्याचा प्रयत्न आपण करतच असतो. पण बऱ्याचदा एखादी अदृश्य शक्ती म्हणजेच नियती. कधी हाताने तर कधी हाकेने नियती माणसाला खुणावत असते, इशारे देत असते. एखाद्या गोष्टीसाठी ती माणसाला प्रवृत्त करते, ती कधी रोखते तर कधी ठोकते. 'नियतीचा हात' या नावाचा एक लेख यशवंतरावांनी लिहिलेला आहे. त्यालेखात त्यांनी नियतीच्या सेकंतावर बरेच भाष्य केले आहे. त्यांच्या स्वतःच्या आयुष्यात कितीतरी बऱ्यावाईट घटना घडल्या; परंतु अवतीभोवतीच्या परिस्थितीशी संवाद साधत त्यांनी पुढची वाट मनातला आशावाद ढळू न देता सुरू ठेवली. प्रेरणा मिळत गेल्या, साथीदारांचा काफिला वाढत गेला, विचारांची दिशा स्पष्ट होत गेली. मग पायाखालच्या वाटेने त्यांना एका क्षितिजापासून दुसऱ्या क्षितिजापर्यंत आणून सोडले. धोक्याची वळणेही आली; पण अशा प्रसंगी नियतीने सिग्नल उभा करून त्यांना सावध केले. सिग्नल पडला की पुढे जायचे. तारतम्य आणि सतत सावधानता ही त्यांच्या व्यक्तीमत्त्वाची ठळक व्यवच्छेदक लक्षणे होती. सावधानता आवश्यक आहेच, पण कधी कधी तिची जागा साहसाला देणे आवश्यक ठरते. यशवंतरावांच्या आयुष्यात

तसे झाले असते तर देशाच्या इतिहासाला वेगळे वळण लाभले असते. नियतीला ते मंजूर नव्हते असे म्हणता येईल का?

१९८४ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी यशवंतराव २६ नोव्हेंबर १९८४ रोजी सातारला येणार होते, सातारा, कऱ्हाड येथे त्याप्रमाणे निरोप दिलेले होते. मुंबई, पुणे येथील दौरा आणि भेटीगाठी निश्चित झालेल्या होत्या. परंतु मनुष्य ठरवतो एक आणि घडतं दुसरंचं! देवाघरचं बोलावणं कुणाला कळत नाही. मनुष्य हा नेहमीच पराधीन राहिलेला आहे.

२५ नोव्हेंबर १९८४ रोजी रात्री ७.४५ वाजता दिल्ली येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने महाराष्ट्र शोकसागरात बुडाला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळाला जोडणारा महत्त्वपूर्ण दुवाच तुटला. राजकारण हे विचारांच्या आणि नैतिक मूल्यांच्या पायावर उभे असते आणि असले पाहिजे, असे मानणारे कार्यकर्ते आता फारसे दिसत नाहीत. यशवंतरावांनी जे राजकारण केले त्याच्यामागे काही विचार होते, काही निष्ठा होत्या. काही श्रद्धा आणि काही स्वप्ने उराशी बाळगून त्यांनी राजकारण केले होते. त्यांना राजकारण अभिप्रेत होते. ते सामाजिकदृष्ट्या आशयगर्भ होते. त्या युगाचे निर्माते होते. त्याला एक विशिष्ट दिशा होती. त्यांची उद्दिष्टे स्पष्ट होती. यशवंतराव एक महान युगाचे प्रतिनिधी होते. म. गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरूंच्या युगाच्या प्रेरणा त्यांच्या विचारात आणि कार्यात अभिव्यक्त झाल्या होत्या. म्हणून यशवंतरावांचे निधन म्हणजे महाराष्ट्राच्या समकालीन इतिहासातील एका युगाचा अंत असे मानणे आवश्यक आहे.

हवाईदलाच्या खास विमानानं पार्थिवदेह दि. २६ नोव्हेंबर रोजी मुंबईत आणण्यात आला. संपूर्ण दिवसभर त्यांचा पार्थिव देह मुंबईकरांच्या दर्शनासाठी सह्याद्रि येथील मुख्य प्रांगणात ठेवण्यात आला. दि. २७ रोजी वायुदलाच्या खास हेलिकॉप्टरने त्यांचा पार्थिव देह सकाळी कऱ्हाडला

आणण्यात आला. त्यावेळी कऱ्हाड विमानतळ ते यशवंतरावांचं निवासस्थान 'विरंगुळा' बंगला या रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या संख्येने जनसमुदाय साश्रुनयनांनी पार्थिवावर फुले उधळून, पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहत होते. विरंगुळा बंगल्यावर त्यांचा पार्थिव देह जनसागराच्या दर्शनासाठी ठेवण्यात आला. तेथे शेकडो कार्यकर्त्यांनी हजारो लोकांनी अश्रूपूर्ण नयनांनी श्रद्धांजली वाहिली. दुपारी एक वाजता अंत्ययात्रा निघून तीनचे दरम्यान कऱ्हाडच्या प्रीतिसंगमावर यशवंतरावांच्या देहाला चंदणी चित्तेवर अग्नी देण्यात आला. हे दृश्य पाहताच संगमावर जमलेल्या पाच लाख जनसमुदायाच्या हुंदक्यांनी दाही दिशा गदगदून गेल्या. दुपारी तीनचे दरम्यान मी कृष्णा-कोयनेच्या संगमावर जाण्यासाठी निघालो. नदीकाठावर माणासांची अलोट गर्दी झाली होती. लोकांचा लोंढा सारखा येतच होता. जेथे यशवंतरावांच्या चितेला अग्नी देण्याच येत होता तेथपर्यंत सहजासहजी जाणे अतिशय अवघड होते. मी माणसांच्या अलोट गर्दीतून पावला-पावलाने पुढे सरकत जात होतो. शेवटी ५ चे सुमारास कसातरी पेटलेल्या चितेसमोर जाऊन पोहोचलो. महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर कशी असावी याचे चित्र यशवंतरावांनी रेखाटले होते. खरे म्हणजे ती सफर विघटनाच्या दरीत कोसळली होती. चिता जळत होती. पलीकडे बरीच नेतेमंडळी दिसली. यशवंतरावांचे मानसपुत्र शरद पवार यांचा शोकमग्न, चिंतातूर चेहरा ठळकपणे दिसला. चिता प्रज्वलित करून बराच वेळ झाला होता. चितेवरील तीन-चार जळणारी लाकडे खाली पडली आणि मला दिसला तो यशवंतरावांचा हात. कोपरापासून पुढचा हात- तो जवळपास जळाला होता. तो उजवा हात होता याची मी खात्री करून घेतली. शेजारीच यशवंतरावांचे कऱ्हाडमधील सहकारी राजाराम जिरंगे होते. त्यांनी लगेचच त्या चितेवर आणखी लाकडे ठेवली. वस्तुतः यशवंतरावांचा तो हात मी अनेकदा पाहिला होता. यशवंतरावांची भाषणे ऐकताना यशवंतरावांचा तो हात मी अनेकदा पाहिला होता. तोच हात मला येथे

आणि अशा अवस्थेत दिसला व काळजात चर्र झाले. यशवंतरावांचा हा हात नियतीच्या हाकेला ओ तर देत नसेल? या प्रश्नाने माझ्या मनाचा ताबा घेतला. दोन्ही हात जोडून श्रद्धांजली वाहिली व मागे वळलो. मागे वळताना पैलतीरी विसावलेले हेलिकॉप्टर दिसले. यशवंतरावांचे कलेवर मुंबईहून कऱ्हाडला याच हेलिकॉप्टरने आणले होते. सूर्य अस्ताचलावर हळूहळू उतरत होता. त्याची किरणे कृष्णा- कोयनेच्या संगमातील पाण्यावर विषण्णतेने विखुरली होती. नदीच्या पात्रात अधिक पाणी नव्हते. लोक हातपाय धुऊन परतत होते.

मी खिन्न मनाने पाण्याच उभा राहिलो. आजूबाजूला माणसांची गर्दी होतीच. ओंजळीत पाणी घेऊन तोंड व हात धुतले. “पापण्यात गोठविली मी नदी आसवांची” ही कविवर्य ग. दि. माडगुळकर यांची कविता मला आठवली. माडगूळकर गेले तेव्हा यशवंतरावांनी आपला शोक याच शब्दात व्यक्त केला होता. त्याच शब्दांनी माझ्या मनातील दुःखभावनेलाही वाट करून दिली.

प्रीतिसंगमाच्या कुशीत विसावलेले एक इवलेसे रोप. गगनावरी गेलेला वेलू पाहण्याचे सोनियाचे क्षण त्याला लाभले. स्वतःच्याच सोनेरी किरणात न्हाऊन निघालेला कृष्णाकाठ पाहिला अन् कृष्णाकाठीच एका तेजस्वी सूर्याचा अस्त झाला! सह्याद्रीच दुभंगला, शब्दही मुके व्हावे असा हा वियोग.

कृष्णा नदी ही भारताच्या प्राचीनतम संस्कृतीचे व जीवनप्रवाहाचे प्रतीक आहे. हा जीवनप्रवाह बदलत राहतो. त्याचे प्रतीक मात्र कृष्णाच राहते. याच प्रदेशात यशवंतरावांचे जीवन घडले. जात्याच त्यांना निसर्गाची ओढ अधिक होती. नदीच्या संगमावर - काठावर बसावं आणि एकमेकांत मिसळून जाणारं आणि पुढे एकोप्यानं संथ गतीनं चाललेलं जीवन पहावं असा एक छंद त्यांनी जोपासला होता. तरुण वयात असताना कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करण्याचं यशवंतरावांचं ठिकाण म्हणजे हा संगम.

माणसाचे छंद, त्याच्या स्वभावाचे निदर्शक असतात असे म्हटले जाते. या विचारांचा, संस्कारांचा, साहचर्याचा मागोवा घेत घेत यशवंतरावांनी आपले कर्तृत्त्व केले. या स्थानाबद्दल त्यांना विशेष जिव्हाळा होता आणि म्हणूनच ते आपल्या "ऋणानुबंध" या १९७० मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेत म्हणतात, 'कृष्णा कोयना या दोन नद्यांच्या काठावर नांदणारे माझे गाव कऱ्हाड यास. . . . . .'

'तुझ्यापासून वर्षानुवर्षे दूर राहिलो, पण तुझी ओढ नित्य वाढतच राहिली. कोयनेच्या काठी राहिलो, खेळलो, तर कृष्णेच्या काठी शिकलो-वाढलो. दोन्ही नद्यांच्या पाण्यात डुंबलो. याच पाण्याने काही छंद लावले काही श्रद्धा दिल्या' त्याचप्रमाणे त्यांनी आपल्या आत्मचरित्राच्या पहिल्या खंडास 'कृष्णाकाठ' असे सार्थ शीर्षक दिलेले आहे. कऱ्हाडचे माजी नगराध्यक्ष पी. डी. पाटील यांना १६ मे १९६१ ला ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना पत्र लिहून कृष्णा - कोयनेच्या प्रीतिसंगमाचा कायापालट घडावा यासाठी काय करावे हे त्या पत्रात त्यांनी लिहिले आहे -

'कऱ्हाडचे सर्वात महत्त्वाचे आकर्षण प्रीतिसंगम. मराठी साहित्यात व इतिहासातही ते अजरामर झाले आहे; परंतु प्रीतिसंगम आज पाहण्यासाठी येणायाला तेथील सर्व वातावरण अव्यवस्थेचे, अस्वच्छ व उपेक्षितांचे असे वाटते. तेथपर्यंत जाताना वाटते, रस्त्यावर आणि वाळवंटात अगदीच ओबड-धोबड परिस्थिती आहे. घाटाच्या समोर खड्डे व इतर ढीग पडलेले असतात. ही सर्व परिस्थिती बदलणे आवश्यक आहे. स्वामीच्या बागेची जागा ताब्यात घेऊन तेथे एक सुंदर संगम उद्यान बनविणे शक्य आहे. भुईकोट किल्ल्याच्या, संगमाशेजारील तटावर दुरुस्ती करुन संगमाचे, पावसाळ्यातील अलौकिक स्वरुप पाहण्यासाठी आकर्षक व्यवस्था करणे जरूर आहे. या भागात कोयनेमुळे हल्ली देशी आणि विदेशी प्रवासी लोकांची संख्या वाढू लागली आहे. त्या सर्व लोकांच्या भेटीचे प्रीतिसंगम हे एक महत्त्वाचे केंद्र बनू शकेल. टुरिझम या खात्याच्या मदतीने हा प्रयत्न करून पाहण्यासारखा आहे. आपण

व्यक्तिशः प्रयत्न करून नगरपालिकेचे या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधावे म्हणून मी हे पत्र या शहराचा एक नागरिक या नात्याने लिहित आहे. प्रयत्न सुरू केल्यास राज्याचे स्थानिक व वरिष्ठ अधिकारीही या प्रश्नात लक्ष घालतील याबद्दल मला मुळीच शंका नाही. पत्र काहीसे लांबले, परंतु मनात असलेले कल्पनांचे ओझे आज हलके झाल्याचे समाधान मला मिळते आहे.'

**आपला**

यशवंतराव चव्हाण

साहेबांच्या वरील पत्रास अनुसरून नगरपालिकेने किल्ल्याचा तट व नदी यांच्यामधील संगमालगतची सुमारे साडेसात एकर सपाटीची जागा पंतप्रतिनिधिकडून संपादन केली आणि १९७४ साली बागेचा आराखडा तयार केला. सभोवार तारेच कंपाऊंड करून घेतले व बाग तयार करण्यास सुरुवात केली. परंतु ६ जून १९७६ रोजी दोन्ही नद्यांना आलेल्या भयावह पुराने नगरपालिकेने केलेले सर्व प्रयत्न वाहून गेले. त्यानंतर संगमाच्या वळणावर भिंत बांधून तो भाग सुरक्षित करण्याच्या दृष्टीने एक 'नागरी पर्यावरण सुधारणा प्रकल्प' तयार करून तो शासनाकडे १९८३ साली पाठविण्यात आला. (त्या प्रकल्पाचा समावेश सातव्या पंचवार्षिक योजनेत मध्यवर्ती सरकारने केला असल्याचे नगरपालिकेला समजले आहे. तो प्रकल्प पुरा होऊन संगमाच्या वळणावर संरक्षक तट बांधल्यानंतर हा परिसर पुराच्या धोक्यापासून सुरक्षित होणार आहे.)

२५ नोव्हेंबर १९८४ रोजी दिल्ली येथे यशवंतरावांचे निधन झाले. त्यावेळी त्यांचे अंत्यसंस्कार कोठे व्हावेत यासंबंधी बराच वाद झाला. हे संस्कार कऱ्हाड येथेच व्हावेत असा आग्रह कऱ्हाडकरांनी धरला. अखेरीस साहेबांच्या पार्थिव देवाहर २७ नोव्हेंबर १९८४ रोजी दुपारी तीनच्या सुमारास प्रीतिसंगमावरच अग्निसंस्कार झाले आणि त्या ठिकाणी

तात्पुरती समाधी बांधण्यात आली. त्या जागी साहेबांचे राष्ट्रीय स्मारक व्हावे, यासाठी प्रयत्न झाले. त्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून नगरपालिकेने संगमावरील आपल्या सदरील साडेसात एकर जागेत एक विस्तीर्ण उद्यान तयार करण्याची योजना हाती घेतली. त्यास यशवंत उद्यान असे नाव देण्याचे निश्चित केले.

साहेबांच्या निधनानंतर अवघ्या काही दिवसातच स्व. वसंतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली. याशिवाय कऱ्हाड येथे यशवंतराव चव्हाण स्मारक समाधी समिती अशी एक उपसमिती फेब्रुवारी १९८७ मध्ये निर्माण झाली. समाधीच्या जीर्णोद्धारासाठी प्लॅन एस्टिमेट तयार करून घेणे व ते काम पूर्ण करणे, तसेच समाधीजवळ एक पर्णकुटी बांधणे व पाणदरवाजाकडून नदीकडे येणारा घाट दुरूस्त करणे आदी कामांची जबाबदारी या उपसमितीने स्वीकारलेली आहे. तसेच त्यासाठी लागणारा सर्व निधी उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी उपसमितीवरच आहे. आतापर्यंत कऱ्हाड तालुक्यातील सह्याद्री साखर कारखान्याचे सभासद व कर्मचारी यांनी सुमारे पाच लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. मुबंई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने तीन लाख रुपये दिलेले आहेत. शिवाय उपसमितीच्या सदस्यांनी आर्थिक मदतीचे आश्वासन दिले आहे.

कोल्हापूरचे आर्किटेक्ट श्री. बेरी यांनी समाधीचे प्लॅन्स व एस्टिमेटस् तयार केलेले असून ते काम कॉन्ट्रॅक्टर राजाराम जाधव, ॲडव्हान्स कन्स्ट्रक्शन कंपनी, कोल्हापूर यांच्याकडे सोपविण्यात आले होते. या कामासाठी दहा लाख रुपये खर्ची पडले. आर्किटेक्ट बेरी यांनी समाधीचे डिझाईन अत्यंत अभ्यासपूर्वक तयार केले आहे. पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रायगडावरील समाधीच्या धर्तीवर ही समाधी अष्टकोणी असून तिची लांबी - रुंदी २० बाय २० फूट आहे. समाधीच्या सभोवतालचा परिक्रमा मार्ग आठ फूट सहा इंच रुंदीचा आहे. या मार्गाच्या

बाहेरून १६ इंच रुंदीचा व ४ फूट उंचीचा कठडा आहे. समाधीच्या पूर्वेस पाणघाटावर ३० बाय ३० फूट मापाचा अष्टकोनी चौथरा असून तेथून समाधीकडे जाणाऱ्या मार्गाची रुंदी १५ फूट व लांबी ९५ फूट आहे. वरील चबुतरा, समाधीकडे जाणारा मार्ग व समाधी आणि तिच्या भोवतालचा परिक्रमा मार्ग आदी सर्व कामे आर.सी.सी. मध्ये असून परस्परास जोडलेली एकजीव आहेत. या सर्व आर.सी.सी. कामाच्या फौंडेशनसाठी जमिनीपासून सुमारे १५ फूट खोलीपर्यंत एक फूट जाडीचे ७५ आर.सी.सी. कॉलम्स उभे करण्यात आले आहेत. त्या सर्व कॉलम्सना जोडणाऱ्या उभ्या-आडव्या बीम्स सर्वत्र आहेत. त्यावर प्रत्येक ठिकाणी आर.सी.सी. स्लॅब्स टाकण्यात आलेल्या आहेत. या सर्व प्रकारे वरील सर्व आर.सी.सी काम एकमेकास जोडलेले एकजीव व भक्कम करण्यात आले आहे. परिक्रमेबाहेरील सभोवतालचा कठडा याची बांधकामे जमिनीखालील बीमपासून गोकाक ॲण्ड स्टोनच्या घडीव दगडामध्ये करण्यात आलेली आहेत. कठड्याच्या बांधकामाच्या मध्यभागी संगमरवरी जाळी आहे. परिक्रमा चौथरा व मधला मार्ग या सर्वावर आग्रा टाईल्स बसविलेल्या आहेत. मधील समाधीच्या सभोवारच माथ्यावर पिंकशेडची ग्रॅनाईट स्टोन फरशी बसविली आहे.

अशा प्रकारे समाधीचे सर्व काम भक्कम, कलापूर्ण व अतिशय आकर्षक झाले आहे. समाधीची स्लॅब टाकण्यापूर्वी त्यामध्ये एक ताम्रमंजुषा ठेवलेली आहे. तीमध्ये यशवंतरावांचे साहित्य, त्यांच्यासंबंधीचे ग्रंथ, त्यांची भाषणे, लेख, नियतकालिके, विशेषांक, पत्रे, फोटो, अस्थि, रक्षा आदी वस्तू ठेवलेल्या आहेत. त्या ताम्रमंजुषेवर चारही बाजूस त्यांचे जीवनचरित्र व त्यांचे मौलिक विचार कोरलेले आहेत.

समाधीच्या दक्षिण - पूर्व कोपऱ्यात ५० बाय २३ फूट मापाची पक्की इमारत (पर्णकुटी) बांधण्यात आली आहे. त्यासाठी साडेतीन लाख रुपये खर्च झाला आहे. माजी क्रीडा राज्यमंत्री श्री. शामराव अष्टेकर यांच्या प्रयत्नाने शासनाकडून नगरपालिकेस दीड लाख रुपयांचे अनुदान

आमदार फंडातून मंजूर झाले आहे. संगमेश्वराच्या मंदिरापासून किल्ल्याच्या पाणदरवाजापर्यंत जाणाऱ्या नियोजित घाटाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. या घाटाच्या कामासाठी पाच लाख रुपये खर्च झाला आहे.

'यशवंत उद्यान' साडेसात एकर जागेत असून उद्यानाच्या बंदिस्तपणासाठी सर्व बाजूंनी भक्कम असे कंपाऊंड करण्यात आलेले आहे. कोटाच्या दक्षिण भागाकडे छोटीशी रिटेनिंग वॉल बांधण्यात आली आहे. त्यावर बसण्याची सोय व जागोजागी गॅलरीज करण्यात आल्या आहेत.

उद्यानाच्या प्रमुख प्रवेशद्वाराकडून समाधीकडे जाण्यासाठी १५ फूट रुंदीचा रस्ताही केलेला आहे. त्याच्या दुतर्फा विविध शोभिवंत फुले येणाऱ्या पाच फूट रुंदीच्या फ्लावर बेडस् तयार करण्यात आलेल्या आहेत. त्याच्या दोन्ही बाजूस सिल्व्हर ओकची झाडे लावलेली आहेत. या रस्त्याच्या दक्षिणेस विस्तीर्ण पटांगणामध्ये अद्ययावत उद्यान तयार करण्यात आले आहे. त्याचे आराखडे पुण्याचे नामवंत गार्डन आर्किटेक्ट जयंत धारप यांनी तयार केले आहेत. त्यामध्ये विशिष्ट आकार असणारे गोलाकार, नागमोडी रस्ते आखण्यात आले आहेत. बाकीच्या संपूर्ण भागामध्ये विस्तीर्ण अशी हिरवळ तयार करण्यात आली आहे. या हिरवळीचा आकार गोलाकार, नागमोडी अशा विशिष्ट प्रकारचा आहे. तसेच झाडाच्या नागमोडी आकाराच्या विविध ओळी विशिष्ट आकारात लावलेल्या आहेत. ही झाडे लावताना विशिष्ट आकार व विशिष्ट ऋतुत फुलांचा बहर असणारी अशी झाडे निवडण्याच आली आहेत. त्यामध्ये शिरीष, कांचन, बहाबा, कौशिया, बॉटल, ब्रश, गुलमोहर, पांगारा, सिंगापूर चेअरी, चिचकारी अशी वैशिष्ट्यपूर्ण झाडे निवडण्यात आली आहेत.

या उद्यानामध्ये विशिष्ट प्रकारची विद्युत प्रकाशाची योजना फिलीप्स या नामवंत कंपनीकडून तयार करून घेण्यात आली आहे. ही सर्व कामे

परिपूर्ण झालेली आहेत.

उद्यानाच्या दक्षिण बाजूला पंतकोटाच्या तिरक्या भागावर निलगिरीची झाडे लावलेली आहेत. त्यामुळे तो भाग हिरवी भिंत असल्यासारखा भासतो आहे. उतार संपल्यानंतर रिटेनिंग वॉल व उतारामध्ये विविध फुलांची लहान लहान रोपे लावण्यात आली आहेत. बागेच्या या विस्तीर्ण जागेमध्ये काही ठिकाणी विशिष्ट आकाराची झगमगती कारंजी बसविलेली आहेत.

उद्यानाच्या एका कोपऱ्यामध्ये लहान मुलांची अद्ययावत खेळणी बसविण्यात आली आहेत. बागेतील विस्तीर्ण हिरवळ, झाडे, फुलझाडे यांना पाणी देण्यासाठी सर्वत्र पॉप-अपस्पिंक्लर्स बसवून घेण्यात आली आहेत. हे स्पिंक्लर्सही विशिष्ट आकाराचे व हिरव्या रंगाच्या हिरवळीमध्ये मिसळून जाणारे आहेत बटन दाबले की ते जमिनीच्या वर येतात आणि पाणी फवारतात व परत जमिनीत जातात. या विस्तीर्ण उद्यानाच्या पश्चिम बाजूस जुन्या पाणदरवाजातून येणाऱ्या उद्‌ध्वस्त घाटाच्या जागी काळ्या घडीव दगडाचा नवीन अद्ययावत पद्धतीने घाट बांधण्यात आला आहे. या घाटावर खानापुरी फरशी बसविलेली आहे. याशिवाय हरळीही लावलेली आहे. घाटाच्या पश्चिमेस विविध फुलांची रोपे लावण्यात आलेली आहेत व टप्प्याटप्प्याने फ्लावर बेडस् तयार करण्यात आले आहेत.

कृष्णा - कोयनेचा संगम हा पुरातन कालापासूनच पवित्र संगम, पण साहेबांच्या या समाधीस्थानामुळे कृष्णाकाठचा हा सारा परिसरच बोलका बनलेला आहे. समाधी उघड्यावर असून मुक्त आहे. तिच्यावर छत्र नाही. मात्र सभोवतालच्या घनदाट वृक्षांचे सान्निध्य असल्याने समाधीच्या खुल्या दर्शनाने एक प्रकारची दिव्यत्त्वाची अनुभूती मिळते म्हणून या संगमास पवित्र प्रयागतीर्थाचे पावित्र्य प्राप्त झालेले आहे. अनेक देशी-परदेशी पर्यटकांना आकर्षणाचे हे केंद्र झाल्याचे समाधान या समाधीस्थान व परिसरामुळे साकारले आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती वाटू नये.

त्यामुळे हा कऱ्हाडचा एक सांस्कृतिक ठेवाच बनलेला आहे.

सागरेश्वराच्या कुशीत जन्मलेला आणि कऱ्हाडच्या कृष्ण - कोयनेच्या पवित्र संगमावर वाढलेला माणूस पवित्र जगतामध्ये कार्यकर्तृत्त्वाने केवढा मोठा होतो याचे साक्षात रूप म्हणजे "सौ. वेणुताई चव्हाण स्मारक भवना" तील यशवंतराव चव्हाणांचा ग्रंथसंग्रह व वस्तुसंग्रहालय हे होय. आणि हे सर्व पाहून डोळे आनंदाश्रूंनी पाणावतात.

यशवंतरावांनी आपली पत्नी सौ. वेणुताई हिच्या स्मरणार्थ कऱ्हाड येथे स्मृति भवन उभारले असून तेथे त्यांच्या संग्रहातील सुमारे साडेसात हजार मौलिक ग्रंथ व सुमारे चारशे दुर्मिळ मासिकांचे बांधीव गठ्ठे, सहाशे फोटो अल्बम, साठ - मौलिक दुर्मिळ भाषणाच्या कॅसेटस् आणि देश - परदेशात मिळालेल्या भेटवस्तू आहेत. हे ग्रंथ संग्रहालय नजरेत भरण्यासारखे आहे. सौ. वेणुताई चव्हाण यांचे निधन १ जून १९८३ रोजी झाले. त्यानंतर फक्त चारच महिन्यात यशवंतरावांनी आपले इच्छापत्र (वुईल) लिहिले. त्यात यशवंतराव म्हणतात -

'माझी पत्नी कै. सौ. वेणूताई हिचे स्मरणार्थ मी एक सार्वजनिक न्यास (Public Trust) करणार आहे. तिने मला खाजगी व सार्वजनिक जीवनात अमोल साथ दिली आहे. त्यासाठी तिची आठवण जागती ठेवणे हे माझ्या जीवनातील उरलेला एकच आनंद आहे. त्या दृष्टीने माझ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. माझ्या गावी कऱ्हाड येथे एखादी जमीन विकत घेऊन त्यावर एखादी वास्तू बांधावी व अशा वास्तूत माझ्या स्वतःचे ग्रंथालयातील अनमोल ग्रंथ ठेवावेत. तसेच माझ्या जीवनात अनेक व्यक्तींनी व संस्थांनी अनेक वस्तू मला प्रेमाने भेट म्हणून दिल्या आहेत. त्यांचेही सरंक्षण व्हावे व वस्तुसंग्रहालयाच्या रूपाने त्यांचे जतन व्हावे, अशी माझी इच्छा आहे आणि हे ग्रंथालय व वास्तुसंग्रहालय माझ्या पत्नीची स्मृती म्हणून व त्याच्या दैनंदिन जपणुकीची आणि वाढीची योजना करावी, असा संकल्प आहे.'

यशवंतराव बळवंतराव चव्हाण

७- १०- १९८३

पुढच्या परिच्छेदात ते म्हणतात, ‘या स्मृती मंदिरासाठी जी रक्कम लागेल त्यापैकी शक्य तो भाग मी देणार आहे. देणगी म्हणून माझ्या पत्नीचे दागदागिने आहेत. त्यांचे रूपांतर करून जी रक्कम उभी राहील ती सारीच्या सारी या स्मारकास द्यावी. शिवाय मौजे उरळीकांचन येथील बागायत जमीन विकून जी रक्कम येईल ती सारीच्या सारी वरीलप्रमाणेच या न्यासास द्यावी.’

हे वरील मृत्युपत्राचे आदर्शवत स्वरूप कोठे? आणि आज सर्वसामान्य समाजामध्ये दिसणारे मृत्युपत्राचे स्वरूप कोठे? मृत्युपत्र म्हणजे जीव गेल्यावर मागे उरलेल्या निर्जीव मालमत्तेच्या विल्हेवाटीचा रूक्ष हिशोब. त्या मृत्युपत्रामधील कायद्याच्या रखरखीत भाषेत साहित्याचा अगर उदात्त हेतूचा ओलावा कोठून येणार? उलट त्याच्या प्रत्येक शब्दामधून मृत्यूची भेसूर अवकळा डोकावत असते. जनावरांच्या मृतदेहाचे लचके तोडण्यासाठी घारी-गिधाडांचे झगडे होतात त्याप्रमाणे सर्वसामान्यांचे मृत्यूपत्राने वाटून दिलेल्या टीचभर मालमत्तेसाठी शुद्र तंटे माजतात आणि मृताविषयीचा शोक अगर आदर एवढेच काय, पण साधा माणुसकीचा लवलेशही दिसून येत नाही. पण यशवंतरावांचे वरील मृत्युपत्र ज्या मालमत्तेचा उल्लेख आहे तो अमोल आहे. यशवंतरावांचे जीवन सर्वस्व देशातील - महाराष्ट्रातील जनतेवरील व आपली पत्नी सौ. वेणुताईवरील त्यांचे अथांग प्रेम नि त्यांच्या देहाचा कणन्‌कण हीच ती मालमत्ता होय. ‘अशी मालमत्ता तिचा असा दाता आणि असे मालमत्तेचे वारस या जनमानसात पुन्हा दिसणार नाहीत.’ अशा प्रकारचे वर्णन आचार्य प्र. के. अत्रे यांच्या एका लेखात वाचल्याने आढळते. ते मुद्दाम दिले आहे.

आपल्या हयातीतच हे काम पूर्ण करण्याचा यशवंतरावांचा मानस व प्रयत्न होता. २१ नोव्हेंबरला यशवंतराव चव्हाण स्वतः शामराव

गणपतराव पवार, रसिकलाल वाडीलाल शहा या तिघांनी सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट स्थापन केला आणि ९ जानेवारी १९८४ ला त्याची नोंदणी झाली. यशवंतरावांनी आपल्या मनाशी या स्मारकाची कल्पना चित्ररेखीत करून त्याप्रमाणे मुंबईच्या लेले ॲण्ड असोसिएटस् यांच्याकडून त्याचे नकाशे तयार करून घेतले. १ जून १९८४ ही. सौ. वेणुताईंची प्रथम पुण्यतिथी. त्या दिवशी त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या उपस्थितीत स्वतःच स्मारकाचे भूमिपूजन केले व वेणुताईंची प्रथम पुण्यतिथी पं. भीमसेन जोशी यांच्या संगीत मैफीलीने केली. यशवंतरावांच्या उपस्थितीत झालेली वेणुताईंची ही एकमेव पुण्यतिथी. २५ नोव्हेंबर १९८४ ला यशवंतरावांचेही निधन झाले. त्यामुळे स्वतःच्या हयातीत स्मारक भवन उभारण्याचे त्यांचे स्वप्न तसे अपुरेच राहिले.

ट्रस्टने आपल्या उद्दिष्टांमध्ये ज्या अनेक बाबींचा समावेश केला त्यात पुढील गोष्टी आहेत. शिक्षण प्रसार आणि विविध विषयातील ज्ञानशाखांच्या शिक्षणास प्रोत्साहन, निरनिराळ्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, अभ्यासकेंद्रे आणि शिक्षणासाठी अन्य प्रकारे कार्यरत राहणाऱ्या केंद्राची स्थापना आणि वृद्धी, विद्यार्थ्यांना गुणवत्ता, शिष्यवृत्ती, कर्जे, वसतिगृहे आणि भोजनालयाची निर्मिती. गरीब आणि एखाद्याच्या व्यवसायास, व्यापारास मदत, उच्च शिक्षणास मदत, प्रवास खर्चाची जबाबदारी स्वीकारणे, सामान्य आणि प्रगत सिक्षणासाठी ग्रंथालये उभारणे, दवाखाने, इस्पितळे, अनाथालये, शुश्रुषागृहे यांना मदत व देणग्या देणे, दुष्काळ वा पुरासारख्या आपत्तीप्रसंगी संकटग्रस्ताना मदत, अन्य प्रकारे औषधोपचार व गरजवंताना मदत. दारिद्र्यात पिचणाऱ्यांना अन्नवस्त्रांची मदत, पाणीटंचाई असणाऱ्या भागात विहीरखुदाई, गरिबाना मोफत वा कमी दरात घरे, समाजहितार्थ कामे करणाऱ्या पब्लिक ट्रस्टना मदत, विज्ञान-तंत्रज्ञान-कला जनोपयोगी कामासाठी कार्यरत संस्थांना मदत वा तत्सम संस्थांची स्थापना,

शारीरिक शिक्षण क्रीडा प्रकारासाठी प्रयत्न व प्रोत्साहन, भूकंप, आगी यासारख्या आपत्तींना तोंड देण्यासाठी निर्माण झालेल्या ट्रस्टना मदत व तत्सम संस्थांची स्थापना, व्यापारी - औद्योगिक आणि तांत्रिक शिक्षणास प्रोत्साहन यासाठी परीक्षा घेणे, पदविका, प्रमाणपत्रे पारितोषिके प्रदान करणे या आणि अशा प्रकारच्या समाजोपयोगी कामाचा अंतर्भाव ट्रस्टने आपल्या उद्दिष्टात केला आहे. या स्मारकासाठी शिवाजीनगर को-ऑप. हौसिंग सोसायटीने नाममात्र एक रुपया भाड्याने अंदाजे १७-१८ गुंठे जागा दिलेली आहे. त्या जागेवर यशवंतरावजींनी या स्मारकासाठी ४५ लाखाचा आराखडा केला होता व बांधकामाची जबाबदारी न्यू ट्रीओ बिल्डर्स (श्री. राजाभाऊ कोटणीस) यांच्यावर सोपविली होती. विश्वस्तांच्या सहकार्याने ही वास्तू उभी राहिली आहे.

या स्मारक भवनाचे उद्‌घाटन २५ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यावेळचे महाराष्ट्राचे राज्यपाल सी. सुब्रमण्यम् यांच्या हस्ते झाले. शिवाजी स्टेडियमसमोरील अत्यंत रमणीय परिसरात ही वास्तू उभी आहे. या स्मारकाच्या सभोवती सुंदर बगीचा आहे. दरात यशवंतराव चव्हाण १९६२ पासून वापरीत असलेली ॲम्बॅसिडर गाडी आहे. स्मारकाच्या आतील बाजूस ३० बाय ४५ फुटाचे बंदिस्त सभागृह आहे. त्याच्या दोन्ही बाजूस २५ बाय ३२ फुटांचे ग्रंथालय आहे. तेथे काचेच्या लाकडी कपाटात यशवंतरावांचा अनमोल ग्रंथसंग्रह ठेवण्यात आला आहे. या ग्रंथांचे ग्रंथालयशास्त्राप्रमाणे सर्व सोपस्कार (वर्गीकरण, तालिकीकरण-सूचीकरण) पूर्ण झाले आहेत. दुसऱ्या बाजूस २५ बाय ३२ फुटांचे कलादालन आहे. तिथे विविध आकाराच्या काचेच्या पेट्या बसविण्यात आल्या आहेत. त्यात यशवंतरावांना देश-परदेशात भेट मिळालेल्या महत्त्वाच्या वस्तू कलात्मकतेने प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. वेणूताई व साहेब नेहमी वापरत असलेले कपडे व इतर वस्तूही एका काचेच्या पेटीत ठेवण्यात आलेल्या आहेत.

या वास्तूचा दैनंदिन वापर व्हावा म्हणून ग्रंथालयास लागूनच

वाचनालयाचे वीस ३२ फुटाचे दालन आहे. त्यामध्ये चाळीस व्यक्तींची बसून वाचण्याची सोय आहे. (टेबल - खुर्च्या) तेथे बारा दैनिके, सहा साप्ताहिके, व चौदा मासिके द्वैमासिके, त्रैमासिके नियमित येतात. त्यांचे दैनंदिन वाचन करण्यासाठी पासष्ट ते सत्तर लोक फायदा घेतात.

याशिवाय यशवंतरावांच्या पत्रव्यवहाराच्या असंख्य फायली, हजारो हस्तलिखिते, कागदपत्रे त्यांना मिळालेली सन्मानपत्रे, मानपत्रे आदी साहित्य आहे. ग्रंथालयातील ग्रंथांची ग्रंथालय शास्त्राप्रमाणे अद्ययावतपणे मांडणी केलेली आहे. कऱ्हाडमधील हे स्मारक भवन म्हणजे महाराष्ट्राच्या गेल्या अर्धशतकातील इतिहासाच्या परिवर्तनाचे चालते - बोलते दर्शन झाले आहे.

या ग्रंथसंग्रहातील ग्रंथ चाळताना यशवंतरावांच्या वाङ्‌मयीन अभिरुचीचे, त्यांच्या अभ्यासूवृत्तीचे स्तिमित करणारे दर्शन घडते. या ग्रंथसंग्रहातील बहुतेक सर्व पुस्तके त्यांनी वाचलेली आहेत. सुमारे ४० टक्के पुस्तके त्यांनी अभ्यासल्याचे दिसून येते. कारण त्यांनी अभ्यासलेल्या पुस्तकावर केलेल्या टीका-टिप्पणी किंवा महत्त्वाच्या ओळीखाली केलेले अधोरेखांकन, परिच्छेदांना केलेल्या चौकटी यांचे निर्देश आहेत. यातील बहुतांश पुस्तके त्यांनी स्वतः खरेदी केलेली अशी आहेत. त्यात अनेक दुर्मिळ ग्रंथांचा समावेश आहे. ग्रंथांवर विकत घेतल्याची तारीख, ठिकाण याची नोंद करून त्यावर त्यांनी आपली स्वाक्षरीही केलेली आहे. अनेकविध विषयांवरील मौल्यवान ग्रंथ या संग्रहात आहेत. यशवंतरावांच्या या ग्रंथसंग्रहालयात मी काम करत असताना असे आढळते की 'नवा करार' या नावाचे मराठी भाषेतील एक बायबल त्यांच्या संग्रहात आहे. हे सोनेरी पुस्तक आपल्या पुस्तके पाहण्याच्या संधीचेसुद्धा सोने करून जाते. माधवराव बागल यांचे सर्व साहित्य या संग्रहालयात आहे. स्वतः बागल यांनी त्या पुस्तकांना उत्कृष्ट बाइंडिंग करून ते साहित्य यशवंतरावांना व वेणूताईंनाभेट दिलेले आहे. ग्रंथसंग्रहातील चरित्राचा विभाग सर्वात समृद्ध आहे. यात साहित्यिक, चित्रकार,

इतिहासतज्ज्ञ, राजकारणी, समाजसुधारक आदींची चरित्रे आहेत. मोठ्या ग्रंथालयातसुद्धा हा विभाग समृद्ध नसेल असा संग्रह आहे.

मराठी ज्ञानकोश, विश्वकोश, संस्कृतीकोश, शब्दकोश, अर्वाचिन प्राचीन चरित्रकोश, इन सायक्लोपिडिया ब्रिटानिका, गॅझेटिअर्स, मराठी तत्त्वज्ञान कोश याशिवाय मराठी - इंग्रजी भाषेतील विविध विषयावरील दुर्मिळ मौलिक असे संदर्भग्रंथ आहेत. यशवंतराव नुसते ग्रंथवेडे नव्हते त्यांची वाचनाची, अभ्यासाची दालने किती विस्तृत होती आणि त्यांची अभ्यासाची किंवा पुस्तके वाचण्याची पद्धती किती अर्थपूर्ण होती याचे यथार्थ दर्शन या ग्रंथसंग्रहावरून होते. या संस्थेचे स्वतंत्र आठ विश्वस्तांचे विश्वस्त मंडळ आहे. त्या मंडळातर्फे कारभार चालविला जातो.

साहेबांच्या ग्रंथालयात स्वतः त्यांनी खरेदी केलेले व त्यांना भेट म्हणून येत असलेले ग्रंथ जमा होत राहिले. त्यावेळी त्या ग्रंथ व्यवस्थितरीत्या जपणूक हे एक महत्त्वाचे काम होते. त्या कामाची जोखीम वेणूताईंनी स्वीकारून दर आठ - पंधरा दिवसांनी ती पुस्तके कपाटातून बाहेर काढावयाची, स्वच्छ करावयाची, वाळवी व किटकांपासून संरक्षण व्हावे म्हणून कीटकनाशकाची फवारणी करावयाची आणि पुन्हा ती विषयवार लावून ठेवायची हे काम त्यांनी अव्याहतपणे केले. त्यामुळे हा ग्रंथसंग्रह आजअखेर व्यवस्थित व नीटनेटका राहिला. त्यांच्या या कार्याचं मोल फार मोठं आहे.

वेणूताईंच्या निधनानंतर त्यांच्या योग्य अशा स्मारकासाठी कृष्ण - कोयनेच्या पवित्र संगमाच्या ठिकाणी म्हणजे कऱ्हाड येथे "सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट"ची स्थापना स्वतः यशवंतरावांनी करून त्यात संग्रहित केलेल्या ग्रंथसंग्रहानं व वस्तुसंग्रहानं संपन्न बनलेली आहे आणि हे ज्ञानभांडार आता आजच्या आणि उद्याच्या पिढ्यांसाठी, अभ्यासकांसाठी, संशोधकांसाठी मुक्त केलं आहे. सर्वार्थानं विकसित झालेसं हे ज्ञानभांडार कऱ्हाडनगरीचं एक भूषण ठरलेलं आहे.

यशवंतरावांनी ‘कृष्णाकाठी’ या आपल्या चरित्र ग्रंथाची अर्पणपत्रिका सौ. वेणूताई यांच्या स्मृतीस अर्पण करताना पुढील भावपूर्ण शब्द वापरलेले आहेत -

‘आईच्या पाठोपाठ माझ्या जीवनाला आकार आणि आशय देणारी माझी प्रिय पत्नी. . . . .’

यशवंतराव चव्हाण व वेणूताई यांच्यामधील प्रीतीचा आणि स्नेहाचा गोडवा उभ्या महाराष्ट्राच्या कौतुकाचा विषय म्हणून आदर्शवत ठरो आणि ही अनंताची ज्योत देवघरातील नंदादीपाप्रमाणे सतत प्रकाशमान राहो!

???

## ग्रंथ लेखनासाठी खालील संदर्भ साहित्याचा आधार घेतला.

'विचारधारा' (भाषण संग्रह) यशवंतराव चव्हाण – संपा. न. वा. लिमये प्रका. मुंबई. सागर प्रकाशन – १९६०

'सह्याद्रिचे वारे' (भाषण संग्रह) यशवंतराव चव्हाण प्रका. मुंबई महाराष्ट्र शासन प्रसिद्धी विभाग – १९६२

'ऋणानुबंध' (लेखासंग्रह) यशवंतराव चव्हाण पुणे, प्रेसिस्ट पब्लिकेशन – १९७५

'कृष्णाकाठ' (आत्मचरित्र खंड-१) यशवंतराव चव्हाण, पुणे प्रेस्टिड पब्लिकेशन – १९८४

'India's Foreign Policy' by Y. B. Chavan, Bombay, Somayya Publications – 1978

'वादळमाया' - राम प्रधान - पुणे – मेहता पब्लिशिंग हाऊस – १९९५.

'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्त्व' वि. वि. पाटील, औरंगाबाद, साकेत प्रकाशन - १९९४.

'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' - १९८६ श्री. द्वा. भ. कर्णिक यांच्या ३ व्याख्यानाचे पुस्तक प्रका. कराड नगरपालिका, कऱ्हाड - १९९३.

'यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक भाषणे - १९४६-६२' खंड-१ ला संपादक - खोबरेकर व्ही. जी. प्रका. मुंबई यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान.

'यशवंतराव : राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व' संपादक - केळकर भा. कृ. प्रका. मुंबई महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ - १९८५.

‘यशवंतराव : विचार आणि वारसा’ संपा. वि. वि. पाटील, कऱ्हाड दीपक पाटील - १९८९.

‘विदेश दर्शन’ संग्राहक व संपादक जोशी रामभाऊ प्रका. पुणे यशोदा प्रकाशन – १९८८.

‘Chavan & the Troubled Decade’ by kunshikrishan T. V. Pub. Bombay, Somayya Publication Pvt. Ltd. 1971.

‘लोकराज्य पाक्षिक’ - ‘यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक’ संपादक शांताराम सगणे, मुंबई. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य प्रकाशन. १ मे १९८५.

‘India- 1969 – Crisis of conscience’ by Rajendra Puri Pub. – Rajendra Puri New Delhi – 1971.

‘After Nehru who?’ by welles Hangen. Pub. London Rupert Hart Davis Publications - 1963.

‘यशवंतराव चव्हाण गुणगौरव अंक’ ‘साप्ताहिक समर्थ विशेषांक’ संपादक अ. कृ. कुलकर्णी, सातारा. समर्थ प्रकाशन - मे १ -१९७५.

‘मनोहर साप्ताहिक’ यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक ३१ मार्च १९८५. संपादक - श्री. बा. महाबळ, पुणे. किर्लोस्कर प्रेस.

‘विशाल सह्याद्रि’ यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक’ संपादक अनंतराव पाटील पुणे १९८५.

श्री. यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ (४८ वा जन्मदिन प्रकाशन) संपादक जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, नागपूर यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती प्रकाशन. १२ मार्च १९६१.

अर्थमंत्रीपदाची चार वर्षे : एक ताळेबंद (मुलाखत) केसरी विशेष प्रतिनिधी, पुणे-केसरी. दिवाळी अंक - १९७४.

## मा. यशवंतराव चव्हाण यांचा जीवनपट

**१२ मार्च १९१३**

जन्म सातारा जिल्ह्यातील (सध्या सांगली जिल्हा)देवराष्ट्रे या गावी (कृष्णाकाठ – आत्मचरित्र या ग्रंथातून)

**१९१८-१९**

साली वडील बळबंतराव चव्हाण यांचे प्लेगच्या साथीत निधन. देवराष्ट्रे येथील प्राथमिक शाळेत चौथीपर्यंत शिक्षण व नंतर कऱाड येथे शिक्षणासाठी दाखल.

**१९२७**

साली कराहच्या केंद्र शाळेतून व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा पास. कराड येथील टिळक हायस्कूल मध्ये प्रवेश.

**१९२९**

८ एप्रिल भगतसिंगानी असेंब्लीत बॉम्ब फेकला त्या घटनेने राजकीय जीवनाकडे आकृष्ट आणि भगतसिंगाच्या फाशीनंतर स्वातंत्र्य लढ्याला आयुष्य वाहून टाकायचा निर्धार

**१९३० ते ३१**

सालच्या मध्यापर्यंत जवळ जवळ दीड वर्ष ज्ञानप्रकाश वृत्तप्रत्राचे बातमीदार म्हणून संपर्क.

**१९३० ते ३३**

असहकाराच्या (कायदेभंग) चळवळीत सहभाग व १९३२ मध्ये १८ महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा.

**१९३३**

मे. तुरुंगातून सुटका

**१९३१**

साली पुणे येथील नूतन मराठी विद्यालयातर्फे झालेल्या वक्तृत्त्व स्पर्धेत 'ग्रामसुधारणा' या विषयावर पहिल्या क्रमांकाचे रुपये १५०-०० (दीडशे) चे पारितोषिक प्राप्त.

**१९३४**

मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण. कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये प्रेवश. (प्राचार्य डॉ. बाळकृष्ण व प्रोफेसर ना. सी. फडके याचा सहवास व मार्गदर्शन.)

**१९३८**

इतिहास व राजकारण हे विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बी.ए. पदवी परीक्षा उत्तीर्ण. पुणे येथील लॉ कॉलेजमध्ये प्रवेश

**१९३६**

एम.एन. रॉय यांच्या विचाराचा प्रभाव (रॉयवादी १९३८ विचारसरणीच्या छायेत)

**१९४०**

सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष

**१९४१**

ऑगस्ट एल एल बी परीक्षेत सुयश व वकिलीच्या व्यवसायास प्रारंभ.

**१९४२**

जून २, कराड येथे वेणुताईशी विवाहबद्ध. (फलटण येथील मोरे

कुटुंबातील कन्या)

ऑगस्ट ९, चळवळीस प्रारंभ, विशाल सातारा जिल्हा नेतृत्त्व, म. गांधींच्या ‘चलेजाव’ घोषणेत सामील आणि भूमिगत, भारत छोडो चळवळीत अटक.

**१९४२**

साली कऱ्हाड येथे भरलेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनातील परिसंवादाचे अध्यक्ष.

**१९४२-४३**

सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत प्रवेस, संचालन, मार्गदर्शन

**१९४३**

साली सर्वात थोरले बंधू ज्ञानोबा यांचे निधन.

**१९४४**

राजकीय क्रांती या विषयावर कविता (तुरुंगवास)

**१९४५**

तुरुंगातून सुटका.

**१९४६**

मुंबई इलाखा कायदे मंडळाच्या निवडणुकीत (द. सातारा) मतदारसंघातून निवड

**१९४६**

एप्रिल १४, गृखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड.

**१९४७**

डिसेंबर १५, मध्ये मधले बंधू गणपतराव यांचे निध.न.

**१९४८**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे चिटणीस

**१९५१**

मधले बंधू गणपतराव यांच्या पत्नीचे निधन.

**१९५२**

कऱ्हाड मतदारसंघातून विधानसभेवर निवड व नागरी पुरवठा मंत्री म्हणून नियुक्ती.

**१९५३**

सप्टेंबर २८, श्री. भाऊसाहेब हिरे व श्री. नानासाहेब कुंटे यांच्या समवेत नागपूर करारावर पश्चिम महाराष्ट्राच्या वतीने स्वाक्षरी.

**१९५४**

मुंबई राज्य पंचातय संघाची स्थापना.

**१९५५**

ऑक्टोबर१०, राज्य पुनर्रचना समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला. विदर्भाचे वेगळे राज्य व उर्वरित मराठी प्रदेश व गुजराथी प्रदेश यांचे संयुक्त राज्य सुचविणारी शिफारस.

**१९५५**

डिसेंबर १, फलटण येथे सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सभेत ‘उपोषण, संप, राजीनामे हे संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याते मार्ग नव्हेत’ असे ठासून प्रतिपादन करणारा ठराव मंजूर.

महाराष्ट्रापेक्षा नेहरू श्रेष्ठ आणि ‘मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याचे

प्रयत्नात यापुढे श्री. शंकरराव देव यांचे नेतृत्त्व स्वीकारावयास मी तयार नाही' अशी श्री. चव्हाण यांची घोषणा.

**१९५६**

ऑक्टोबर, लोकसभेने विदर्भासह विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना करण्याच्या बाजूने आपला कौल दिला.

**१९५६**

नोव्हेंबर, विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना व द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून निवड (वय ४३)

**१९५७**

एप्रिल, मुंबई विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत कऱ्हाड येथील अटीतटीचा सामना होऊन विजय आणि पुनश्च मुख्यमंत्रीपद (वय ४४)

**१९५७**

नोव्हेंबर ३०, प्रतापगडावर शिवस्मारकाचे पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते उद्‌घाटन, द्विभाषिक विरोधी मोर्चा व समारंभ शांततेने पार पडले.

**१९५८**

सप्टेंबर, अखिल भारतीय काँग्रेसच्या वर्किंग कमिटीवर निवड.

**१९५८**

फेब्रुवारी, बेळगांव - कारवार सीमाप्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट करून घेण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने चळवळ सुरू.

**१९५८**

डिसेंबर, सीमाप्रश्नाची दाद मागण्यासाठी भारताच्या राजधानीत संयुक्त

महाराष्ट्र समितीच्या वतीने सत्याग्रह.

**१९५९**

जानेवारी, अ. भा. काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनात तृतीय पंचवार्षिक योजनेविषयीचा ठराव मोडला.

**१९५९**

मार्च, शस्त्रक्रिया व बेचाळीस दिवसांची विश्रांती.

**१९५९**

ऑगस्ट, द्विभाषिक राज्याचा कारभार यशस्वी होत असला तरी राज्यातील जनतेत एकात्मतेची भावना निर्माण झालेली नाही म्हणून मुख्यमंत्री या नात्याने ते मी यापुढे चालवू शकणार नाही, असा निर्णय घेऊन तो काँग्रेस श्रेष्ठींना कळविला.

**१९५९**

सप्टेंबर, द्विभाषिक मुंबई राज्याच्या पुनर्रचनेसंबंधी विचार करण्यासाठी काँग्रेस वर्किंग कमिटीने नऊ सदस्यांची समिती नेमली.

**१९५९**

डिसेंबर २९, अलिगढ मुस्लिम विद्यापीठ, अलिगढ – ऑननरी डिग्री ऑफ एल. एल. बी. पदवी

**१९६०**

जानेवारी, द्विभाषिक राज्याची पुनर्रचना करून मुंबईसह मराठी प्रदेशाचे व गुजरात प्रदेशाचे अशी दोन राज्ये निर्माण करण्याचा निर्णय नऊ सदस्यीय समितीने घेतला.

**१९६०**

फेब्रुवारी १३, (सावरगाव - डुकरे) येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक

**१९६०**

मार्च, बारामती येथील लोकसभेच्या पोटनिवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला प्रचंड बहुमताने निवडून देऊन, महाराष्ट्र राज्याची निर्मिती लोकशाही पद्धतीने व शांततेने करण्याच्या प्रयत्नावर मराठी जनतेने विश्वास व्यक्त केला.

**१९६०**

एप्रिल, लोकसभेचे द्विभाषिक राज्याची पुनर्रचना करून मुंबईसह महाराष्ट्र व गुजरात अशी दोन राज्ये निर्माण करण्याच्या योजनेवर शिक्कामोर्तब केले.

**१९६०**

मे १, महाराष्ट्र राज्याची उत्साही वातावरणात स्थापना व नवीन राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथविधी (वय ४६)

**१९६०**

जून, पुणे येथे पं. गोविंद वल्लभ पंत यांच्या उपस्थितीत म्हैसूरचे मुख्यमंत्री श्री. जत्ती यांनी सीमेचा प्रश्न वादविषय असल्याचे मान्य केले. श्री. चव्हाण व श्री जत्ती यांचे सीमा प्रश्नांचा विचार करण्यासाठी व आपापल्या सरकारांना रिपोर्ट सादर करण्यासाठी प्रत्येकी दोन प्रतिनिधी मिळून चार सदस्यांची नेमणूक करण्यात येईल, अशी घोषणा करणारे संयुक्त पत्रक.

**१९६०**

ऑक्टोबर २१, पुणे येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीतर्फे जाहीर सत्कार.

**१९६०**

नोव्हेंबर, अखिल भारतीय काँग्रेस निवडणूक मंडळावर निवड.

**१९६०**

नोव्हेंबर १०, नागपूर करार अंमलबाजावणीचा भाग म्हणून महाराष्ट्र विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपुरात दरवर्षी भविण्यास सुरुवात.

**१९६०**

नोव्हेंबर १९, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना.

**१९६०**

डिसेंबर, मुंबई येथे शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण.

**१९६१**

जानेवारी, काँग्रेस महासमितीमधून निवडणूक पद्धतीने प्रथमच झालेल्या निवडीत वर्किंग कमिटीवर निवड.

**१९६१**

दिल्ली येथे भरलेल्या ४३ व्या. अ. भा. मराठी नाट्यय संमेलनाचे स्वागताध्यक्ष.

**१९६१**

मार्च ३०, विदर्भातील जनतेच्या वतीने नागपूर येथे ४७ व्या वाढदिवसानिमित्त सत्कार समारंभ.

**१९६२**

मे १, पंचायत राज्य योजनेचा प्रारंभ.

**१९६२**

सातारा येथे भरलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक.

**१९६२**

फेब्रुवारी, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका, काँग्रेसने २६५ पैकी २१४ जागा जिंकून प्रचंड विजय मिळविला.

**१९६२**

ऑक्टोबर, 'केसरी' च्या दिवाळी अंकात 'नियतीचा हात' हा पहिला लेख प्रसिद्ध.

**१९६२**

नोव्हेंबर २२, भारताचे संरक्षणमंत्री म्हणून सूत्रे ग्रहण.

**१९६३**

नाशिक जिल्यामधून लोकसभेवर बिनविरोध निवड.

**१९६३**

अमेरिकेच्या संरक्षण खात्याचे सविच मॅक्नॉरा यांच्या निमंत्रणावरून अमेरिकेस भेट.

**१९६३**

ऑगस्ट, रशियाचा दौरा - रशियन पंतप्रधान क्रुश्चेव्ह यांच्याशी चर्चा, मदतीचे आश्वासन.

**१९६४**

ऑगस्ट २८, रशियाचा दौरा.

**१९६४**

दिल्लीतील महाराष्ट्रीय शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी नियुक्ती.

**१९६५**

जानेवारी, नांदेड येथे भरलेल्या ४७ व्या अ. भा. मराठी नाट्य परिषद – अधिवेशनाचे उद्‌घाटक.

**१९६५**

ऑगस्ट १८, आई विठामाता यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी निधन - मुंबई.

**१९६६**

जानेवारी, ताश्कंद येथे शास्त्रीजी – आयुबखान चर्चेस उपस्थित (कोसिजिन यांच्या प्रयत्नानुसार)

**१९६६**

नोव्हेंबर १४, केंद्रीय गृहमंत्रीपदी नियुक्ती.

**१९६७**

गृहमंत्रीपदाची सूत्रे घेतल्यानंतर पहिल्या सहा महिन्यातच नव्याने दहा राज्यपालांची नियुक्ती.

**१९६९**

नोव्हेंबर, बंगलोर काँग्रेस अधिवेशनानंतर काँग्रेस पक्ष दुभंगला गेला.

**१९६९**

फेब्रुवारी २३, कानपूर विश्व विद्यालयाने “डॉक्टर ऑफ लॉ” ही पदवी सन्मानपूर्वक बहाल.

**१९७०**

जून २६, केंद्रीय अर्थमंत्री म्हणून नियुक्ती.

**१९७०**

फेब्रुवारी १०, औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ लॉ' ही पदवी.

**१९७१**

विकसनशील राष्ट्र परिषदेमध्ये आर्थिक विकासासंबंधी चर्चा.

**१९७२**

सातारा मतदारसंघातून लोकसभेवर निवड, लोकसभेच्या ४३ जागा जिंकल्या. (महाराष्ट्रात)

**१९७४**

डिसेंबर १, कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ लॉ' ही पदवी.

**१९७४**

ऑक्टोबर, केंद्रीय परराष्ट्रमंत्री म्हणून नियुक्ती.

**१९७५**

गियाना, क्युबा, लेबेनॉन. इजिप्त, पेरू, अमेरिका, अफगाणिस्तान, इराक, कुवैत व फ्रान्स इत्यादी राष्ट्रांना भेटी.

**१९७५**

डिसेंबर, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कऱ्हाड येथे भरलेले होते. त्याचे स्वागताध्यक्ष.

**१९७६**

जानेवारी १७, परभणी मराठवाडा कृषि विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' ही पदवी.

**१९७६**

तर्कस्थान, अल्जेरिया या देशांना भेटी.

**१९७६**

ऑक्टोबर ८, सदिच्छा राजदूत म्हणून अमेरिकेतील होस्टन येथील टेक्सास शहरातर्फे मानपत्र.

**७७-७८**

लोकसभेतील विरोध पक्षाचे नेते म्हणून निवड (मान्यताप्राप्त अशा विरोधी पक्षाचे लोकसभेतील स्वातंत्र्यानंतरच्या काळातील पहिले विरोधी पक्षनेते.)

**१९७८**

इंदिरा गांधी यांच्याबरोबर मतभेद होऊन संजीव रेड्डी काँग्रेसमध्ये प्रवेश.

**१९७८**

महाराष्ट्रात शदर पवार यांच्या नेतृत्त्वाखाली पुलोद मंत्रिमंडळ स्थापन (यशवंतरावांचा पुलोदला पाठिंबा असल्याचा गवगवा)

**१९७९**

जुलै, चरणसिंग यांच्या संयुक्त मंत्रिमंडळात उपपंतप्रधान आणि गृहमंत्री.

**१९८०**

सातारा मतदारसंघातून लोकसभेवर निवड (रेड्डी काँग्रेसचे महाराष्ट्रातील एकमेव विजयी उमेदवार)

**१९८२**

इंदिरा काँग्रसमध्ये प्रवेश.

**१९८२**

आठव्य अर्थ आयोगाचे अध्यक्ष.

**१९८३**

जून १, पत्नी सौ. वेणुताई यांचे निधन.

**१९८३**

ऑक्टोबर ७, यशवंतरावांनी आपले इच्छापत्र (वुईल) लिहिले.

**१९८४**

जानेवारी ९, सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॉरिटेबल ट्रस्टची स्थापना व नोंदणी.

**१९८४**

फेब्रुवारी ७, 'कृष्णाकाठ' आत्मचरित्र खंड १ ला प्रकाशित.

**१९८४**

मार्च २४, पुणे विद्यापीठाची सन्माननीय डी. लिट्. पदवी बहाल.

**१९८४**

जून १, सौ. वेणुताईची प्रथम पुण्यतिथी त्या दिवशी यशवंतरावांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या उपस्थितीत सौ. वेणुताई स्मारकाचे भूमिपूजन केले.

**१९८४**

ऑक्टोबर ७, 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्र ग्रंथास केसरी मराठा संस्था पुणे तर्फे साहित्यसम्राट न. चि. केळकर पारितोषिक.

**१९८४**

नोव्हेंबर २५, सायंकाळी ७.४५ वाजता दिल्ली येथे निधन.

**१९८४**

नोव्हेंबर २७, दुपारी ३.३० वाजता कऱ्हाड येथे कृष्ण-कोयनेच्या प्रीतिसंगमावर अंत्यसंस्कार.

**१९८६**

मे ३१, क्षेत्र माहुली, जि. सातारा येथील रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा सामाजिक न्याय पुरस्कार (मणोत्तर)

???

## परिचय

माझ्या परिचयाचे तीन ग्रंथपाल महाराष्ट्राची ज्ञानलालसा पुरवीत आणि वाढवीत आले आहेत. एक मुंबई विद्यापीठाचे श्री. मार्शल, दुसरे सिद्धार्थ महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे श्री. शां. शं. रेगे आणि तिसरे कऱ्हाड नगरपालिका ग्रंथालयाचे माजी ग्रंथपाल व सध्या सौ. वेणूताई चव्हाण स्मारक संशोधन ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. विठ्ठलराव पाटील. त्यातही विठ्ठलराव यांचे वैशिष्ट्य म्हणजे यशवंतराव चव्हाण यांच्या बद्दलचा त्यांचा भक्तिभाव.

ते कुशल ग्रंथपाल म्हणून जसे प्रसिद्ध आहेत तसेच अनेक ग्रंथालयीन पुरस्कारांनी सन्मानीत झाले असून ते उत्तम ग्रंथकार आहेत. त्यांच्या रोमारोमांत यशवंतरावांचे विचार रुजले आहेत.

यशवंतराव हे एक सुसंस्कृत व्यक्तित्व. यशवंतरावांच्या या प्रतिमेला उजाळा देण्याचे श्रेय विठ्ठलरावांनाच प्रामुख्याने द्यावयाला पाहिजे. ग्रंथपालाच्या दूरदृष्टीने हे काम त्यांनी सतत केले व आजही करत आहेत. फळाची अपेक्षा न धरता इतकेच नव्हे तर पदराला खार लावून झपाटलेले व्यक्तित्व काय असते याचा नमुनाच विठ्ठलरावांच्या ठायी पहावयाला मिळतो.

कऱ्हाड हे त्यांचे कार्यक्षेत्र. त्यांचे केंद्रबिंदू दोन. एक ग्रंथालय आणि दुसरा यशवंतरावांचे जीवन व कार्य. विठ्ठलरावांनी यशवंतरावांच्या जीवनाचे अनेकविध पैलू स्वतःच्याच व इतरांच्या लेखणीतून प्रगट केले. त्यांचे समग्र दर्शन घ्यावयाचे झाले तर भावी चरित्रकारालाच नव्हे तर भावी इतिहासकारालाही विठ्ठलरावांशीच संपर्क साधावा लागेल.

एखाद्या चरित्रकाराला यशवंतरावांचे जे दर्शन घडवून आणता येणार नाही ते दर्शन विठ्ठलरावांनी या पुस्तकाच्या रूपाने घडवून आणले आहे.

यशवंतरावांच्या या दिग्दर्शनातून विठ्ठलरावांना जो विरंगुळा मिळेल तीच त्यांच्या कष्टमय जीवनाची खरीखुरी कमाई होईल.

**द्वा. भ. कार्णिक**

**(प्रसिद्ध रॉयवादी विचारवंत व**

**महाराष्ट्र टाइम्सचे माजी संपादक, मुंबई)**